
साप्ताहिक

# माणूस

९ जून ८४/दोन रुपये

## सहजीवन ....पूर्णत्वाकडे



साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : चोविसावे

अंक : दुसरा

□

९ जून १९८४

किंमत : दोन रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

□

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ

संजय पवार

पुणे वार्ता

## ठोकळांशी गप्पा

'आम्ही आज हा कार्यक्रम अनौपचारिक स्वरूपात करायचे ठरवले आहे' असे आज प्रत्येक जणच औपचारिकपणे म्हणत असतो. त्यामुळे खराखुरा अनौपचारिक कार्यक्रम असतो तरी कसा याची मला कायम उत्सुकता वाटते पण शुक्रवारी सध्याकाळी मात्र 'बळीराजा' मासिकाचे संपादक प्र. बा. भोसले यांनी घडवून आणलेला असाच एक कार्यक्रम बघायला आणि ऐकायला मिळाला. निमित्त होते सुप्रसिद्ध ग्रामीण साहित्यिक ग. ल. ठोकळ यांनी ७६ वर्षे पूर्ण केली याचे. त्यांच्याशी गप्पा मारायला साहित्यप्रेमी, नातेवाईक आणि नियमितपणे ग्रामीण समस्यांवर चर्चा करणारी मंडळी असा समूह जमला होता. खऱ्या अर्थाने सर्वजण वक्ते आणि सर्वजण श्रोते असेच कार्यक्रमाचे स्वरूप होते.

एखादा साहित्यविषयक सोहळा कसा असतो, तो कसा रंगवायचा असतो याचा प्रत्यय या गप्पांमध्ये सहभागी झाल्यानंतर आला. विशेष म्हणजे 'बांधिलकी' 'नागरी-ग्रामीण वाद' यांच्या वाटेलाही कोणी गेले नाही. त्यामुळे निखळ वाङ्मयीन गप्पांचा अनुभव आला.

सुरुवातीला डॉ. आनंद यादव यांनी दादासाहेब ठोकळांच्या कर्तृत्वाविषयी सांगितले. बहुजनसमाजातल्या सांस्कृतिक जीवनाला आज जरी बहर आलेला दिसत असला तरी स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे साहित्यिक हाताच्या बोटावर मोजण्याइतके होते. या काळात मराठी माणसाचं मराठी मन उलगडून दाखविणारे लिखाण करायला त्यांनी सुरुवात केली. ग्रामीण साहित्याचा जो प्रवाह आज भरभरून वाहताना दिसतो आहे त्याची गंगोत्री असंच ठोकळांच्या साहित्याचं वर्णन करावं लागेल' या शब्दात दादासाहेबांचा गौरव यादवांनी केला. त्यांच्या साहित्याचे त्या वेळचे महत्त्व स्पष्ट करताना ते म्हणाले, 'आमच्या शालेय जीवनात मराठीचे पाठ्यपुस्तक वाचताना ही आपली 'मायबोली' आहे असे ठोकळांच्या कविता वाचून वाटायला लागले. 'छगन गाय बघ' या ओळी बघितल्यावर गोंधळल्यासारखे वाटत असे. गाय लांबूनच बघायची असते का? असा प्रश्न मनात येई, पण जेव्हा ठोकळांच्या *शेतामध्ये रंगणाऱ्या कविता* वाचायला मिळाल्या, तेव्हा मराठीची खरी गोडी चाखायला मिळाली.

त्यानंतर स्वतः ग. ल. ठोकळ यांनी आपले मनोगत सांगितले. तरुणपणीच्या आठवणींना उजाळा देत त्यांनी आपल्या मागील आयुष्याचे सिंहावलोकनच केले. कॉलेजमध्ये शिकत असताना कवितेचं आपल्याला भयंकर वेड होतं. त्या वयातच 'सुगी' या ग्रामीण कवितांचा संग्रह प्रसिद्ध केला असं सांगून ते म्हणाले, 'मी मोठमोठ्या कवींना आपल्या कविता पाठवण्याचे आवाहन केले आणि इतका प्रचंड प्रतिसाद मिळाला की, मला प्रसिद्धीसाठी लागणाऱ्या खर्चाची काळजी वाटू लागली. गंमत म्हणजे निरनिराळ्या कवींच्या कविता गाणाऱ्या जी. एन. जोशी यांनी बडोद्यामध्ये कार्यक्रम केला. तो मीच घडवून आणला होता व त्यामध्ये मिळालेल्या रकमेतून 'सुगी' प्रसिद्ध झाली.' अशा रीतीने कॉलेजमध्येच साहित्यसेवेला सुरुवात करणारे ठोकळ पुढे कवी, लेखक, प्रकाशक या अनेक नात्यांनी लोकांपुढे आले.


'खेड्यातील माणूस आणि निसर्ग' हा माझ्या लिखाणाचा विषय आहे माझं लिखाण म्हणजे अनुभव आणि कल्पना याचे मिश्रण असते. बरंचसं इंग्रजी वाङ्मय मी केवळ आस्वाद म्हणून वाचतो; पण लिहितो ते मात्र महाराष्ट्रातील खेडी बघूनच. कविता लिहून लिहिण्याचं समाधान वाटत नव्हतं म्हणून कथेकडे वळलो. दादासाहेब स्वतःविषयी अधूनमधूनच बोलत होते; पण त्यातून एका ग्रामीण लेखकाचे चित्र डोळ्यासमोर उभे राहत होते. जास्त बोलण्यापेक्षा कविता वाचून दाखवणेच त्यांनी पसंत केले आणि 'एका शेतकऱ्याचे प्रियाराधन' वाचून दाखवले, तर डॉ. आनंद यादव यांनी 'पाव्हणं' ही त्यांना आवडलेली कविता हावभावासहित म्हणून दाखवून कार्यक्रमाचा

यथोचित समारोप केला.

आपल्या ऑफिसशेजारच्या गॅलरीत असा कार्यक्रम घडवून आणण्याची कल्पना प्र. बा. भोसल्यांची. एक नवीन उपक्रम 'ग्रामीण समाज चर्चामंडळ' या नावाने ते चालवितात, त्याचाच हा कार्यक्रम म्हणजे एक भाग होता. दर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी ग्रामीण समस्या, खेड्यातील एकंदर परिस्थिती यावर चर्चा करण्यासाठी नियमितपणे हे चर्चामंडळ एकत्र येते. खेड्यातला सुशिक्षित शहरातला प्रस्थापित बनून जातो आणि त्याचा फायदा खेड्याला काहीच मिळत नाही अशी व्यथा त्यांनी बोलून दाखविली. ही परिस्थिती बदलण्यासाठी ते स्वतः कायम प्रयत्नशील असतात. शेतकरी जीवनाला वाहून घेतलेले 'बळीराजा' मासिक गेली अनेक वर्षे ते निष्ठेने चालवीत आहेत. समाजाविषयी वाटणाऱ्या कळकळीतून असे उपक्रम चालवतानाच ठोकळ्यांसारख्या साहित्यिकाला गप्पांसाठी बोलवायलाही ते विसरत नाहीत.

काही चांगलं, अस्सल असं कुठे बघायला आणि ऐकायला मिळतच नाही; पण एखाद वेळी तसा योग आला की, मग कुठे तरी वाचलेल्या संकल्पनांचे खरे अर्थ कळायला लागतात. गप्पात सहभागी झाल्यावर 'अनौपचारिकता' म्हणजे काय हे कळलं आणि 'ग्रामीण समाजमंडळाचा' उपक्रम पाहिल्यानंतर 'सामाजिक जाणीव' म्हणजे काय हे समजलं.

–निरंजन आगाशे



## मुंबापुरी

# आज शमलेली दंगल ही उद्याच्या शांततेची हमी नाही !

विष्णू जयदेव

भिवंडी, कल्याण, ठाणे आणि मुंबई येथे उसळलेल्या हिंदू–मुसलमान दंगलीत एकूण दोनशेसत्तेचाळीस लोक ठार झाले आणि पन्नास हजारावर माणसे बेघर झाली. हे झाले अधिकृत सरकारी आकडे. प्रत्यक्षात तीनशेहून अधिक लोक ह्या आगीत बळी पडले असावेत. ही दंगल ज्या प्रकारे पसरत गेली आणि ज्या प्रमाणात जमावाकडून शस्त्रे वापरली गेली, त्यावरून हा वणवा अचानक पेटलेला नसून कित्येक महिने त्याची तयारी होत असावी यात शंका नाही. दहिसर चेक नाक्यावर अडविलेला शस्त्रास्त्रांचा ट्रक ह्या थेट जोधपूरहून आलेला होता.

आणखी एक चिंतेची बाब म्हणजे ह्या वेळेस प्रथमच ठाणे, भांडुप, वांद्रे, जोगेश्वरी आणि भाईंदर यासारखी ठिकाणे जातीय तणावाची केंद्रे बनली.

आजपर्यंत सतत वाढ होत जाणाऱ्या अनधिकृत झोपडपट्ट्या भिवंडी, कल्याण आणि मुंबई अशा ठिकाणीच मर्यादित होत्या. आता ठाणे, भांडुप, भाईंदरसारखी ठिकाणेही बकाल वस्तीची केंद्रे होऊ लागली आहेत. खेरवाडी, बैंगनवाडी, गोवंडी, मजासवाडी अशा ठिकाणी हजारो माणसे ज्या परिस्थितीत संसार उभारतात ते पाहून सर्वसामान्य माणूस हादरून जाईल. उत्तरप्रदेश, बिहार, तामिळनाडू अशा भागांतून आलेले चाळीस–चाळीस, पन्नास–पन्नास हजार लोक एकेका वस्तीत वीज, पाणी, संडास अशा कोणत्याही सोयीशिवाय, भिंतीला भिंत चिकटवून राहतात–सतत रेंगाळणाऱ्या कुबट वासात आयुष्य कंठतात याची जाणीव आपल्याला येथील भयाण भविष्यहीन परिस्थितीचा स्फोट झाल्याखेरीज येत नाही ! भर दिवसाही पोलिसांना ह्या वस्त्यांमध्ये खोलवर शिरण्याची हिंमत होत नाही आणि रात्र पडली की, स्थिती अधिकच भीषण होत असे. जगण्याच्या संघर्षाला जितके रानटी स्वरूप ह्या झोपडपट्ट्यांमध्ये येते तितके बाकी कोठेही येत नसेल. कोणत्या क्षणी ह्या कोठारात ठिणगी पडेल न पडेल याची हमी देणे कठीण आहे.

ह्या दंगलीची सुरुवात कशी झाली ह्यापेक्षाही, हां हां म्हणता हा वणवा हाताबाहेर कसा गेला, हे समजावून घेणे अधिक महत्त्वाचे आहे. भिवंडीला शिवजयंती साजरी करण्यासाठी परवानगी देण्यात सरकारने कोणतीही चूक केली असे आम्हाला वाटत नाही. महाराष्ट्रात शिवजयंतीला बंदी घालणे यासारखी लांछनास्पद गोष्ट नाही. या शहरात आणि त्याच्या आसपास भयाण भणंग आयुष्य जगणारा एक मोठा समाज आणि सुरे, तलवारींवर आपले राज्य प्रस्थापित करणारे गुंड, अशा दंगलींची तयारी सतत करत राहतात. हा डोंब उसळविण्यासाठी त्यांना कोणतेही कारण पुरते. पुढारी प्रक्षोभक भाषणे काही आज करीत नाहीत. एकदा आपण विशिष्ट समाजाचे कैवारी आहोत असे भासवले की, मग निवडणुकीत हा समाज आपल्या पाठीशी उभा राहतो; पण प्रत्यक्षात जेव्हा ह्या दंगली उसळतात तेव्हा सामान्य माणसाचीच त्यात होळी होते. ह्या दंगलींची झळ कलानगर, परभणी किंवा मलबारहिल अशा भागांना लागत नाही.

या दंगलीची सुरुवात जरी जातीय दंगल म्हणून झाली तरी पहिल्या दोन दिवसांत पोलीसयंत्रणा कोलमडून पडल्यावर साऱ्या मुंबापुरीचा ताबा गुंडांच्या टोळ्यांनी आणि झोपडपट्टीदादांनी घेतला. राज्यसरकारला

आणि पोलीसयंत्रणेला ह्या परिस्थितीची जाणीव होईपर्यंत बराच उशीर झालेला होता पंधरा ऑगस्ट एकोणिसशे ब्याऐशीला झालेल्या पोलीसबडासारखेच या वणव्याने साऱ्यांना वेढले. यानंतर अफवा ज्या वेगाने पसरत चालल्या त्याला सरकारची प्रसिद्धि-माध्यमे किंवा वृत्तपत्रानाही थोपविणे शक्य झाले नाही.

ह्या दंगलीला जर संपूर्ण जातीय स्वरूप असते तर शहराच्या प्रत्येक भागात ती पसरली असती. काही विशिष्ट बकाल वस्त्यांपुरती मर्यादित राहिली नसती प्रत्यक्ष भिवंडीतही ही दंगल शहराच्या बाहेरील भागापुरतीच मर्यादित राहिली. मुंबई आणि तिच्या जवळपासच्या भागात जे काही अधिकृत बकाल वस्तीचे भाग आहेत त्यांच्या आजुबाजूस प्रचंड प्रमाणावर अनधिकृत झोपडपट्ट्यांची वाढ झालेली आहे बैंगनवाडी आणि चिताकँप येथील महापालिकेच्या जमिनीवर असलेल्या अधिकृत झोपड्या आणि त्यांच्या भोवताली वाढलेली अनधिकृत झोपडपट्टी हे याचे उत्तम उदाहरण आहे. मुंबापुरीतून तडीपार झालेल्या गुंडांचे साम्राज्य या झोपडपट्ट्यावर चालते. जमीन महापालिकेची किंवा सरकारची; पण राज्य मात्र यांचे !

आम्ही जेव्हा बैंगनवाडी आणि मजासवाडी ह्या भागांना दंगलीनंतर भेट दिली तेव्हा त्या भागात वर्षानुवर्षे झोपडीला झोपडी चिकटवून राहणारे हिंदू आणि मुसलमान कुटुंबेही घर सोडून जीव वाचविण्यासाठी वाट फुटेल तेथे निघून गेली होती आणि एकदा प्राण वाचविण्याठी माणसे घरदार सोडून गेली की, मग त्यांच्या झोपड्या, कुडाची दुकाने ह्या गुंडांच्या ताब्यात जाणार होती. दंगलीचा हा परिणामही ध्यानात घ्यायला हवा.

## धर्मवेड वाढले

त्याचबरोबर मुसलमान हे या देशात अल्पसंख्यांक असले तरी ज्या भागात त्यांची संख्या जास्त आहे त्याच भागात या दंगली मोठ्या प्रमाणावर उसळल्या हे विसरून चालणार नाही. गेल्या काही वर्षांत धर्मवेडाची भावना या समाजात मोठ्या प्रमाणावर वाढू लागली याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे तेलाच्या किंमती वाढू लागल्यामुळे अरब देशांकडे खेळू लागलेला प्रचंड पैसा. ज्या देशांकडे हजारो वर्षांच्या संस्कृतीची परंपरा नाही, ज्यांना लोकशाही जीवनपद्धती मानवत नाही अशा देशांकडे या अमाप संपत्तीचा ओघ सुरू झाल्याने हा पैसा धर्माच्या पुनरुत्थानासाठी वापरला जात नसेल असे छातीठोकपणे सांगता येणार नाही.

मुळातच ह्या धर्मात अंगीभूत असलेली असहिष्णु वृत्तीदेखील अशा उद्रेकांना कारणीभूत आहे. धर्मप्रसाराच्या सुरुवातीस ख्रिस्ती धर्मातही ही असहिष्णुवृत्ती होती; परंतु संस्कृतीच्या उदयाबरोबर त्यांची धर्मप्रसाराची पद्धतीही बदलत गेली. इस्लामच्या बाबतीत मात्र दुर्दैवाने तसा प्रकार घडला नाही. जगातील सर्व महत्त्वाच्या इस्लामी देशांत आजही हुकुमशाही राजवट आहे. विरोधी विचारांना सामावून घेणारी आणि त्याना वाव देणारी लोकशाही राज्यपद्धती त्यांना परवडणारी नाही ही सत्य घटना आहे. मुसलमानांच्या ह्या कडव्या धर्मप्रेमामुळेच इंग्रजीमध्ये ज्याला backlash (बॅकलाश) म्हणतात तशा प्रकारे ही असहिष्णु वृत्ती हिंदूमध्येही मोठ्या प्रमाणावर निर्माण होऊ लागली आहे आणि यातूनच हे अशा प्रकारचे उद्रेक वारंवार होत चालले आहेत. आजपर्यंत महाराष्ट्रातील स्थानिक लोकाना न्याय देण्याच्या मिषाने स्थापन झालेल्या शिवसेनेने उघड-उघड हिंदू संघटनेचे स्वरूप धारण करणे हाही हिंदूबॅकलाशचाच प्रकार आहे.

भिवंडीला दंगल उसळल्यावर शहराच्या ज्या भागात मुसलमानाची वस्ती मोठ्या प्रमाणावर आहे अशाच भागात वातावरण तंग झाले आणि त्यातच कामाठीपुरा भागात मशिदीजवळ नागपाडा पोलीसस्टेशनचे इन्स्पेक्टर गोखले याना दगडानी ठेचून ठार करण्यात आले. या प्रकारामुळे मुंबईतील पोलीस भडकून उठले आणि मग पुढचे चार पाच दिवस हा लढा हिंदू आणि मुसलमान ह्याऐवजी पोलीस आणि मुसलमान ह्यांच्यातच संघर्ष झाला. चिताकँप येथे ट्रॉबे पोलिसानी केलेला गोळीबार हे याचे उत्तम उदाहरण आहे चित्ताकँप येथे पोलिसांनी घराघरात शिरून बायकांना आणि मुलांनाही मारहाण केली. गोळीबारात एकूण आठ लोक ठार झाले. त्यात एक बाईदेखील होती.

ह्या दंगलीच्या निमित्ताने खरे पितळ उघडे पडले ते आमच्या राजकीय पुढाऱ्याचे. दंगलीचा वणवा सर्वत्र पेटत असताना सत्ताधारी पक्षाचे, तसेच विरोधी पक्षाचेही पुढारी (काही मोजके अपवाद सोडले तर) ह्या भागात वाऱ्यालाही फिरकले नाहीत. दंगल थमत आल्यावर मात्र यांच्या पदयात्रा सुरू झाल्या. त्यामुळे सतत आठ दिवस तहान-भूकेची पर्वा न करता चाळीस-चाळीस तास सतत काम करणाऱ्या पोलिसांचा ताण मात्र अधिकच वाढला. आम्हाला वाटले की, मंत्रालयात मीटिंगस् घेत बसण्याऐवजी वसंतदादा भिवंडीत ठाण मांडून बसतील आणि पुनर्वसनाचे काम जातीने पाहातील; पण येथे अंतुल्यांना त्यांच्या पुनर्वसनाची घाई लागली होती. त्यांनी स्वतःची वेगळी पदयात्रा काढली. मनेका गांधी भिवंडीला येणार म्हणून राजीव गांधी दुसऱ्यादा भिवंडीला आणि मुंबईला भेट देऊन गेले. जॉर्ज फर्नांडिस यांनी भिवंडीला भेट देऊन आचरट वक्तव्य केले महात्मा गांधीनी नौखालीत काढलेली पदयात्रा आणि या पदयात्रा यात जमीन अस्मानाचा फरक आहे. हिंदु-मुसलमान वस्त्यामधून फिरताना गांधींच्या सभोवताली दहा-दहा, पंधरा-पंधरा साध्या वेषातल्या पोलीसअधिकाऱ्यांचा गराडा नव्हता आणि दहा-दहा मिनिटांच्या अंतरावर वायरलेस व्हॅन्सही नव्हत्या. अशा कोणत्या पुढाऱ्यामध्ये जयप्रकाश नारायण आणि महात्मा गांधींचे नैतिक बळ आहे की त्यांच्या आवाहनामुळे ही दंगल थमली असती ? परिस्थिती आटोक्यात आणण्याचे खरे श्रेय पोलीस आणि लष्कर यांचेच. राजीव गांधींच्या भेटीनंतर तर जोगेश्वरीतील मजासवाडीत कर्फ्यू लावण्याची पाळी ओढवली !

ह्या दंगलीच्या काळात जे. जे. हॉस्पिटल, सायन आणि भिवंडी म्युनिसिपल हॉस्पिटलमध्ये ज्या स्वरूपात तलवारीचे, चाकू-सुऱ्यांचे वार झालेली माणसे आणण्यात आली त्यांचे वर्णन करण्याची आमची इच्छा नाही. जे दृश्य डोळ्यानी बघतानाही काळजाचा थरकाप उडतो ते शब्दात पकडण्याइतके आम्ही शब्दप्रभू नाही. भिवंडीच्या अन्सारी कंपाउंडमध्ये अस्ताव्यस्त पडलेली-जळून काळी ठिक्कर झालेली प्रेते ज्यांनी पाहिली आहेत त्यांना तुम्ही हिंदू किती आणि मुसलमान किती मेले असा हिशोब विचारू नका !

एके काळी रानटी मानवाला माणूस बनविण्यासाठी धर्मासारख्या अद्वितीय संकल्पनेची निर्मिती झाली आणि आज त्याच धर्माच्या अभिमानाखातर आम्ही अमानुष बनत आहोत ! आज थमलेली दंगल ही उद्याच्या शांततेची हमी नाही ! □

# मुक्ताफळे

## प्रिय अनामिक गुंडा !

स्वतंत्र भारतात जो धर्मातीत समाज बांधण्याचे मनसुबे रचीत होतो, ते भिवंडीत जळून खाक झाले. पुण्याच्या 'साधना'काराचे हे जळजळीत उद्गार गुंडा तू वाचलेस का? हे सर्व तू केलेस याची तुला जाणीव आहे का? जगात एकाही देशात जे गुंड करू शकले नाहीत, ते भारतीय गुंडा, तू केलेस! खरं म्हणजे 'माझ्या देहावरूनच देशाची फाळणी होईल' म्हणणारे जेव्हा गुंडांना शरण गेले, तेव्हाच धर्मातीत समाज बांधण्याचे मनसुबे जळून खाक झाले होते. आता जे घडले त्यापेक्षा वेगळे का 'नोआ-खलीत' घडले होते? एकदा खाक झाले, ते खाका वर करून 'खाक झालेच नाही' हे सांगण्यात आम्ही पस्तीस वर्षे घालवली आणि ते पुन: पुन: खाक करण्याचे काम गुंडा, तू करीत आहेस याची तुला जाणीव आहे का? नेहमी लिहितात ते सर्वांनी लिहिले– 'गुंडांना धर्म नसतो!' हा तुझा अपमान आहे! आम्ही गुंड नसलेले सगळे धर्मातीत झालो असताना, तुला धर्मातीत होता आलेले नाही, असे खरे म्हणजे आम्हाला म्हणायचे असते. गुंडा, तुला धर्म आहे. शिवाजीमहाराजाची मिरवणूक निघाली तर तुला राग येतो! तुझे म्हणणे, जे धर्मातीत आहेत त्यांनी अशा मिरवणुका का काढाव्या? पण तुला सांगितलं ना की जे फाळणी होतानाच खाक झाले, ते 'खाक झाले नाही' असे सांगण्याचे आमचे व्रत आहे आम्ही बोलणार एक, करणार दुसरेच याबद्दल खरं म्हणजे तू आम्हाला क्षमा का करत नाहीस?

गुंडा, हे पहा नानासाहेब गोरे काय लिहितात–

'हे जातीय वैमनस्य व जातीय दंगे कधीच बंद होणार नाहीत काय? ज्या काळी असे दंगे झाल्यानतर, त्याचे खापर ब्रिटिशांच्या डोक्यावर फोडून मोकळे होत असू, त्या काळात आम्ही वाढलो. आम्हीही या घटनांबद्दल इंग्रजांना दोष देणाऱ्यातच होतो. आता इंग्रज जाऊन ४० वर्षे लवकरच होतील; पण दंगे कमी होत नाहीत.'

वृद्धापकाळाकडे झपाट्याने चाललेल्या पुढाऱ्यांना गुंडा, तू किती बरे मानसिक क्लेश देतोस? अच्युतराव पटवर्धन तर पंधरा वर्षांपूर्वीच सांगून मोकळे झाले– 'आम्हाला हिंदू–मुसलमान प्रश्नातले काही कळले नाही.' कसे कळणार? ज्यांना कळत होते त्याना आम्ही जातीय–जातीय म्हणून लाखोल्या वाहिलेल्या आणि ज्यांना कळत नव्हते त्याचे पुतळे उभारले. फाळणी मुसलमान गुंडानी केली हे अगदी खरे आहे. जेव्हा प्रतिकारार्थ हिंदु गुंडांनी शस्त्र उपसले तेव्हा फाळणी करता काही मुसलमान गुंड धारातीर्थी पडले! गुंडा, तुझी ही कामगिरी सर्व विचार-वंतांना मान्य असताना तू ती पुन: पुन: सिद्ध करण्याची धडपड का करतोस? या नानासाहेबानीच पुण्यात जाहीर व्याख्यानात –'फाळणी अपरिहार्य होती!' असे सांगित-लेले गुंडा, तू ऐकले नाहीस का? फाळणी अपरिहार्य; कारण मुसलमानांची गुंडगिरी अपरिहार्य, सुरामारी, बलात्कार, जाळपोळ अपरिहार्य. म्हणून तर इलस्ट्रेटेड विकलीचे विद्वान संपादक प्रिथिश नंदी लिहितात.

'many more Bhiwandis & Moradabads, many more Nellies will keep occuring.'

म्हणजे अनेक भिवंडी, अनेक मोरादाबाद, अनेक नेल्ली सतत होत रहाणार! गुंडा, हे हे तुला शोभते का? भिवंडी येथे जातीय (?) अथवा धार्मिक द्वेषापायी जी हिंसा झाली, तिचे यथातथ्य वर्णन करण्यास काही विचारवंतांजवळ शब्द नाहीत. श्री. देवरसां-वर दुगाण्या झाडायला शब्द आहेत, सावर-करांची जातीय म्हणून हेटाळणी करायला शब्द आहेत; पण या हिंसाचाराच्या वर्णनाला शब्द नाहीत. आमच्याजवळ मात्र गुंडा, तुझ्या यथातथ्य चित्रणाला शब्द नाहीत. गुंडा, तू दिसतोस कसा? तू डोक्याचा गोटा करतोस की केस वाढवतोस? देवळात जातोस की मशिदीत नमाज पढतोस? सुरा वापरतोस की चाकू? बंदूक वापरतोस की स्टेनगन? तू पोटासाठी काय करतोस? अर्थात हे प्रश्न तुझ्या दृष्टीने गौणच आहेत; पण तुझी कर्तबगारी ही इतिहासात अजरामर होणारी आहे. म्हणून वाटते तुला एकदा पहावे! 'पाकिस्तान' हे तर तुझे स्मारक आहे, कर्तृत्व आहे. उद्या कदाचित 'खलिस्तान', 'दुसरे पाकिस्तान' करणे तुला जमणार नाही असे नाही. तिबेट, चीन आणि रशियात लाखो मुसलमान रहातात; पण तिथे गुंड नाहीत की धार्मिक दंगल नाही. यापुढे त्या देशात गुंडांची स्मारके शक्य नाहीत. तुम्ही काही जण तिकडे का जात नाही? त्या रशियाने, अफगाणिस्तानात मुसलमानांचे शिरकाण चालवलेले आहे, याचा कसा कुणाला राग येत नाही? चीनमध्ये मशिदीची अवस्था काय आहे याचा कसा तू विचार करीत नाहीस? मुसलमान गुंडासाठी ही कार्यक्षेत्रे आम्ही सुचवली. कारण हिंदु गुंडाना जायला दुसरा देशच नाही. नाही तर त्यांना पण आम्ही मार्गदर्शन केले असते.

गुंडा, आम्हा धर्मातीत, अहिंसाप्रेमी, राष्ट्र-प्रेमी, निधर्मी, एकात्म भारतीय राष्ट्राच्या उभारणीसाठी अहोरात्र खटपट करणाऱ्या सर्वांना तू अधिक कार्य करूच देणार नाहीस का? तुझी कर्तबगारी आम्हाला मान्य आहे. भिवंडीत १४ वर्षे शिवाजीमहाराज वन-वासात होते. आता पुन: १४ वर्षे त्याना हद्दपार करण्याचे काम तू बजावले आहेस! गुंडा, आमच्यावर दया कर आणि कर्तबगारी मान्य करणाराना पुन: पुन: काही करू नकोस. आम्ही तुला शरण आहोत!

–ग्यानबा


मराठीतील एक सच्चे आत्मचरित्र

हंसा वाडकर

**सांगत्ये ऐका**

चौथी आवृत्ती

मूल्य : १४ रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ३०

राजधानी दिल्ली

# सखाराम बाइंडर —हिंदी

विजय तेंडुलकर हे नाव मराठीइतकेच हिंदी नाटयरसिकाना परिचयाचे आहे. मुळात हिंदी रंगभूमीचा आवाका बेताचाच. व्यावसायिक रंगभूमीची परंपरा इथे विकसित झालेली नाही. त्यामुळे मराठी आणि बंगाली नाटकांविषयी इथे विलक्षणच दबदबा. त्यात विजय तेंडुलकरांना विशेष महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. त्यांची 'अशी पाखरे येती' ('पंछी ऐसे आते हैं') आणि 'एक हट्टी मुलगी' ('एक जिद्दी लडकी') ही दोन नाटके तर इकडे अतिशयच लोकप्रिय आहेत. त्यांचे प्रयोग वारंवार होत असतात. याखेरीज 'शांतता! कोर्ट चालू आहे', 'बेबी', 'गिधाडे' आणि 'सखाराम बाइंडर' ही नाटके विशिष्ट नाटयाभिरुचीच्या वर्गात लोकप्रिय आहेत.

अजूनपर्यंत तेंडुलकरांच्या एखाद्या नाटकाच्या हिंदी रूपांतराचा प्रत्यक्ष प्रयोग पाहण्याचा योग मात्र आला नव्हता. मार्चमध्ये हिंदी नाटयमहोत्सव झाला. त्यात 'सखाराम बाइंडर'चे दोन प्रयोग झाले; पण तेव्हा ऐनपरीक्षाच्या गर्दीमुळे जमू शकले नाही. त्यामुळे आता 'श्रीराम सेंटर फॉर आर्ट अँड कल्चर'ने लागोपाठ चार दिवस 'सखाराम बाइंडर'चा प्रयोग लावल्यावर तो पाहणे ओघानेच आले. सरोजिनी वर्मा यांनी नाटकाचे हिंदी भाषांतर केले असून दिग्दर्शन आणि नाटयरचना राजेंद्रनाथ यांची आहे. प्रत्येक भूमिकेकरिता दोन दोन पात्रे तयार आहेत. म्हणजे सखारामची भूमिका कधी संजीव सुहास करतात तर कधी ज्ञानेश मिश्र करतात. लक्ष्मी सीमा भार्गव अथवा प्रतिमा काझमी रंगवतात. दाऊदच्या भूमिकेत मनोज शर्मा अथवा परवेज आलम असतात. चंपा कधी सपना अवस्थी तर कधी प्रतिमा काझमी सादर करतात. शिंदे फौजदाराच्या भूमिकेत मात्र कैलाश कौशिकच नेहमी दिसतात.

चारी दिवस प्रयोग हाउसफुल्ल होता. प्रेक्षकवर्ग उच्च मध्यमवर्गीय किंवा उच्चवर्गीय. मॉड वेषातले कॉलेज–स्टुडंटस्, हाय सोसायटीतल्या बायका (आणि त्यांचे बिचारे नवरे) वगैरे. नाटकाविषयी इंग्रजीमध्ये थोडक्यात कल्पना देणारे फोल्डर तिकिटासोबतच वाटलेले. त्याकडे दृष्टी टाकत नाटकाच्या प्रयोगाविषयी इंग्लिशमध्ये शेरे मारणे हा सर्वांचाच आवडता चाळा. 'Vijay Tendulkar's play that made history' या माहितीपत्रकावरील शीर्षकामुळे कोणाचे औत्सुक्य चाळवलेले, कोणाला नाटकाचे एकदरच 'presentation very daring' वाटत असलेले, कोणाला चंपाच्या खुनाचा प्रसंग 'horrible and astonishing' वाटणारा तर कोणाला लक्ष्मीचे मुंगळ्या–कावळ्याशी बोलणे 'how poetic' वाटत असलेले. एक मात्र खरे की, नाटकातल्या योग्य 'जागां'ना बहुसंख्य प्रेक्षक योग्य दाद देत होते. अस्थानी हशा अथवा सदर्महीन चावट शेरे अजिबात आढळून येत नव्हते.

गिरधारीलाल आणि सुधीर पारिक यांनी उभा केलेला सेट वास्तवदर्शी होता. सखाराम बाइंडरचे घर खरेखुरे वाटत होते. बारीकसारीक तपशिलाकडे चांगले लक्ष पुरविलेले दिसत होते. स्टेजच्या डाव्या हाताला 'आतली खोली' होती. पिंजऱ्यासारख्या उभ्या कामट्या लावून तिचे वेगळे अस्तित्व उभे केले होते. त्यातच एका कोपऱ्यात स्वयंपाकाचे, चहापाण्याचे सामान होते. स्टेजच्या मधोमध बाहेर जाण्यायेण्याचा दरवाजा होता. स्टेजच्या उजव्या अर्ध्या भागात 'बाहेरची खोली' होती. तिच्यातच भिंतीवरच्या एका फळीवर सखारामचा मृदंग ठेवलेला होता. स्टेजच्या अगदी डाव्या कोपऱ्यात पुढे, म्हणजे 'आतल्या खोली'च्या बाहेरच्या बाजूला मोरीची कल्पना केलेली होती. 'बाहेरच्या खोली'मध्ये दोन लेव्हल्स केलेल्या होत्या.

पात्रांची रंगभूषा तर पराकाष्ठेची वास्तव होती. विशेषत: सखाराम आणि लक्ष्मी तर खरोखरीच एखाद्या झोपडपट्टीतून धरून आणल्यासारखी वाटत होती. दाऊद आणि शिंदे याची वेषभूषा 'परफेक्ट' होती. (चंपाच्या वेषभूषेच्या बाबतीत मात्र मतभेदाला वाव होता.)

पडदा वर गेल्याबरोबर दिसणारा वास्तवदर्शी देखावा आणि अगदी परिपूर्ण वास्तव वेषात झालेली सखाराम आणि लक्ष्मीची एंट्री यामुळे निर्माण झालेल्या अपेक्षा मात्र संवादाला प्रारंभ होताच धडाधड कोसळल्या. नाटकाच्या संवादांची नस हिंदी भाषांतराला पकडता आलेली नाही. तेंडुलकरांचा सखाराम ब्राह्मण आहे. त्याच्या तोडची भाषा सदैव शिवराळ ('तोंडात शिवी आणि बिडी कायम!') असली तरी ती ग्रामीण भाषा नाही. खेड्यातल्या माणसाचे हेल सखाराम आणि लक्ष्मी दोघांच्याही बोलण्यात येत नाहीत. निळू फुले यांनी सादर केलेला मराठी सखाराम गुर्मीत बोलतो, शिवीगाळ करतो; पण त्याच्या भाषेचे व्याकरण ग्रामीण बोलीचे नाही. भाषेचा थोडासा अशुद्धपणा किंवा हलकेपणा प्रगट होतो तो लालन सारंग यांच्या चंपामध्ये आणि भूमिकाचा सारासार विचार करता ते अगदी योग्य वाटते. हिंदी भाषांतरात मात्र नेमकी याच्या उलट स्थिती झाली. सखाराम आणि लक्ष्मी दोघेही नागरी हिंदी बोली न वापरता 'देहाती बोली' वापरताना दाखवले आहेत. त्या दोघांचेही संस्कार पूर्णत: झोपडपट्टीतले किंवा 'गावाकडचे' असावेत, असे त्यांच्या बोलीवरून वाटते आणि त्यामुळे सखारामच्या उफराटया नीतिमूल्यांची बेदरकार बंडखोरी त्यांच्या भाषेतून उभीच राहू शकत नाही. लक्ष्मीचा सोशिक हळवेपणा तिच्या बोलीशी सुसंगत वाटत नाही. उलट चंपाची भाषा मात्र खानदानी वळणाची आणि शुद्ध दाखवलेली आहे. त्यामुळे तिचा मुजोरपणा, नि:संगपणा आणि तिच्या व्यक्तिमत्त्वाची धग प्रगट होऊ शकत नाही.

### लक्ष्मीचं नाटक

एकूणच सखाराम, चंपा आणि दाऊद ही तीन पात्रे हिंदी प्रयोगात निराशाजनक

वाटली. सखारामच्या भूमिकेचे विविध पैलू समर्थपणाने व्यक्त झाले नाहीत. त्याची अरेरावी, आपण स्वतःच राजे आहोत हा त्याच्या डोक्यातला दिमाख, त्याची कामांधता, त्याचा उतावळेपणा यापैकी काहीच भेदकपणे साकार होऊ शकले नाही. मृदंगाच्या बोलांतून मनातल्या कोंडलेल्या भावनांना वाट करून देण्याचे कसब तर दूरच राहिले. हिंदी प्रयोगातला सखाराम ओढूनताणून आव आणलेला, रस्त्यावर खेळ करणारा डोंबारी वाटला. चंपाची भूमिकाही खऱ्या अर्थाने किंवा खऱ्या ताकदीने उभी राहू शकली नाही. दिसण्यातले सौंदर्य आणि निर्लज्ज धीटपणा येवढ्या दोनच गुणांच्या आधारावर ही भूमिका उभी राहणे तसे अशक्यच. चंपाची रासवट बेफिकिरी, तिच्या सौंदर्यातले अनिवार आव्हान, तिच्या दारू पिण्यातली अपरिहार्यता आणि दारू प्यायल्यानंतरच्या तिच्या उद्रेकातील स्वाभाविकता या सगळ्या गोष्टी हिंदी प्रयोगात शोधूनही सापडण्यासारख्या नव्हत्या. दाऊदचे पात्र तर शालेय रंगभूमीवरून उचलून आणल्यासारखे वाटत होते..

महत्त्वाच्या तीन पात्रांनी केलेल्या या अपेक्षाभंगाच्या पार्श्वभूमीवर शिंदे फौजदार आणि लक्ष्मी ही दोन पात्रे (वाजवीपेक्षा) जास्तच प्रभावी वाटली. चंपाच्या हातून मार खाण्यासाठी आसुसलेला विकृत, दारुडा षंढ शिंदे फौजदार कैलाश कौशिक यांनी हुबेहुब साकार केला. त्यांची प्रत्येक हालचाल आणि मुद्राभिनय त्या भूमिकेला न्याय देणारा होता. लक्ष्मीच्या भूमिकेने तर नाटक खाऊनच टाकले. भाषांतरकर्त्रीने वापरलेली अनुचित 'देहाती बोली' लक्षात घेऊनही, भूमिकेचे सगळे गहिरे पैलू अतिशय समर्थपणे उभे राहिले. नाटकाच्या सुरुवातीला भेदरलेली लक्ष्मी, मुंगळ्याशी–कावळ्याशी लाघवीपणाने बोलणारी भाउक लक्ष्मी, सखारामचा मार खात कळवळणारी केविलवाणी आणि स्वतःची काही मूल्ये निरागस श्रद्धेने उराशी जपणारी लक्ष्मी...ही सगळी रूपे इतक्या विलक्षणपणाने सादर केली गेली की, हे नाटक 'श्रीराम कलासंस्कृति केन्द्रा'मध्ये आलेल्या हिंदी भाषिक प्रेक्षकांच्या दृष्टीने लक्ष्मीचे नाटकच ठरले. भूमिका जगणे म्हणजे काय याचा तो सुंदर वस्तुपाठ होता.

मनात आले, लक्ष्मीची भूमिका ही भारतीय स्त्रीत्वाची प्रातिनिधिक भूमिका आहे आणि सखारामची भूमिका ही जगावेगळी, मुलखावेगळी एकारलेली भूमिका आहे, हे तर त्या त्या भूमिकांच्या यशापयशांमागील कारण नसेल? भारतातील कोणत्याही भाषेच्या रंगमंचावर सामर्थ्यशील अभिनेत्री लक्ष्मीच्या भूमिकेशी ज्या प्रमाणात समरस होऊ शकेल, त्या प्रमाणात सखारामच्या भूमिकेशी समरस होणे मराठीतर अभिनेत्याला तो कितीही कसदार अभिनेता असला तरी–जरा कठीणच जाणार, यात शंका नाही. सखारामच्या भूमिकेत पिढ्यानपिढ्यांच्या महाराष्ट्रीय संस्कृतीच्या ताणाबाण्यांचा जो गुंता झालेला आहे, तो उलगडून समजावून घेणे ही सोपी गोष्ट नाही. सखारामचा शिवराळपणा आणि आत्मस्ताळेपणा हा विविध सांस्कृतिक आणि व्यक्तिसापेक्ष जीवनसत्यांचा एकत्र परिपाक आहे. महाराष्ट्रात मुरलेल्या मराठी भाषिकांनाही त्याचे यथार्थ आकलन जिथे होत नाही, तिथे परभाषिक परप्रांतीयांना ते होण्याची आशा कितपत बाळगता येईल? निळू फुले, लालन सारंग आणि मंडळींचा मराठी प्रयोग जेव्हा प्रथम पाहिला होता, तेव्हा अस्वस्थतेचा भुंगा नंतर किती तरी दिवस मनाला पोखरीत राहिला होता. सखाराम, लक्ष्मी, दाऊद, चंपा आणि शिंदे ही सर्व पात्रे परिचयाच्या जिवंत माणसांप्रमाणे पुन्हापुन्हा मनापुढे येत होती, बोलत होती, प्रश्नचिन्हे उभी करीत होती. हिंदी प्रयोग परवा पाहिल्यानंतर लक्षात राहिली ती केवळ लक्ष्मी. तिने देखील अस्वस्थ केले तरी प्रश्न उभे केले नाहीत.

तरीदेखील, या अपरिपक्व प्रयोगानेदेखील नाटककार म्हणून विजय तेंडुलकरांच्या महानतेची थोडी तरी झलक हिंदीभाषिकांना दाखवली यात शंका नाही. अशा अनुवादकृती आणि त्यांचे नाटयप्रयोग ही एक फार आवश्यक गरज आहे, हे त्यामुळे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. विविध भाषांतील कलाकृती हा जर सामायिक भारतीय संस्कृतीचा अविभाज्य वारसा बनवायाचा असेल, तर त्याशिवाय गत्यंतर नाही. परभाषिक प्रेक्षक त्यासाठी आतुर आहेत. शिरवाडकरांचे 'नटसम्राट' आणि खानोलकरांचे 'कालाय तस्मै नमः' यांचे पंजाबीमधील अनुवाद अत्यंत उत्कृष्ट आहेत आणि पंजाबीभाषिकांमध्ये अल्पावधीत लोकप्रिय झालेले आहेत. मागे आमच्याकडे दिल्ली विद्यापीठात 'अश्रूंची झाली फुले' एम. ए. ला लावले होते, तेव्हा हिंदी भाषिक विद्यार्थ्यांना ते किती प्रभावी वाटत असे, हे आम्ही अनुभवले आहे. सुनीता कट्टी यांनी या नाटकाचा सुरेख हिंदी अनुवाद केला आहे; पण हिंदी रंगमंचावर मात्र ते नाटक आले नाही. दळवींचे 'संध्याछाया' हिंदीभाषिकांत खूपच लोकप्रिय आहे. ही यादी आणखी वाढली पाहिजे. मराठीतून हिंदीकडे नाटयानुवादाचा सातत्यपूर्ण प्रवाहच सुरू झाला पाहिजे. तसा प्रवाह चालू राहण्याइतकी मराठी रंगभूमी समृद्ध आहे आणि तसा प्रवाह रिचवून घेण्यासाठी हिंदीची भूमी आसुसलेली आहे.

–निशिकांत मिरजकर




# फरुक अब्दुल्लाचे मंत्रिमंडळ कोसळणार ?

अभय गोखले

शेख अब्दुल्लाचे सुपुत्र डॉ. फरुक अब्दुल्ला याचे जम्मूकाश्मीरचे मंत्रिमंडळ नजीकच्या भविष्यात गडगडल्यास आश्चर्य वाटावयास नको. शेख अब्दुल्लाचे सुपुत्र व त्याचे जावई ( जी. एम. शहा ) यांच्यात शेख यांच्या हयातीतच गादीकरिता भांडणे सुरू होती. नंतर शेखसाहेबानी आपला कौल फरुक याच्या बाजूने दिल्यावर फरुक अब्दुल्लांचा मार्ग सोपा झाला; पण तो सुकर नव्हता. शेखसाहेबां-इतकी लोकप्रियता डॉ. फरुक मिळविणे शक्यच नव्हते. तरीसुद्धा फरुक यांनी १९८३ च्या जम्मूकाश्मीर विधानसभेच्या निवडणुकीत कॉंग्रेस (इ) चा दणदणीत पराभव करून आपली ताकद दाखवली. इंदिरा गांधींनी बराच आटापिटा करून शेखसाहेबांच्या पश्चात नॅशनल कॉन्फरन्सचा पराभव करून जम्मूकाश्मीरवर पुन्हा एकदा आपला झेंडा फडकावण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याना निराशाच पत्करावी लागली. काश्मीरच्या खोऱ्यात कॉंग्रेस (इं) ला जेमतेम एकच जागा जिंकता आल्याने सत्तेवर येण्याचे त्याचे मनसुबे सफल झाले नाहीत. जम्मूत आपला पक्ष हिंदूचा कैवारी आहे असे दर्शवून कॉंग्रेस (इं) ला बऱ्याच जागा मिळाल्या; परंतु एकंदर शेख अब्दुल्लाच्या फॅमिलीला वैतागलेल्या हिंदूनी त्या फॅमिलीची सत्ता संपवण्याकरिता कॉंग्रेस (इं) ला (नकारात्मक) भरघोस मतदान केले. फरुक अब्दुल्ला व त्याच्या नॅशनल कॉन्फरन्सला सत्तेवरून खाली खेचण्यासाठी जम्मूकाश्मीरमधील हिंदूंना कॉंग्रेस ( इं ) ला मतदान करण्याशिवाय पर्यायच नव्हता व तेच त्यानी केले. अर्थात हा पराभव ( जम्मूकाश्मीरातील ) कॉंग्रेस (इं) च्या जिव्हारी लागला असून फरुक निवडून आल्यादिवसापासून त्याचे मंत्रिमंडळ गडगडवण्याचे प्रयत्न इंदिरा कॉंग्रेसकडून होत आहेत.

फरुक म्हणजे काही गुणाचा पुतळा नव्हे. जम्मूकाश्मिरात विधानसभा निवडणुकीत प्रचंड यश मिळविण्याकरिता नॅशनल कॉन्फरन्सकडून बनवाबनवीचे बरेच प्रकार करण्यात आले हे नंतर बाहेर आलेच. अर्थात त्या बाबतीत तक्रार करण्याचा इंदिरा कॉंग्रेसला कसा काय हक्क पोचतो ? आसाममध्ये विधानसभेच्या निवडणुकीत इंदिरा कॉंग्रेसने काय केले ? फरुकला सतावण्यासाठी मग निरनिराळे उपक्रम जम्मूकाश्मिर कॉंग्रेसने हाती घेतले. काही निरर्थक गोष्टीवरून आंदोलन करण्यात आले व त्यात बराच हिंसाचार घडून आला. मात्र त्याची कारणमीमांसा देताना विरोधी पक्षाना तसे करण्याचा (लोकशाही) हक्क आहे अशी ती करण्यात आली. मात्र इतर राज्यांत जेथे इंदिरा कॉंग्रेस सत्तेवर आहे तेथे विरोधी पक्षांनी आंदोलन केले तर विरोधक राज्याच्या प्रगतीत अडथळा उत्पन्न करत आहेत अशी पोपटपंची करण्यात येते. श्रीनगरला क्रिकेटचा एक दिवसाचा सामना भारत व वेस्टइंडीज यांच्या दरम्यान घेण्यात आला. तेव्हा तेथील काही भारतद्वेष्ट्या (पाकिस्तानवादी) समाजकंटकांनी भारत विरोधी घोषणा दिल्या. असा प्रकार तेथे नेहमीच घडतो. अशा भारतविरोधी घोषणा, देशविरोधी कृत्ये शेखसाहेबांच्या कारकीर्दीत, मीरकासीम यांच्याही कारकीर्दीत घडत होती; परंतु त्याचा फारसा गवगवा करण्यात आला नाही किंवा त्याबद्दल जोरदार निषेधही व्यक्त करण्यात आला नाही फार तर काही फाजील उत्साही लोकानी हे कृत्य केले असावे, तिकडे फारसे लक्ष देण्यात अर्थ नाही, असे म्हणून प्रकरण सोडून देण्यात येत असे; परंतु फरुक, कॉंग्रेस (इंदिरा) विरोधी भूमिका घेतो, विरोधी पक्षाच्या ऐक्य परिषदांना हजर रहातो, मग त्याचा राग काढण्याकरिता हे बरे कारण मिळाले, असे समजून मग फरुक अशा शक्तींना उत्तेजन देतो, त्याचा निषेध करत नाही, त्याचा बंदोबस्त करण्यासाठी त्वरित पावले उचलत नाही अशी कॉंग्रेस (इ)-कडून जोरदार टीका झाली. भारतात राहून भारतविरोधी घोषणा देणाऱ्यांना, भारतविरोधी कृत्ये करणाऱ्याना कडक शासन व्हावयास हवे. त्याना कोणी पाठीशी घालण्याचा प्रयत्न केल्यास त्या व्यक्तीवर टीकाही व्हावयास हवी, अगदी गदारोळ माजवावयास हवा; पण त्यात सुसंगती हवी. जर फरुक कॉंग्रेस (इं) च्या बाजूने असता तर श्रीनगर प्रकाराचे इंदिरा कॉंग्रेसवाल्यानी भांडवल केलेच असते असे सांगता येणार नाही. एखाद्या भाजपसारख्या पक्षाने याविरुद्ध आवाज उठवला असता तर ते मुस्लिमविरोधी आहेत, जातीयतावादी आहेत असा त्यांच्यावर स्टॅंप मारून ते प्रकरण निकालात निघाले असते. भारतविरोधी घोषणा देणारे बाजूलाच राहिले असते. काश्मिर खोऱ्यातील बहुसंख्य मुसलमानानी इंदिरा कॉंग्रेसला मते दिली नाहीत, ही गोष्ट इंदिरा कॉंग्रेसला फारच लागून राहिली आहे, ही गोष्ट पुन्हा एकदा स्पष्ट करायची आहे.

## बहीण विरुद्ध भाऊ

निरनिराळ्या आंदोलनानी फरुक हटत नाही व आपली कॉंग्रेस (इ) विरोधी भूमिका सोडत नाही हे पाहिल्यावर मग कॉंग्रेस (इं)ने नॅशनल कॉन्फरन्समधील असंतुष्टांना हाताशी धरले. फरुक हा केंद्रावर टीका करतो हे एक कारण होतेच. शिवाय जनता पक्ष, बहुगुणा, शरद पवार, मीर-कासीम, एन. टी. रामाराव हे निरनिराळ्या ठिकाणी ज्या फासिस्ट ऐक्यपरिषदा भरवतात त्यात ।

फरुक हजर रहातो व त्याच्या नादाने केंद्रविरोधी भूमिका घेतो स्वत.ची देशातील मुस्लिमांचा नेता अशी प्रतिमा तयार करतो या सर्व गोष्टी कांग्रेस (इंदिरा) ला भडकवण्यास पुरेशा आहेत. सध्या फरुकला घरातील राजकारण्याकडून बराच त्रास होतोय. त्यामागे इंदिरा कांग्रेसचा हात आहे. शेखसाहेबानी मोठया मुलाची बाजू उचलन घरल्यावर मोठे जावई जी. एम. शहा नाराज झाले व त्याच्या फरुकविरोधी कारवाया सुरू झाल्या. श्री. शहा याची पत्नी बेगम खलिदा (शेखसाहेबाची ज्येष्ठ कन्या) सुरुवातीला भाऊ व नवरा याच्या वादात फारसे लक्ष घालत नव्हती; परतु काही दिवसापूर्वी तिने आपल्या पतीला भावाच्या विरोधात उघड पाठिंबा देऊन फरुकविरोधी तोफ डागली. फरुकविरोधी आघाडी उघडल्यावर बंडखोराची ददात नव्हती. ददात होती ती आमदाराची पक्षविरोधी कारवायांबद्दल फरुकने डी. डी. ठाकूर (माजी अर्थमंत्री) टिक्कु (आणखी एक माजी मत्री) यांची पक्षातून हकालपट्टी केली होती. हे शेखसाहेबांच्या अगदी जवळचे समजले जात. जी एम. शहा याना आता एकेकटे वाटण्याचे कारण नव्हते; परंतु त्यानी घाई केली नाही. त्यानी फरुकविरोधी वातावरणाची चाचपणी केली. राज्यात अनेक दौरे केले त्यात त्यांच्या पत्नीने (फरुकची बहीण) त्याना चागली साथ दिली. यामुळे फरुक गप्प बसणे शक्य नव्हते. काही झाले तरी तो शेवटी शेखसाहेबाचाच मुलगा होता. त्याने शहा व त्यांची पत्नी याच्या दौऱ्यात व कार्यक्रमात विघ्ने आणण्यास सुरुवात केली. शहा व त्याच्या पत्नीच्या गाडीवर नॅशनल कॉन्फरन्सच्या कार्यकर्त्यानी हल्ले केले, तेही पोलीससंरक्षणात. त्याच्या गाडीचा मार्ग नॅशनल कॉन्फरन्सच्या कार्यकर्त्यांनी रोखून घरला. त्यांच्या सभामध्ये गोंधळ माजवून त्या उधळून लावायचा प्रयत्न झाला. अशा प्रकारे शहा व त्याच्या पत्नीला जबरदस्त दहशत बसवण्याचे प्रयत्न करण्यात आले; परंतु शहा व त्याची पत्नी या प्रकाराना बधले नाहीत. त्याची फरुकविरोधी भूमिका आणखीनच प्रखर बनली. शहा व त्याच्या पत्नीला आणखी एका शेखसाहेबांच्या परिवारातील व्यक्तीने साथ दिली. ती व्यक्ती म्हणजे शेखसाहेबांचे चिरजीव व फरुक याचे धाकटे बधू तारीक अब्दुल्ला हे होत. ज्या तारीक अब्दुल्ला यांची तळी इंदिरा कांग्रेसवाले आज उचलून धरत आहेत, त्यानी काही देशविरोधी कृत्ये मागे केली आहेत याचा इंदिरा कांग्रेसवाल्याना सोयिस्करपणे विसर पडलेला दिसतोय. फरुक अब्दुल्लांना झोडपण्यासाठी कोणाची मदत घ्यावी याचा विधिनिषेध बाळगण्याची इंदिरा कांग्रेसवाल्यांना बहुधा गरज भासत नसावी, याबाबतीत त्यांच्या वर्तनात नेहमीच सुसंगती आढळते.

फरुकच्या तथाकथित अत्याचारी राजवटीला कटाळून आता जी. एम. शहा यानी आपल्या पत्नीच्या मदतीने नुकतीच एक परिषद भरवून फरुक अब्दुल्लासकट काही लोकाची नॅशनल कॉन्फरन्समधून हकालपट्टी केली आहे व आपला गट प्रतिनिधित्व करत असलेली नॅशनल कॉन्फरन्स असली असल्याचा दावा केलाय. पक्षविरोधी कारवायांबद्दल अधिकृत नॅशनल कॉन्फरन्सने ११७ राज्यसमितीवरील सदस्यांची हकालपट्टी केल्याचे जाहीर केल्याने शहा व त्यांच्या सहकाऱ्यांच्या बंडखोरीला बराच पाठिंबा मिळाल्याचा निष्कर्ष काढावा लागेल; परतु बंडखोरांच्या परिषदेस एकही आमदार हजर राहिला नाही ही गोष्ट फरुकला समाधान मिळवून देणारी आहे. अगदी पक्षविरोधी कारवायांबद्दल ज्या एका आमदाराला पक्षातून निलबित करण्यात आले तोही बडखोरांच्या परिषदेस गैरहजर होता. शेवटी आमदाराच्या भूमिकेस सर्वात जास्त महत्त्व आहे. कारण ते फरुकचे भवितव्य ठरवणार आहेत. त्याचा पुरेसा पाठिंबा मिळाल्याशिवाय फरुकला सत्तेवरून खाली खेचता येणार नाही. फरुकला त्याच्याच भाषेत उत्तर देण्यासाठी व शेख परिवाराबद्दल असलेली लोकांची सहानुभूती आपल्याकडे खेचण्यासाठी बेगम खलीदा हिला असली नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्षपद देणे ओघानेच आले. हिंदूच्या पाठिंब्याकरिता डी. डी. ठाकूर यांना उपाध्यक्ष करण्यात आले आहे. या असली नॅशनल कॉन्फरन्सने फरुकवर जे आरोप केलेत ते फुटीर गट नेहमी जे आरोप करतो त्या पठडीतील आहेत. फरुक हे हुकुमशहा आहेत, त्याच्या राजवटीत राष्ट्रविरोधी शक्तीच्या हालचाली वाढल्यात, स्वतःच्या राज्याच्या विकासाकडे लक्ष द्यावयाचे सोडून विरोधी पक्षाच्या ऐक्यपरिषदातच त्यांना जास्त रस आहे, त्याच्या हलगर्जी कारभारामुळे जम्मू-काश्मिरात येणाऱ्या पर्यटकाची संख्या कमी झाली असून राज्याचे सर्वात मोठे उत्पन्न त्यामुळे कमी झाले आहे. शेखसाहेबानी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्याचा कारभार चाललेला नाही, वेगवेगळे निर्णय घेताना ते आपल्या सहकाऱ्यांचा सल्ला घेत नाहीत, त्यांच्या मनमानी कारभारामुळे नॅशनल कॉन्फरन्स ते बुडवावयास निघाले आहेत, ते केंद्राशी मुद्दाम संघर्ष घडवून आणत आहेत इत्यादी आरोप बेगम खलीदा यांच्या गटाकडून फरुक अब्दुल्लावर होत आहेत. या सर्व प्रकाराने इंदिरा कांग्रेसला आनदाच्या उकळ्या फुटत आहेत. मात्र इंदिरा कांग्रेसची डोकेदुखी इतकीच आहे की, शहा, ठाकूर व त्याचे साथीदार फरुकला खाली खेचण्यासाठी आवश्यक आमदार कसे, काय फोडणार? अजून तरी ते या प्रयत्नात अपयशी ठरले आहेत. ते जर आमदार फोडू शकले तरच बडखोरी करण्याच्या त्याच्या खटाटोपास काही अर्थ आहे. □


**दलित-दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा ' कथा-संग्रह ' देणे योग्य ठरेल ! दलित-दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलाना अत्यंत उद्बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते, ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बागुलाच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

—ग. रा. जाधव

(केसरी, रविवार, ६-२-८१)

# आंबेडकर भारत

लेखक : बाबुराव बागुल

राजहंस प्रकाशन, पुणे. मूल्य : २० रुपये.

# सहजीवन कसे व कुठे ?

गेल्या वर्षीच्या 'माणूस' दिवाळी अंकात 'श्रीकृष्ण–एक मोठे स्वप्न' या विषयावरील डॉ. श. शं. कुलकर्णी यांची चार पत्रे प्रसिद्ध झाली होती. या पत्रांचे चौफेर स्वागत झाले. याच दिवाळी अंकात आलेल्या शोभा भागवत यांच्या 'लग्न आणि सहजीवन' लेखाचेही वाचकांनी चांगले स्वागत केले. त्यातूनच या विषयावर एक परिसंवाद घेण्याची कल्पना पुढे आली. हा परिसंवाद जानेवारी महिन्यात पुण्यातील टिळक स्मारक मंदिरात घेण्यात आला. या परिसंवादाचे अध्यक्ष या पत्राचे लेखक डॉ. श. शं. कुलकर्णी हे होते व त्यांनी भारतीय संस्कृतीच्या दृष्टिकोनातून सहजीवन या कल्पनेचा विचार या परिसंवादात सांगितला. हाच विचार नातवंडांना लिहिलेल्या एका पत्रातून त्यांनी थोडा विस्तारपूर्वक मांडला होता. ते पत्र–

**प्रिय आनंद व श्याम,**

आज पुण्याहून मला एक पत्र आले आहे. तिथल्या टिळक स्मारक मंदिरात होणाऱ्या एका परिसंवादात 'सहजीवन–नवीन कुटुंब-व्यवस्था' या विषयावर बोलण्यासाठी मला निमंत्रण आहे. पुणे हे एक वेड्यांचे माहेरघर आहे. त्यातले काही जण भारताच्या पुरातन परंपरेतले तज्ज्ञ आहेत, पंडित आहेत, तर काही येणाऱ्या नव्या शतकाची तयारी करणारे शास्त्रज्ञ आहेत. या पुण्यात जसे कर्मठ वेदाध्ययनी ब्राह्मण आहेत, तसेच आगरकर,फुले यांच्यासारखे समाजसुधारकही आहेत. या पुण्यात ओरिएन्टल स्टडिज्ची इन्स्टिटयूटही आहे व फिल्म इन्स्टिटयूटही आहे. इथल्या या अनेक मंडळींना मी वेडे म्हणतो ते आदराने एक–एक ध्यास घेऊन त्याचा पाठपुरावा सतत आयुष्यभर करत राहण्याचे हे वेड. हे वेडे आहेत म्हणून पुण्याचे नाव पुण्यपत्तन (पुण्याचे नगर) आहे.

अशा या पुण्यातल्या सभेत बोलायचे तर जपून बोलावे लागेल; पण हा विषय–स्त्रीपुरुषांचे सहजीवन–तर असा आहे की, त्यात तर्कबुद्धीपेक्षाही मानवी भावनांचा, त्याच्या शारीरिक आणि आंतरिक गरजांचा भाग जास्त आहे. हे तर्कबुद्धीचे व भावनांचे आडव्या–उभ्या धाग्यांचे वस्त्र एका सभेत मला कितपत विणता येईल ? माझ्या मनात जे आहे ते संयमी शब्दांत कसे प्रगट करता येतील ? म्हणून वाटले की प्रथमतः तुमच्याशीच मन उघडे करावे.

पुरुषाला स्त्रीची गरज वा स्त्रीला पुरुषाची गरज कशासाठी लागते ? मिसूड फुटू लागले की मुलाची व वयात येऊ लागली की, मुलीची आपल्याच वयाच्या किंवा जरा मोठ्या मुलामुलींकडे बघण्याची दृष्टी बदलते म्हणजे काय होते ? ॲडम आणि इव्हला एकमेकांबरोबर बोलत ज्ञानवृक्षाचे फळ चाखावेसे वाटले ते का ? यात काही पाप आहे का ? यात काही माणुसकीची अवनती ( degradation ) आहे का ?

मला वाटते यात काही पाप नाही, अवनती नाही. हा पूर्णत्वाच्या प्रवासातला एक महत्त्वाचा टप्पा आहे. या अवस्थेतल्या कुमार–कुमारींच्या खेळाबद्दल मी एक वेगळे पत्र लिहिणार आहे. या पत्रात आपण शारीरिकदृष्टया पूर्ण पक्व झालेल्या ( Mature ) तरुण–तरुणींच्या संबंधाबाबतच बोलू. तर मला वाटते की, तरुण-तरुणींना एकमेकांची ओढ वाटणे यात पाप काहीच नाही– ते पुण्यच आहे– कारण त्यावर माणूसजातीची निर्मिती अवलंबून आहे. सहजीवनाची एकमेकांना मदत करीत तो पूर्णत्वाचा कैलासपर्वत चढण्याची ती सुरुवात आहे.

पण कित्येकजण या सुरुवातीच्या टप्प्यावरच अडखळून पडतात. 'आहार-निद्रा-भय-मैथुनं च' ही माणसात व प्राण्यात दोहोंतही आढळतात. मग माणसांत व प्राण्यांत फरक काय ? माणूस मैथुनाचे रूपांतर प्रेमात करतो; पण प्रेम म्हणजे काय ?

हिंदी सिनेमात प्रेम दाखवण्याचे प्रकार साधारण ठरलेले आहेत. बेडरूममधले मैथुन त्यांना दाखवता येत नाही. (पुढील काही वर्षांत कदाचित ही परिस्थिती बदलेलही) पण मग झाडांच्या रांगेतून नायक–नायिका पळापळीचा खेळ खेळतात. गाणे गात गात नदीच्या किंवा समुद्राच्या काठी नाच करतात आणि काही बुढ्ढे लोक म्हणतात काय हा तमाशा ! पण मला वाटते की, तरुण-तरुणींना मैथुनाचे प्रसंग असलेले सिनेमा जर वरचेवर दाखवत राहिले तर त्यांनाही कंटाळा येईल. मैथुन हे काही क्षणांचेच असते. सहजीवन हे दिवसरात्र घालवायचे असते मग त्याल विविधता लागते. त्या विविधतेला निसर्गाची साथ लागते, इतर मित्रमैत्रिणींची थट्टा लागते आणि अनेक बुढ्ढ्या लोकांच्या विरोधाचे लोणचेही लागते.

याचा अर्थ काय ? याचा अर्थ एवढाच की, माणूस केवळ ( Biological / Physiological ) प्राणीपातळीवर जगूच शकत नाही. ती गरज भागली रे भागली की, वरच्या पातळीवरच्या गरजा त्याला आव्हान करतात. मग त्याला 'ती' दिवाणखान्यातल्या वादविवादाकरता लागते. तिला 'तो' बागेत भटकण्यासाठी लागतो. थोडे टेक्निकल शब्दात बोलायचे तर त्याच्या वा तिच्या सामाजिक गरजा, माणूस–एक व्यक्ती म्हणूनच्या गरजा जागृत होतात. त्याला वाटते की, आपण एखाद्या धंद्यात प्रवीण व्हावे, कुशल कारागीर व्हावे, कलावंत व्हावे, शास्त्रज्ञ व्हावे. भोवतालच्या साऱ्या मंडळींनी या माझ्या धडपडीचे, श्रमांचे कौतुक करावे. या श्रमाची फळे मी त्यानाही देईन.

आश्रमाच्या सकल्पनेबाबतचे एक पत्र मी तुम्हाला लिहिलेच आहे. त्यात दाखविल्याप्रमाणे ब्रह्मचर्याश्रमात जी वैयक्तिक शारीराची व बुद्धीची वाढ होते ती गृहस्थाश्रमात अनेक शाखांनी फुलते–आणि या अनेक शाखाची वाढ–व्यक्तीच्या अनेक गुणाची–त्याच्यातल्या निरनिराळ्या अंगाची वाढ होण्याकरता गृहस्थाश्रम. स्त्रीपुरुषांचे सहजीवन !

मला एक जोडपे माहीत आहे. यातली स्त्री ही एक अतिशय हुषार विद्यार्थिनी होती. ती बी. एससी. ला त्या काळात –ज्या वेळी स्त्रिया सहसा सायन्सकोर्सेस घेत नसत त्या वेळी–पहिल्या वर्गात पास झाली. तिच्या नातेवाइकानी तिला सांगितले की, आता हवे तर पुढे शीक; पण तिने आपण पुढे शिकणार नाही असे सांगितले. आम्हाला कळेचना की ही असे का म्हणते. नतर काही वर्षांनी कारण कळले. तिचे ज्या तरुणावर प्रेम होते तो त्या बी. एस्सी. च्या परीक्षेत नापास झाला होता; पण ही बाई चिकाटीची. त्या तरुणाच्या मागे लागून तिने त्याच्याकडून अभ्यास करवून घेतला. त्याला एम्. एस्सी. केले आणि नतर त्याच्याबरोबर लग्नही केले. त्या वेळी माझे या मुलाबद्दलचे मत होते की, हा मुलगा सर्वसाधारण आहे. फारसा हुषार नाही. मनाने उमदा आहे, दिसायलाही देखणा आहे; पण आपण काही करू शकतो–मीही कोणी मोठा होऊ शकतो अशी काही जिद्द त्याच्यात नाही. त्याच्या लग्नानंतर बऱ्याच वर्षांनी हे जोडपे आम्हाला एकदा भेटले. त्या दोघात खूपच बदल झाला होता. तो मुलगा एक यशस्वी मॅनेजर होता. त्याच्या बोलण्याचालण्यात, प्रत्येक अंगविक्षेपात आत्मविश्वास होता. लग्नाच्या सुरुवातीच्या काळात बायको नोकरी करीत होती–संसाराला मदत म्हणून. आता तशी मुळीच गरज नव्हती आणि हा आत्मविश्वास, हे यश याचे मूळ कारण आपली बायको हे तो तरुण आनंदाने मान्य करीत होता. अर्थात् अशी उदाहरणे अनेक आहेत. माझ्याही आयुष्यातल्या कठीण निर्णयाच्या वेळी तुमच्या आजीनेच मला विश्वास दिला आहे, धीर दिला आहे. मी अमेरिकेत शिकायला गेलो तो या तुमच्या आजीच्या धीरावरच !

हे एकमेकाना धीर देत, पूर्णत्वाकडचा प्रवास करण्याचे सामर्थ्य एकमेकाना देत देत ज्या वेळी एखादे जोडपे जगत असते त्यालाच मी स्त्री-पुरुषांचे सहजीवन म्हणतो. या प्रवासातले टप्पे कोणते ? त्याचे एक कोष्टक मी खाली देतो :

पण प्रत्येक जोडपे असे एकमेकाच्या

**सहजीवन कुठे व कसे ? :– मानवी जीवनाच्या पातळ्या :**

| फिल्मी भाषेत | अमेरिकन भाषेत | वैदिक भाषेत | मराठी भाषेत |
|---|---|---|---|
| बेडरूममध्ये<br>झाडाच्या मागे<br>डायनिंग टेबलावर | Biological<br>and<br>Physiological<br>needs | अन्नमय<br>प्राणमय | प्राणीपातळी ←<br>यातली विकृती म्हणजे राक्षसी पातळी |
| दिवाणखान्यात<br>कार्यालयांत<br>कारखान्यांत<br>शेतांत | Social needs<br>e. g. ( belonging )<br>Ego needs<br>e. g. Self Esteem | मनोमय | मानवी पातळी ← |
| एकत्रित संशोधन<br>सौंदर्यनिर्मिती<br>करताना | Aesthetic and<br>Cognitive<br>needs | विज्ञानमय | ↓<br>आत्मसुखाय<br>कलावंत,<br>शास्त्रज्ञ |
| ? ? ? | Self Actuatisation<br>Whole person | आनंदमय | पूर्ण पुरुष<br>देवत्व<br>अर्धनारीनटेश्वर |

खांद्याला खांदा भिडवून चालते का? जुनी पद्धत तर अशी की; स्त्रीने पुरुषाच्या मागून चालायचे व तेही खाली मान घालून. पुरुषाचे फक्त पाय तिने बघायचे व त्यानुसार चालायचे. मान वर करून हा पुरुष कुठे चालला आहे हे धुंडाळायचे नाही, तपासायचे नाही. पतिव्रतेची व्याख्या पतीच्या पाठोपाठ जी नरकातही जायला तयार होते ती, अशीच काही कर्मठानी केली. अशा स्त्री-पुरुषसंबंधांना मी सहजीवन मानत नाही. अशा गाड्याच्या पाठीमागून ओढत नेण्यात आलेल्या स्त्रीला मी पतिव्रता मानीत नाही. आर्थिक उत्पादनाची साधने ज्या समाजात केवळ पुरुषांच्या हातात असतात, तेथे स्त्रियांना पुरुषांचे गुलाम व्हावे लागते, पायाची दासी व्हावे लागते. अशा स्त्री-पुरुषसंबंधावर जरी धार्मिक समारंभांतून अक्षता पडल्या असल्या तरी त्याला मी लग्न मानीत नाही. अशा अक्षता पडल्यानंतर घडलेले मैथुन हे दोन प्राण्यांच्या मैथुनापेक्षाही हीन. कारण तो अबलेवर केलेला बलत्कारच!

सहजीवनात स्त्री ही दासी नसते, सखी असते, मैत्रीण असते आणि पुरुष हा सखा असतो, मित्र असतो.

मला असेही एक जोडपे माहीत आहे की, त्यातली स्त्री शिक्षणखात्यात एका मोठ्या हुद्द्यावर काम करते आहे. ती हुशार आहे, कर्तबगार आहे. तिचा नवरा दुसऱ्या एका सरकारी खात्यात नोकरीला आहे; पण खालच्या दर्जाच्या. आज या स्त्रीला तिच्या हुद्द्यानुसार खात्याकडून मोठा ब्लॉक मिळाला आहे. मोटार, नोकर-चाकर मिळाले आहेत. तेव्हा ती तिच्या नवऱ्या-मुलांसह या साऱ्या सोयी उपभोगते आहे. अर्थात तिच्या कामासाठी तिला दिवसाचा बराच वेळ बाहेर काढावा लागतो, दौऱ्यावर जावे लागते, रात्रीच्या पार्ट्यांना हजर राहावे लागते.

नवऱ्याची ऑफिसची ठराविक ड्यूटी संपली की, त्याला घरी येता येते. मग तो घरची अनेक कामे सांभाळतो. मुलांची देखभाल करतो. त्यांच्या अडी-अडचणी, आलेल्या नातेवाईक-पाहुण्यांची सरबराई हा नवरा पाहतो.

माझ्या काही मित्रांना हे चित्र खटकते. त्यांना वाटते की, जणू ही बाई, पुरुषाची भूमिका घेते आहे व त्या नवऱ्याला तिने दास केले आहे; पण मला त्या दोघांचा एकमेकांविषयीचा आदर माहीत आहे. नवऱ्याचे तत्त्वज्ञानाचे, धार्मिक ग्रंथाचे वाचन, मनन चालू असते व त्यातून निर्माण झालेला शहाणपणा ( Wisdom ) या बाईच्या अनेकदा उपयोगी पडला आहे हे मान्य करायला या बाईला आनंद वाटतो, अभिमान वाटतो. त्याच्या दोन्ही मुलाना आपल्या आई-बापाबद्दल आदर आहे, प्रेम आहे; पण अशा तऱ्हेचे सहजीवन सगळ्याच पुरुषी अहंकाराला सहन होते असे नाही. मी पुण्याच्याच एस. पी. कॉलेजमध्ये शिकतानाची ही एक करुण कथा आहे. कॉलेजच्या मेसमध्ये जेवणाचा कंटाळा आला व थोडे पैसे वाचवावेत म्हणून एका कुटुंबात जेवायला जात असे. हे कुटुंब होते एका गोव्यात जन्मलेल्या कॅमेरामनचे. याने अनेक मोठ-मोठ्या फिल्मडायरेक्टरबरोबर काम केले होते. गोव्यात सहसा न आढळणाऱ्या गोऱ्या रंगाचा हा एक यशस्वी कलाकार होता; पण सततच्या रात्रंदिवस कामामुळे किंवा अन्य काही कारणामुळे तो ४० एक वर्षांचा असतानाच त्याची दृष्टी गेली. अर्थात कॅमेरामनचे कामही गेले. त्याची बायको अशिक्षित होती; पण गोव्याचीच असल्यामुळे स्वयंपाकात वाकबगार होती. नवऱ्याचे काम गेल्यावर ती त्याला म्हणाली की, तुम्ही काही काळजी करू नका. मी छान स्वयंपाक करते, आपण लोकांना जेवण घालू व त्या व्यवसायातून पैसे मिळवू. नवऱ्याला दुःख झाले; पण पोटापाण्यासाठी अर्थार्जनाचा दुसरा मार्गच दिसेना. मग माझ्यासारखी इतर काही मंडळी त्यांच्या घरी जेवायला जाऊ लागली. आम्ही गेल्यावर हा कॅमेरामन खूप गोष्टी सागे. निरनिराळ्या फिल्मशूटिंगच्या वेळी मोठमोठे डायरेक्टर त्याचाही कसा सल्ला घेत ते तो रंगवून सांगे. बायकोही हसत-खेळत सर्वांना वाढी. त्यांना एक छोटी तीनएक वर्षांची मुलगीही होती. बाप खिडकीशी कॉटवर बसून राही. ही डॉली नवीन कोणी माणूस घरात आला की, बापाला सागे—त्याच्या मांडीवरच ती चढून बसे. खरे तर दिवस नीट जात होते. या खानावळीच्या व्यवसायातून त्यांना माफक फायदाही होत होता.

आणि तरीही दृष्टी नसलेल्या त्या डोळ्यांना बायकोचे व तिच्या बरोबरच्या लोकांचे हसणे दिसे. कधीकधी त्या निस्तेज डोळ्यात मला एकाच वेळी कीव आणि अंगार दाटलेला दिसे. यातच भर पडली एका पोलीससबइन्स्पेक्टरची. हाही गोव्याचाच. या कॅमेरामनचा जुना दोस्त, म्हणून बायकोचा भावोजी. तर हा भावोजी या कॅमेरामनला भेटायला येई. नवीन कोणी खानावळवाही घेऊन येई. बरेच वेळा जेवी व त्याचे पैसेही बायकोकडे देई; पण का कुणास ठाऊक ह्या भावोजीवरूनच या नवरा-बायकोंची भांडणे होऊ लागली. हळूहळू हे सशयाचे पिशाच्च खूप मोठे झाले. इतरही कोणी जेवणासाठी आला तरी या कॅमेरामनच्या चेहेऱ्यावर एक निराश हास्यच दिसू लागले. घरात बाहेरचे कोणी नसले तर या नवराबायकोंचे कडाक्याचे भांडण चाले. आमच्यासारखे कोणी गेले की, शाब्दिक भांडण बंद होई; पण भावनांचा संघर्ष डोळ्यांतून व्यक्त होईच. त्यामुळे हळूहळू लोकही जेवायला जायचे बंद झाले. काही वर्षांनतर मी ऐकले की त्या कॅमेरामनने आत्महत्या केली व शेजारच्या लोकानी त्या बाईला कुलटा ठरवली. ती बाई खरंच नीच, कुलटा, स्वार्थी होती का? खरे तर नवऱ्याच्या पडत्या काळात कबर कसून जमिनीत रुतलेले संसाराच्या रथाचे चाक वर काढण्यासाठी ती पुढे सरसावली होती. सहजीवन म्हटले तर नवरा चोवीस तास घरातच होता आणि तरीही सहजीवनाला गोडी आणणारी आंतरिक भावना—ते एकमेकांबद्दलचे प्रेम, तो आदर नाहीसा झाला होता. त्यानंतर ती रथाची दोन्ही चाके चिखलात अधिकच रुतली गेली होती.

शेवटी नवरा आणि बायको एकमेकांच्याबरोबर किती वेळ घालवतात त्यापेक्षा तो कसा घालवतात हे महत्त्वाचे आहे.

आमचे लग्न झाल्यापासून तुमची आजी स्वतःचे काही काम नोकरी त्यात पैसा मिळो व मिळो पण करीत असे; पण दिल्लीत असताना काही वर्षे तिला मनासारखे काम मिळाले नाही. त्या वेळची एक रात्र मला अजुनी आठवते. वरवर पाहिले तर तिला त्या वेळी खूप आराम होता. माझा पगारही अगदीच काही कमी नव्हता. मुलांबाबत, पाताळांबाबत किंवा तत्सम नेहमीच्या विषयावर

बोलण्याकरता शेजारीपाजारी होते आणि तरीही त्या रात्री ती मला बिलगली त्यावेळी तिच्या डोळ्यात अश्रू होते. तिच्या मनाची तडफड होत होती. आपल्या शिक्षणाचा, आपल्या बुद्धीचा काही उपयोग या समाजाला होत नाहीय. सारे व्यक्तित्वच कुठेतरी गंजून जाते आहे असे तिला वाटत होते. दिल्लीची नोकरी सोडून मुंबईची नोकरी मी पत्करली त्याची जी काही महत्त्वाची कारणे होती त्यात तिचे हे अश्रू हेही कारण होते.

पण मग मुंबईत आल्यावर, विशेषतः अलीकडे तिचे काम खूप वाढले आहे. रात्री ती बऱ्याच वेळा थकलेली असते आणि तरी पहाटे उठून कॉलेजमध्ये द्यावयाच्या व्याख्यानाची वा संशोधनाची तयारी ती करीत असते मग कित्येक वेळा मीही तिच्या पाठोपाठ उठतो. दिवाणखान्यातल्या खुर्चीत बसून आम्ही चहा घेतो– त्याच वेळी त्या पंधरावीस मिनिटांत आमच्या अनेक विषयांवर गप्पा सुरू होतात– त्यात नवीन मानसशास्त्र येते, तिचे नवीन संशोधन येते, मुलांचे भवितव्य येते; पण कित्येक वेळा आम्ही काहीच बोलत नाही. चहाचे घुटके घेत घेत एकमेकांच्याकडे नुसते पहात बसतो. अंतर्मनात एकमेकांबद्दलचे प्रेम भरीत असतो. त्या १५–२० मिनिटांत हे जे Refuelling होते ते सारा दिवस आम्हाला पुरते.

बऱ्याच वेळा गंमत काय होते की, प्रेम आणि स्वामित्व या दोन संकल्पनांची गल्लत होते. माझे तुमच्या आजीवर प्रेम आहे, याचा अर्थ तुमच्या आजीनी माझी सारी कामे करावीत असा होतो का ? एका अर्थाने मी तिचा स्वामी खरा व ती माझी स्वामिनी खरी. स्वामित्वाचा एक अर्थ आहे सत्ता. भलेबुरे करण्याचा, दुसऱ्या व्यक्तीला हवे तसे वाकवण्याचा अधिकार.

स्वामित्वाचा दुसरा अर्थ आहे समर्पण. तो प्रेमाचा आविष्कार आहे. समर्पण म्हणजे शरण जाणे किंवा इग्रजीतले सरेण्डर नव्हे. एखाद्या अबलेने सत्ताधिशाच्या पायावर लोटांगण घालणे म्हणजे समर्पण नाही. येथे अर्पण आहे, दान आहे, पण तेही 'सम' असलेले. त्या अर्पणातही संतुलन आहे, balance/sense of proportion आहे.हाच सम संगीतात आहे, संघटनेत आहे–त्यावरचे एक पत्र मी पूर्वी लिहिलेच आहे, तर हे समर्पण भक्त देवासाठी करतो, देव भक्तासाठी करतो. कारण भक्त-देवच असतो व देव भक्तात असतो. या समर्पणाचा अर्थ बायकोनेच स्वतःचे व्यक्तित्व नवऱ्याच्या हौशीखातर नाहीसे करणे असा होत नाही. या समर्पणाचा अर्थ दोघानी एकमेकांना पूरक ( Complimentary ) बनून दोघाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधणे हा आहे !

परंतु होते काय, प्रेमाचे समर्पणाशी जे नाते आहे ते तोडून सत्तेशी, अधिकाराशी जोडण्याचा प्रयत्न काही नवरदेव करतात.

मला असा एक नवरदेव माहीत आहे. लग्नापूर्वी व लग्नानंतरही काही काळ त्या स्त्रीला वाटले हा नवरदेव किती प्रेमळ आहे. तो सारा वेळ आपल्याभोवती फिरतो, आपल्या हातचं जेवण त्याला गोड लागतं, आपणच त्याला कपडे करावेत असं वाटतं, जरा माहेरी गेलं की लगेच फोन येतो, आपल्याशिवाय त्याचे पदोपदी अडते; पण मग हळूहळू तिच्या लक्षात आले की, हे नवरदेव आपल्याला ४ दासीचे काम करायला लावीत आहेत आणि या प्रवृत्तीचा कळस झाला, मूल झाल्यावर ! ती स्त्री आता माता झाली होती आणि तरी हे नवरदेव नवरोबाच राहिले होते. त्याला त्या स्त्रीच्या प्रेमात त्या मुलाचाही वाटा नको होता.

कित्येक वेळी स्त्रीही मशीच Possessive असते. आपला नवरा दुसऱ्या कोणा स्त्रीबरोबर बोलला की, तिचा जळफळाट होतो. ती स्त्री त्या नवऱ्याचे सारे करायला तयार असते; पण तिला तो पूर्णतया तिचाच नवरा हवा असतो. जणू काही प्रेम हे एखाद्या लोटयातले पाणी आहे की, त्याच्यात दुसरा कोणी वाटेकरी आला की ते आपल्या वाटयाला येणार नाही.

कदाचित प्राणीपातळीवरील गरजा भागवण्याकरता लागणारे प्रेम त्या लोटयातले पाण्यासारखे मर्यादित असेल; पण मानवी व देवत्वाच्या पातळीवरचे प्रेम हे अमर्यादित आहे. ही मर्यादा कुठे सपते ? कशी सपते ?

मला चांदण्याच्या मद प्रकाशात न्हाऊन घ्यायला आवडते. सुरेख टिपोर चांदणे पडलेले असावे, अमीरखांच्या गाण्याचे गंभीर सूर संथपणे येत असावेत आणि अशा वेळी तुमच्या आजीचा हात माझ्या हातात असावा असे मला याही वयात वाटते; पण समजा याच वेळी तूही दुडुदुडु धावत आलास आणि तुझ्या मागून तुझी आईही हसत आली तर मला काय वाटेल ? मला प्रिय असलेली तुझी आजी, तुझी आई आणि तू या तिघांच्याही सहवासात माझा आनद अनेक पटीनी वाढतो. कमी मुळीच होत नाही आणि मला हेही माहीत आहे की, तुझ्या आजीचाही आनंद त्यामुळे वाढतो आहे. तुझ्या आजीचा देह फक्त माझ्यासाठी–माझ्या देहासाठी नाही. ती आणि मी तुझ्या आईत आहोत आणि म्हणून तू दुडुदुडु धावत आलास तर माझ्यावरच्या तुझ्या आजीचा प्रेमाचा वाटा कमी होत नाही, तो वाढतोच.


सौंदर्याचा आनंद, बुद्धीच्या विकासाचा आनद, कलेच्या आविष्काराचा आनद हा जितके भागीदार अधिक तितका अधिक मोठा.

सहजीवनातले हे तत्त्व बऱ्याच वेळी समजत नाही किंवा समजले तरी उमजत नाही. कारण कुठे तरी पाय त्या प्राणीपातळीवरच अडकून पडलेले असतात. सौंदर्याच्या आनदातही आपण स्वामित्वाचे-सत्तेच्या अधिकाराचे विष मिसळवतो. बुद्धीच्या विकासाच्या आनंदालाही वैयक्तिक अहकाराचा–गर्वाचा दर्प येऊ लागतो, कलेच्या आविष्काराच्या आनदालाही घराण्याच्या परंपरेच्या कोत्या कल्पनांनी खुजे करतो, तोटके करतो.

सहजीवन भोगता भोगता आनंदमय बनण्याची प्रक्रिया ही मोक्षाची वाटचाल आहे. बऱ्याच जोडप्याना ही मोक्षाची वाटचाल एकत्रित करता येत नाही. कोणी तरी एखादा लगडा पडतो. तुकाराम वैकुंठाला कधी गेला ते जिजाऊला कळलेच नाही. तसेच बहिणाबाईला ब्रह्मदर्शन कधी झाले ते तिच्या नवऱ्याला समजलेच नाही. मीराबाईच्या नवऱ्यालाही मीरेच्या गिरिधरनागराचे दर्शन झालेच नाही. एकनाथ–गिरिजासारखी जोडपी थोडी. त्याची कथा मोठी मजेशीर आहे.

एकनाथ हे मोठे भगवद्भक्त, शातीचे उपासक, थोर शास्त्रीपंडित पण अत्यंत नम्र. त्यांची चेष्टा करण्याचे, टवाळधा करण्याचे व त्यांना राग आणण्याचे प्रयत्न त्याच्या विरोधकांनी केले. त्यात त्यांना यश

पृष्ठ २४ वर



लिया

ग्रीसमधलं एक छोटं गाव.

ग्रीसवरचं आक्रमण, कम्युनिस्टांनी ताब्यात घेतलेली सत्ता आणि यादवी युद्ध यामुळं तो काळ फार धामधुमीचा होता.

त्या काळात एलेनी आपल्या युद्धावर गेलेल्या नवऱ्याच्या मागे पाच मुलांना वाढवत होती. कम्युनिस्ट क्रांतिकारकांच्या हल्ल्यापासून बचावत होती.

पण याची शिक्षा तिला मिळाली. क्रांतीकारकांनी एलेनीची हत्या केली.

आईच्या हत्येची बातमी मुलांना निर्वासित छावणीत कळली.

त्यानंतर पाच-सहा महिन्यांनी मुलं अमेरिकेत आपल्या वडलांना भेटली.

एलेनीचा मुलगा निकोला आपल्या आईच्या हत्येनं पेटला होता. आईच्या मारेकऱ्याला पकडणं हा एकच ध्यास त्यानं घेतला. जाणता निकोला पुन्हा लिया गावाकडे पोचला. तिथं त्यानं पाहिलं त्याचं छिन्नविछिन्न घर !

पण या कहाणीची सुरुवात कशी झाली ?

# एलेनी

मूळ लेखक : निकोलस गेग । अनुवाद : सुधा नरवणे

लेखांक : दोन

लग्नानंतर एलेनी आपल्या सासूजवळच होती. तिचा पती ख्रिस्तोस आपल्या नऊ भावंडांपैकी पाचवा. सासूसुनांचं एकमेकींवर खूप प्रेम होतं. सासूच्या अंतकाळी एलेनीच तिच्यापाशी होती. सुनेचा हात हातात घेऊनच त्या चौऱ्याऐंशी वर्षांच्या म्हातारीनं प्राण सोडला. रीतसर दफन झालं. सासूच जाणं एलेनीला खूप जाणवलं. तिच्या जीवनात एक पोकळीच निर्माण झाली. एलेनीच्या हृदयात सासूबद्दल अगाध प्रेम होत. आयुष्यात अनेक तऱ्हेच्या हालअपेष्टा सोसून, अनेक आपत्तींना तोंड देऊनही तिच्या सासूची आयुष्याबद्दल तक्रार नव्हती.

माझ्या आजीलाही नऊ मुलं झाली. त्यातली चार लहान वयातच देवाघरी गेली. माझे आजोबा निकोला न्युमोनियान दगावले तेव्हा आजी पुन: गरोदर होती. ते बाळ जन्मानंतर थोडेच दिवसांत आल्या पावली गेलं. आजीनं आपल्या उरलेल्या मुलांना दक्षपणे वाढवलं. माझे वडील ख्रिस्तोस वयाच्या सतराव्या वर्षी अमेरिकेला कामधंदा शोधायला गेले ते तब्बल चौदा वर्षांनी परतले. आजीनं आपल्या या मुलाला क्षणभर ओळखलंच नाही. त्याच्या चेहऱ्यावर समृद्धीची, संपन्नतेची चिन्ह दिसत होती, तुकतुकीत चेहऱ्याचा, टक्कल पडलेला, गवताची हॅट डोक्यावर, पट्ट्यापट्ट्याचा सूट, कोण बरं हा परदेशी मनुष्य ?

लहानपणी ख्रिस्तोस अक्रोडाच्या झाडावरून पडला होता. तेव्हा पडलेल्या खोकेची खूण ठळकपणे डोक्यावर दिसत होती. त्यावरून ओळख पटली.

अमेरिकेहून परत आलेला एकतीस वर्षांचा सधन असा हा उपवर तरुण गावात आलेला पाहून वधूपित्यांची गडबड उडाली, यात नवल नाही. त्याला आपली मुलगी दाखवण्यासाठी सर्वांची अहमहमिका उडाली. ख्रिस्तोस पुन: अमेरिकेला जाणार होता. जाण्यापूर्वी त्यानं लग्न करून जावं असा त्याच्या कुटुंबाचा आग्रह होता. गावातल्या आणखी एका सधन कुटुंबातली एलेनी त्याला सांगून आली. तिच्या सौंदर्याची सर्व जणच वाखाणणी करीत. तिची नितळ कांती गुलाबी गाल आणि तपकिरी रंगाची छटा मिसळलेले सोनेरी केस— तिच्याकडं दृष्टी गेली की तिथंच खिळून बसे. लोक म्हणत, 'देवा, मला आणखी दोन डोळे का नाही दिलेस ?'

एलेनीच्या वडिलांनी मुलगी सांगून जाताना तिचा विचार घेतला नव्हता. त्या वेळी तशी पद्धतच नव्हती. ख्रिस्तोस मुलगी पाहायला आला तेव्हाही दोघांचं काहीच बोलणं झालं नाही. चहा संपवून उठताना त्यानं आपली पसंती कळवूनच टाकली.


अशा तऱ्हेनं लग्न ठरलं तरी या लग्नामुळं कोणालाच पश्चात्ताप करण्याची वेळ आली नाही. एलेनी आणि ख्रिस्तोस दोघांना स्वर्गसुखाचा लाभ झाला. विधात्यानं त्यांना जणू एकमेकांसाठीच जन्माला घातलं होतं ! इतका चांगला नवरा आपल्या वडिलांनी आपल्यासाठी निवडला याबद्दल एलेनी आपल्या वडिलांशी नेहमीच कृतज्ञ राहिली.

१९२६ च्या नोव्हेंबरमध्ये त्यांच लग्न झालं; पण एलेनी नवऱ्याबरोबर अमेरिकेला जाऊ शकली नाही. तिच्या आईनं मोडता घातला. सातासमुद्रापलीकडे अनोळखी देशात आपली मुलगी जाणार या कल्पनेन तिनं हाय खाल्ली. 'तू दूर गेलीस तर मी आत्महत्या करीन.' असं भलतच साकडं तिनं मुलीला घातलं. आईच्या ह्या विदीर्ण मनोवस्थेला विरघळून एलेनीनं काही दिवस इकडेच राहाच ठरवलं. त्या मातृभक्त मुलीनं पतीचा विरह पत्करला. ख्रिस्तोसचीही निराशा झाली; पण खेड्यातल्या माणसांच्या मनोवृत्तीची त्याला कल्पना होती. मायेचे पाश कधी काळी माणसाला कसे साखळदंडासारखे जखडून टाकतात याची त्याला चांगलीच जाणीव होती. गावातले पुष्कळ तरुण किंवा प्रौढ पुरुष आपापल्या बायकांना गावात ठेवून शहरात पोटापाण्याचा धंदा शोधायला जात. त्यात अस्वाभाविक असं काही नव्हतं. ख्रिस्तोसनं आपल्या नवपरिणित वधूला आईपाशी ठेवायचं ठरवलं. वर्षभर तो घरी राहिला आणि घराची डागडुजी केली. दोन खोल्या वाढवल्या. शिवाय गावातलं तेच सर्वांत प्रशस्त घर होतं. १९२८ साली तो अमेरिकेला गेला. त्या आधी त्याच्या पहिल्या अपत्याचा जन्म झाला होता. त्या प्रेमी जोडप्याच्या संसारवेलीवरचं पहिलं फूल आमची सर्वांत मोठी बहीण ओल्गा !

'नंतरच्या दहा वर्षांत ख्रिस्तोस अमेरिकेहून दोन वेळा गावी आला. आल्यावर तो बरेच दिवस राहाचा. त्या कालावधीत त्यांना आणखी चार मुलं झाली. त्यांचं एकमेकांवरचं प्रेम तिळमात्रही कमी झालं नाही. सहवासानं ते प्रगाढ बनलं तर विरहान दुणावत गेलं.

सासूच्या मृत्यूनंतर मुलांना घेऊन एलेनी एकटी राहिली. तस सगळं ठीक चाललं होतं; पण सारा योगक्षेम चालला होता अमेरिकेहून ख्रिस्तोसकडून येणाऱ्या पैशावर. तिच्या मनात एक भीती वारंवार डोकावून जाई. समजा, काही कारणानं हे पैसे येणं बंद झालं तर संसाराचा गाडा कसा चालवायचा ? समजा त्याची नोकरी गेली. समजा आणखी काही झालं... पुरुषाची जात... दुसरीकडं मन गुंतलं ... विशेषत: बायकामुलांपासून दूर असलेला पुरुष... दुसऱ्या कुणी नटमोगरीनं त्याला जाळ्यात ओढलं अन् तो आपल्याला विसरला तर ? या शंकेनं ती कासावीस होई. त्याच्या सहवासातले प्रेमळ क्षण, त्याची वचनं, आश्वासनं आठवी आणि मग त्याच्याबद्दल शंका घेतल्याबद्दल स्वत:चीच निर्भर्त्सना करी. नवऱ्याबद्दलचा विश्वास कमी व्हावा अशी कोणतीही घटना घडली नव्हती, तरी तिचं स्त्रीमन हरतऱ्हेच्या कुशंकांनी तडफडत राही... समजा, पैसे येणं बंद झालं तर आपले हाल कुत्रा खाणार नाही. मुलींची लग्नं, हुंडेपांडे, सर्वांचा उदरनिर्वाह — कसं होईल आपलं ? हा एवढासा निकोला— कसं व्हायचं त्याचं ?

... निकोला आईचा विशेष लाडका होता. चार मुलींच्या पाठीवरचा मुलगा. एलेनीनं आणि तिच्या सासून एलेनीला मुलगा व्हावा म्हणून देवाची मनोभावे प्रार्थना केली होती. ... खूप प्रयत्न केले होते... गंडेदोरे... ताईत ...नवस...काही म्हणून करायच ठेवलं नव्हतं. ख्रिस्तोस अमेरिकेहून आला की दोघी संगनमतान त्याच्या उशीखाली लसूण ठेवीत. कुठल्या तरी झाडपाल्याचे काढे करून ते त्याला चहातून देत. रोज देवापुढं मेणबत्ती लावीत. इतकं करून सुद्धा एकापाठोपाठ एक आपल्या मुलीच जन्माला येत होत्या ! गावातले लोक चेष्टा करीत. त्यांच्या पाठीमागे त्यांची हेटाळणी करीत; पण एलेनीच्या सासूनं



कधी तिला दूषण दिलं नाही. प्रत्येक वेळी मुलगी जन्माला आली आणि निराशा झाली तरी म्हातारीनं प्रत्येक नातीचं मनापासून कौतुक केलं. ती त्यांना प्रेमानं न्हाऊमाखू घाली. वत्सलतेनं आंदुळी, हळुवार आवाजात अंगाईगीतं गाई. त्या अश्राप पोरींचा आणि त्यांच्या आईचा–आपल्या सुनेचा तिनं कधीच रागराग केला नाही. सासूसुना दोघी एकदिलानं संसाराचा गाडा ओढीत होत्या. सुखदुःखात दोघी एकमेकींच्या सख्या होत्या. म्हणूनच शेवटी एकदा एलेनीला मुलगा झाला तेव्हा नातवाचं मुख पाह्यला आजी नाही म्हणून एलेनीला खूप वाईट वाटलं. पुत्रजन्माचा आनंदसुद्धा गढूळ होता.

सासू निजधामाला गेली...नवरा परदेशी-पदरी ही इतकी मुलं...सारा भार एकटचा एलेनीवर ! आपल्या परीनं ती सर्वांची देखभाल नीट करीत होती... कालचक्र फिरत होतं...

२८ ऑक्टोबर १९४०...

... एक दिवस एलेनीच्या कानावर आला ढगांचा प्रचंड कडकडाट... तिनं व्हरांडचात येऊन क्षितिजाकडं पाहिलं ... हा ढगांचा आवाज नव्हे... सगळं तांबडंलाल क्षितिज. मुलांना ती म्हणाली, '... बाळांनो, ही मेघगर्जना नव्हे रे ... हे बॉंब असावेत असं वाटतंय रे... लढाई सुरू झाली की काय ?'

मुसोलिनीच्या आदेशानुसार इटालियन सैन्याच्या चार सशस्त्र पथकांनी अल्बेनियाची सरहद्द ओलांडून ग्रीसमध्ये प्रवेश केला होता. त्या वर्षी हिवाळा लौकर सुरू झाला अन् कडाक्याची थंडी पडली. त्या थंडीनं त्यांची अशी दैना उडवून दिली की, ग्रीसच्या कमजोर सैन्यानंदेखील त्यांचा पराभव केला. त्यांना सीमेवरून हाकलून लावलं.

... पण ग्रीसचा हा विजय अल्पजीवी ठरला !

१९४१ साली हिटलरनं रशियाशी मुकाबला करायला पाय रोवायला जागा हवी म्हणून ग्रीसकडे नजर फिरवली. आपल्या अत्याधुनिक शस्त्रांच्या साह्यानं सुसज्ज फौजेकरवी ग्रीसवर आक्रमण केलं. त्या वेळी मात्र ग्रीसचा त्यांच्यापुढं टिकाव लागला नाही. नाझी सैन्यानं ग्रीसमध्ये तळ ठोकला. त्या प्रदेशाचा ताबा घेऊन त्यांनी सगळी आयात बंद करून टाकली. नंतर आलेल्या हिवाळचात अथेन्समध्ये जवळजवळ ३ लाख लोक भुकेपोटी मृत्युमुखी पडले. अन्नान्नदशा होऊन गेले !

लियामध्ये एलेनी आणि तिची मुलं मात्र कशीबशी तग धरून होती. तिचे वडील आपल्या मैद्याच्या गिरणीतून तिला मैदा पुरवीत. आणखीही पुष्कळ अन्नपदार्थ तिच्या घरी पोचवीत. बाकीचे गावकरी मात्र हे असे नशिबवान नव्हते. अन्नान्नदशा होऊन किती कुटुंबं नामशेष झाली. त्या दिवसांत मृत्यूची वार्ता देणारे घंटानाद चर्चमध्ये सतत होत राहिले.

१९४२ च्या वसंतऋतूत कम्युनिस्ट क्रांतिकारकांनी लष्कराविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला. त्यांचा नेता होता आरिस व्हेलुचिओतिस. त्यांनी सर्वांनी मिळून एक मोठी संघटना उभारली ... नंतर ती राष्ट्रीय मुक्ती सेना (Elas) म्हणून विस्तार पावली. या संघटनेची एक प्रतिस्पर्धी संघटना होती. त्यांचा नेता होता सेवानिवृत्त लष्करी अधिकारी नेपोलियन झेर्व्हास... त्यानं आपल्या क्रांतिसेनेला नाव दिलं...राष्ट्रीय लोकशाहीवादी ग्रीस संघटना... (EDES)...

... या दोन संघटनांनी मिळून ग्रीसमध्ये जो धुमाकूळ घातला तो केवळ अवर्णनीय आहे... पण ते पुढचं..

... त्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात या दोन्ही संघटनांनी ऐक्यबद्ध राहून आपल्या देशात ठाण मांडून बसलेल्या नाझी लष्कराशी लढा दिला. एकी राखून परकी शत्रूंशी झुंजण्याची त्यांची ही पहिली आणि शेवटची वेळ... नंतरच्या चार वर्षांत ते एकमेकांचा नायनाट करण्यासाठी रानरेडचांसारखे झुंजले. युद्ध संपेल तेव्हा ग्रीसवर सत्ता रहावी ती आपल्या संघटनेची या एकाच हेतूनं प्रेरित होऊन ते एकमेकांचा गळा घोटायला सिद्ध होत राहिले.

१९४३ च्या मार्च महिन्यात Elas संघटनेनं लियाचं पोलीसठाणं ताब्यात घेतलं. त्यांचा नेता होता–प्रोपोकी स्केव्हिस... व्हेलामध्ये शाळेत असताना जवळच्या कम्युनिस्ट–शिस्त–छावणीत तो जाई. त्यांच्यामुळे त्याच्यावर कम्युनिस्ट विचारसरणीचा प्रभाव पडला. लिया गावात विजयोन्मादानं स्केव्हिसनं पुढारीपणाची सूत्रं आपल्या हाती घेतली. सगळचा जनतेला चौकात गोळा केलं. मध्यभागी एक खुर्ची ठेवून तो घसा खरडून भाषण द्यायला लागला...

... 'बंधूंनो...' त्याचे 'बंधू' म्हणजे निसर्गपुत्र लिया गावचे लोक. उन्हापावसात रापलेले – राजकारणाचा गंध नसलेले... आश्चर्यचकित होऊन ते त्याचं बोलणं ऐकत होते. 'आज आपल्या गावातल्या शूर सुपुत्रांनी परदेशी आक्रमकांविरुद्ध शस्त्र हाती घेतलं आहे... आपण स्वतंत्र झाल्याखेरीज ते शस्त्र खाली ठेवता येणार नाही !'

आपल्या संघटनेची तरफदारी करून स्केव्हिसनं न्याय आणि समतेवर आधारित नव्या शासनपद्धतीची गुणगाथा गायिली.

'मित्रांनो... हा लढा आम्ही तुम्हा

सर्वांसाठी लढतो आहोत. तुमची गरिबी हट-वण्यासाठी तुम्हाला मानान जगता यावं यासाठी आम्ही कंबर कसून झटत आहोत आणि आमरण झटू...'

...स्केव्हिसचं भाषण चालू असताना सारखा टाळ्यांचा कडकडाट होत होता. आपण श्रोत्यांना भारून टाकत आहोत याची त्याला जाणीव होत होती आणि त्याला आणखी स्फुरण चढत होत. हात उचावून घनगंभीर आवाजात तो म्हणाला..., 'पण बंधूनो, एक लक्षात ठेवा. हे कार्य करीत असताना जर विरोध झाला तर तो मुळीच खपवून घेतला जाणार नाही. विरोधकांवर कडक कारवाई केली जाईल...'

'एलास' संघटनेच्या उदयामुळे या खेडूत जनतेला जर्मन सत्तेच्या अंधःकारात नवा आशेचा किरण दिसला. ठिकठिकाणी समित्या स्थापन व्हायला लागल्या. प्रशासन-समिती, सुरक्षा-समिती, न्याय अन् पुरवठा ही समिती... ती समिती– दगड न् धोंडे– ज्याना कधी चळवळ शब्दाचा वारासुद्धा लागला नव्हता असे कितीकजण या असह-काराच्या चळवळीत सामील झाले.

कधी कधी हे क्रांतिकारक लोकशिक्षणा-साठी छोट्या–मोठ्या पथनाट्याचा उपयोग करीत. पोरासोरांची यामुळे छान करमणूक होई. अर्थ कळला नाही तरी ती पाह्यला पोर गर्दी करीत. मीही त्यातलाच एक. पुढाऱ्यांच्या आणि वीरांच्या जयजयकाराच्या घोषणात मी सामील होई. बेंबीच्या देठा-पासून ओरडत झिंदाबाद–मुर्दाबादच्या घोषणा देण्यात आम्ही सगळे तरबेज झालो. आपल्या 'एलास' संघटनेच्या पुढाऱ्यांना झिंदाबाद करायचं अन् 'एडेस' संघटनेच्या पुढाऱ्यांना मुर्दाबाद करायचं हे आम्ही तेव्हाच शिकलो. काही कारण असो वा नसो सारखं झिंदाबाद–मुर्दाबाद करीत फिरायच हा आमचा एक खेळच झाला. 'एडेस' चा नेता झर्व्हास याचं प्रतीक म्हणून 'एलास' गटान एक विनोदी पात्र तयार केलं. खोटी दाढी, कमरेच्या पट्ट्याखाली उशी ठेवून त्याला ढेरपोट्या बनवलेलं... असा तो पुढारी विदूषकासारख्या वेडयावाकड्या ढंगात भारत हिटलरपाशी जातोय्. नाझीचा तो ठराविक सलाम ठोकून काही तरी गुपित सागितल्यासारखा त्याचा कानाला लागतोय् असा हा विनोदी प्रसग आमच्या लोकांनी तयार केला होता. मग आमच्या 'एलास' संघटनेचे सैनिक त्या सोंगाला एका खांबाला बांधून ठेवीत आणि त्याच्या डोक्यावर शेण ओतीत... मग तो थयथय नाचे. ते पाहून आम्ही पोट धरधरून हसायचो. फारच गमतीदार प्रसंग होता तो. आमच्या गावी कधी कधी कळसूत्री बाहुल्यांचा खेळ यायचा त्यापेक्षा सुद्धा हा खेळ मजेशीर होता...

...पण गावातले काही शहाणे समंजस लोक या अचरट गंमतीत मुळीच सहभागी व्हायचे नाहीत. त्यांना या विनोदी दृश्याचं हसू तर यायचं नाहीच; पण उबग वाटे. माझी आई त्यातलीच एक होती. तेव्हा मला कळलं नाही...

...स्केव्हिसनं आपल्या भाषणात सिंह-गर्जना करून सांगितल्याप्रमाणे विरोधकां-बाबत खरोखरीच कडक धोरण स्वीकारलं.

...एक दिवस एलेनी, तिची शेजारीण ॲनास्टाशिया आणि तिची मुलगी डोंगरावर जात असता त्या तिघींना मित्सी बोलीस आणि त्याची बायको भेटले. ती दोघंही त्याच दिशेनं चालली होती. वाटेनं ते गप्पा मारू लागले. क्रांतीच्या चळवळीची प्रशंसा करीत बोलीस म्हणाला, '...या क्रांतीमुळे गरिबाचा फायदा होणार आहे.' 'कसला फायदा?' ॲनास्टाशिया उसळून म्हणाली, '...आम्ही सारखे भुकेलेले आहोत... तुम्ही आमच्या घरचं सारं दूध क्रांतीसाठी गोळा करता. अन् त्याच्या बदली दाणे देणार होतात ते कुठे आहेत? आम्ही असं उपाशी पोटीच मराव का...?' 'क्रांतीसाठी त्याग हा करावाच लागतो– मावशी बघा बरं– आत्तापर्यंत क्रांतीमुळं आपण काय काय साध्य केलंत्– जरा आठवा– विचार करा–'

'एलास' संघटनेनं किती जर्मन सैनि-काना धूळ चारली, किती पलटणीना पाणी पाजलं याच पुराण मित्सी बोलीसनं सुरू केलं.. 'शिवाय आमच्या या संघटनेनं किती तरुणांना मद्यपानाच्या विळख्यातून सोडव-लय्... वेश्यागमन, जुगार किती अनिष्ट गोष्टीपासून आम्ही युवाशक्तीला दुसरीकडे वळवलंय्... किती वाईट गोष्टी आम्ही निपटून काढल्यात... येरोमेरी गावातल ते प्रकरण आठवतय् ना तुम्हाला?... तो जर्मनाचा पित्त्या... त्याला आम्ही ठार मारून टाकलं... का माहीत आहे तुम्हाला? तो नुसता फितुरच नव्हता तर त्यानं त्या-पेक्षाही भयकर गोष्ट केली...'

'कोणती?'

'त्यान आपल्या बहिणीवर बलात्कार केला.' ऐकणाऱ्या त्या तिघीच्या अंगावर शहारे उमटले; पण एलेनीनं धीर करून साशंकतेनं विचारलं, 'हे कस शक्य आहे? आपल्या या भूमीतले रहिवासी असं कर-णारच नाहीत. त्याची बहिण म्हणाली का तसं?'

'छे, मुळीच नाही. म्हणून काय झाल? तो तिचा सख्खा भाऊ होता. सख्ख्या भावा-विरुद्ध ती काय जबानी देणार?'

'मग? त्यानं स्वतः कबुलीजबाब दिला का?'

मित्सी जोरात हसला. या अडाणी बाय-काच्या भोळेपणापुढे हात टेकले बाबा! 'अहो, असं कुणी कधी स्वतःच्या तोंडानं कबूल करतं काय? सगळ्या गावाला प्रकरण माहीत आहे. त्याचा खटला कुणी चालवला अन् निकाल कुणी दिला माहीत आहे? एक पाद्री, एक शिक्षक आणि एक लष्करी अधिकारी. असे मान्यवर लोक न्यायदान करताना चूक करतील असं कसं होईल?

'बाबा रे! तो येरोमेरीमधला खटला अन् तो न्यायाधीश त्यांचे त्यांनाच लखलाभ होऊ दे...' ॲनास्टाशिया वैतागानं उद्-गारली.

'गावातले चार लोक तुमच्याबद्दल काही तरी म्हणणार– अन् त्यावर तुमचं भवितव्य अवलंबून राहणार! असले न्यायाधीश आणि असला न्याय... मग आपल्यापैकी प्रत्येक जण या आधीच मरून जायला हवा होता–'

बोलीस दांपत्याच घर आल्यावर ते निरोप घेऊन गेले.

**'एलास' संघटनेमुळं जर्मन सत्तेच्या अंधःकारात नवा आशेचा किरण दिसला.**

एलेनी म्हणाली, 'या क्रांतिकारकांनी इटालियन आणि जर्मन सैनिकांना हाकलून लावलं हे खरं; पण आपल्या किती लोकांचा या ना त्या कारणावरून शिरच्छेद केला! किती थोड्या दिवसात किती मृत्यू!! भयंकरच आहे हे—'

ईस्टरचा सण आला. फारच थोड्या लोकांना अंडी आणि मटण परवडत होतं. एलेनीनं स्वतःजवळच मक्याचं पीठ शेजाऱ्याला दिलं अन् त्याच्याकडून थोडं मटण घेतलं. सगळ्यांचं मटण एकत्रच शिजत घातलं होतं. ते शिजण्याची वाट पाहत असताना रस्त्यावर काही तरी गडबड ऐकू आली. सगळेजण तिकडे धावले. लेफ्ट राईट, लेफ्ट राईट करत. सोजिर गावात आले होते. त्यांना पाहताच प्रथम भीतीच वाटली; पण मग लक्षात आलं, अरे, हे तर आपलेच लोक. स्केव्हिस त्यांचा नेता नाही का?

पूर्वी गबाळ्या वेषात असलेले सैनिक आता रुबाबदार गणवेषात होते. कडकडीत इस्त्रीचा गणवेष, चकचकीत बटणं, रुंद मजबूत कातडी पट्टा, डोक्यावर टोप्या. टोप्यांवर एलास संघटनेचे बिल्ले, प्रत्येकाच्या खांद्यावर एक बंदूक. बुटांचा खाड्खाड् आवाज करीत ते गावातून जात होते. ती मोठी गर्दी त्यांच्या मागं गलका करीत नारे देत फिरत होती.

रात्री गावकरी चर्चमध्ये जमले. प्रत्येकानं मेणबत्ती पेटवून भगवान येशूच्या पुनरुत्थानाचा उत्सव साजरा करायला प्रारंभ केला. फादर झायसिसच्या हातातल्या पवित्र ज्योतीवरून आपली मेणबत्ती पेटवायची. वर्षानुवर्षे चालत आलेला जुना सोहळा पण प्रत्येक वर्षी नवा आनंद हृदयात दाटून येई...

मध्यरात्रीच्या सुमाराला चर्चच्या आसपास कसला तरी गलका ऐकू आला. तेच एलासचे सैनिक— त्यांच्या सगळ्याच हालचाली कोलाहल माजवणाऱ्या असायच्या. ते चर्चच्या आवारात आले. सर्वांनी अदबीनं बाजूला होत त्यांना वाट करून दिली. त्यांच्यातला एकजण पुढं सरसावला. बिशपसाठी राखून ठेवलेल्या पवित्र आसनाकडे तो जायला लागला तेव्हा मात्र लोकात खळबळ उडाली. ते आसन कुणाही सामान्य माणसासाठी नव्हतं. कुणीही त्याला साधं बोट लावून स्पर्श करू शकत नव्हतं. स्वतः फादर झायसिस त्या आसनापुढं नतमस्तक होत. त्या आसनाला सर्वजण फार मान देत. रोज त्याची पुसापुसी, पॉलिश सर्व व्हायचं... केव्हा तरी यानिनाहून बिशपमहाराज येतील, लियामधल्या ग्रामस्थांची विचारपूस करतील, आपल्या पदस्पर्शानं गाव पुनीत करतील- लोकांना आशीर्वाद देतील, त्या मंगल दिवसासाठी हे आसन रोजच्या रोज लख्ख करून ठेवलं जायचं...

क्रांतिकारकाचा तो नेता उद्दाम पावलं टाकीत त्या आसनाकडं जायला लागल्यावर सगळे गावकरी भयचकित नजरेनं फादर झायसिसकडे बघायला लागले. ते स्तब्ध उभे होते. शांतीचा महामेरू. ते सहजासहजी विचलित होत नसत. त्या पुढाऱ्यानं व्यासपीठाचा ताबा घेऊन बोलायला सुरुवात केली. तरीही फादरनी तोंड उघडलं नाही. 'बंधूंनो, आज मी तुमच्याकडं एक मागणं मागायला आलोय. ग्रीसला आपल्या परमप्रिय मातृभूला जुलमशाहीच्या जोखडाबाहेर काढायला मला तुमची मदत हवीय. आजचा हा पवित्र दिवस त्यासाठीच आम्ही निवडलाय... आज मला तुमच्याकडून वचन हवंय... तुम्हा सर्वांचा आम्हाला पाठिंबा हवाय... तुम्ही सर्वस्वी आमच्या पाठीशी आहात याची खात्री आम्हाला असली तर आम्ही निश्चितच शत्रूचा पाडाव करू शकू. ग्रीसची सुटका होईल मगरमिठीतून.'

चर्चमध्ये प्रार्थनेसाठी जमलेल्या त्या समुदायात चुळबूळ सुरू झाली. मार्गदर्शनासाठी सगळे लोक फादरकडे पाहायला लागले. त्यांची नजर फार दूर क्षितिजापलीकडे...ते अविचल...सगळ्या बायकांप्रमाणं एलेनीनं छातीवर क्रॉसची खूण केली आणि देवाची मनोमन प्रार्थना सुरू केली.

... दुसरा दिवस... ईस्टरचा रविवार. पुनः चर्चमध्ये प्रार्थना ... एक वर्ष पार पडलं... लढाई आणि उपासमार... कसंबसं वर्ष गेलं... त्यातूनही प्रभूची जी काय कृपादृष्टी राहिली तशीच यापुढं राहू दे... देवा अशीच पाखर घाल आमच्यावर... आनंदाचा सोहळा. येशूचं पुनरुत्थान...भावनांचा कल्लोळ ... एकमेकांना आलिंगन— शुभेच्छा ... आकाशात प्रभू आहे ... तो आपल्याला सांभाळतोय — सांभाळेल...आनंदाच्या डोही आनंद—तरंग... काही क्षणातच या आनंदाला जबरदस्त तडा गेला. एक मोठी, हृदय पिळवटून टाकणारी किंकाळी ऐकू आली. शेजारच्या शाळेच्या इमारतीतून आतड्याला पीळ पाडणारं आरडणं—ओरडणं ऐकू यायला लागलं. एलेनीनं एकदम आपल्या मुलांना पोटाशी धरलं... बाकीचे लोक त्या किंकाळीच्या दिशेनं धावत सुटले.

... शाळेच्या दारात दोन सैनिक राखण करीत उभे होते.

... आतून त्या हृदयद्रावक किंकाळ्या आणि भेकलेले शब्द ऐकू येत होते... 'नका हो ... नका मारू मला — मी काही नाही केलं...मजजवळ बंदूक नाही...देवा वाचवा मला— अहो, कोणी तरी सोडवा मला'—

कुणी तरी सैनिकाला विचारलं, 'काय चाललंय आत?... कोण आहे तिथं?... कोण कुणाला मारतंय? ...'

'तो आहे— अँतोनिस... ते बिलंदर कार्ट गाढव लेकाचा...बंदूक बाळगतो स्वतःजवळ आणि क्रांतिसेनेला कळवत नाही! काय हा अगोचरपणा. केवढं हे धाडस?...'

सर्वांना काय कळायचं ते कळून चुकलं... अँतोनिस कोलिआँस एक १८ वर्षांचा अवखळ मुलगा... होता थोडासा खोडकर... पण उपद्रवी, दुष्ट नव्हता. कोलिआँस कुटुंबाची शेती म्हाताऱ्या स्टाव्हरोसच्या शेताजवळ होती. म्हाताऱ्याची दृष्टी दिवसेंदिवस क्षीण होत होती. या दोन्ही कुटुंबात शेताच्या हद्दीवरून सतत कुरबुरी चालायच्या. म्हातारा स्टाव्हरोस नेहमी कोलिआँसच्या शेतात जाऊन भांडणं उकरून काढायचा—मग अँतोनिस आपली काठी म्हाताऱ्याच्या अंगावर बंदुकीसारखी रोखून त्याला भिववून टाकायचा. अधू दृष्टीमुळे त्याला वाटायचं खरंच बंदूक रोखलीय आपल्यावर..

म्हाताऱ्यानं आपला तंटा क्रांतिसेनेकडे नेला होता आणि त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला. त्यावरून आता ते त्या कोवळ्या पोराकडे बंदुकीची मागणी करीत होते. तो नाही नाही म्हणत होता म्हणून त्याला पिटून काढत होते.

थोड्या वेळानं त्याचं ओरडणं थांबलं. आणखी काही क्रांतिकारक आले आणि सगळे जण कुठं तरी निघून गेले. ते निघून जाताच

शाळेच्या इमारतीत घुसले... त्यांना दिसलं ...अँतोनिस बेशुद्ध होऊन जमिनीवर पडला होता. कपडे फाटले होते. झाडाच्या फोकाचा मार अगावर ठिकठिकाणी पडला होता. तिथून रक्ताचे ओघळ वाहत होते, स्केव्हिसचं मघाचं स्फूर्तिदायक भाषण आणि ही मारहाण याची सांगड कशी घालायची? त्या भोळ्याभाबड्या गावकऱ्यांना कशाचा अर्थ उमगेना. उक्ती आणि कृती याचा अन्वय कसा लावायचा हे कळेना.

मे महिन्यात स्केव्हिसची 'एलास' संघटना आणि प्रतिस्पर्धी 'एडेस' संघटना यांच्यात संघर्षाची ठिणगी पडली. त्यांच्यातल्या त्वेषपूर्ण चकमकीत एलास क्रांतीसेनेची दोन माणसं ठार झाली. त्यापैकी एकजण एलेनीच्या शेजाऱ्याचा मुलगा होता. तिच्या कानावर ही बातमी आली तेव्हा ती निकोलाला थोपटून निजवीत होती. आपल्या शेजाऱ्याचा मुलगा क्रांतीच्या नावाखाली मारला गेला हे ऐकून तिच्या अंगावर भयाचा शहारा उमटला. आपल्या मुलाला पोटाशी घेऊन ती देवाची प्रार्थना करू लागली... 'देवा रे, माझ्या मुलाना कुणी मारण्याआधी मला तुझ्याकड घेऊन जा. असा प्रसंग वैऱ्यावरसुद्धा नको रे.'

८ सप्टेंबर १९४३ रोजी इटली} आणि दोस्त–फौजात शांततेचा तह झाला. जर्मन फौजा आणि या दोन्ही सेना सगळेच इटलीची शस्त्रास्त्रं हस्तगत करायला धावले. एलास क्रांतिसेनेला पिनरोलो पथकाचा तोफखाना मिळाला आणि एडेस सेनेपेक्षा ते वरचढ ठरले. ऑक्टोबर महिन्यात ग्रीसच्या यादवीला सुरुवात झाली.

स्केव्हिसनं क्रांतीची आणि स्वातंत्र्याची जी स्वप्नं रंगवली होती त्याचं रूपांतर आता वणव्यात झालं. लिया गाव कधी एलासच्या ताब्यात असायचं तर कधी एडेसच्या–घटकेत लियाचे रक्षणकर्ते बदलायचे. आज जी निष्ठा दाखवावी तीच उद्या द्रोह ठरत होती. गाव पुरतं भीतीग्रस्त बनलं. या यादवीत अखेर एलास संघटनेचा विजय झाला; पण जर्मनांना थोडी जरी शंका आली की क्रांतिकारक इथं दडून बसलेत की, गावाला भयंकर शिक्षा भोगावी लागे. १९४३ च्या उत्तरार्धात आणि १९४४ च्या प्रारंभी सबंध ग्रीसभर दोनशे गावं भस्मसात केली गेली.

लिया गावात 'एलास' संघटनेचं इतकं वर्चस्व होतं की, त्याला छोटं मॉस्को असं नामाभिधान प्राप्त झालं होतं.

जर्मन सैन्य लियाकडं यायला लागल्याचं कळताच सर्व गावकरी डोंगरात जाऊन लपून बसले. त्यात एलेनी आणि तिची मुलंही होती. त्यानी शोधलेला निवारा अल्बेनियाच्या सरहद्दीपाशी होता. जर्मन सैन्य कूच करून पुढ गेल्यावर ते परत गावात आले. एलेनीचं घर शाबूत होत; पण नाझींनी इतर पुष्कळ घराना आगी लावून टाकल्या होत्या.

१९४४ च्या हेमंत ऋतूत लढाईचा एकंदर रागरंग दिसून आला. हिटलरच्या फौजांनी ग्रीसमधून काढता पाय घेतला. आता ग्रीसमध्ये एलास या सर्वात सामर्थ्यवान् लष्करी संघटनेचं वर्चस्व राहिलं. तथापि आदल्या वसंत ऋतूत केल्या गेलेल्या राजकीय तडजोडीमुळं त्याना नव्या सरकारात फक्त पाच जागा मिळाल्या.

आपण एवढा विजय मिळवला पण सरकारमध्ये जागा देताना मात्र आपल्याला फसवलं गेलं अशी त्यानी समजूत करून घेतली. आणखी उठाव करून क्रांतीच्या माध्यमातून संपूर्ण सरकारच ताब्यात घेण्याचं एलास संघटनेनं ठरवलं. त्यानी अथेन्समधल्या ब्रिटिश आणि ग्रीक फौजावर आणि एडेसच्या उर्वरित सेनेवर हल्ले केले. कम्युनिस्ट पक्षाच्या गुप्त संघटनेनं–ओपलानं–अथेन्सभर आपलं जाळं पसरलं. कुणाच्याही दारावर ते केव्हाही थाप मारत–काहीही कारण दाखवून कुणालाही अटक करीत... नंतर कसल्यातरी आरोपावरून त्यांना यमसदनाला पाठवीत. 'एडिस' चा नेता झर्व्हास याला त्यानी दूर डोंगरात पिटाळून लावलं; पण अथेन्समध्ये ब्रिटिशांचा विजय झाला. कम्युनिस्टाना हार खावी लागली. आपल्या एलास संघटनेचं कायदेशीर राजकीय अस्तित्व रहावं या मुद्यावर त्यांनी शस्त्रास्त्रं परत द्यायला संमती दिली. ती क्रांतिसेना आता अगदी निःशस्त्र झाली आणि सगळे सैनिक पराभूत अवस्थेत आपापल्या गावी परतले.

एलेनीसारख्या जनसामान्यांना हा तह म्हणजे युद्धसमाप्ती आणि नव्या आशापर्वाचा प्रारंभ असंच वाटलं. चार वर्षांनी प्रथमच ते लोक पूर्ववत् सुरक्षित जीवन जगू शकणार होते. शेतात पेरणी करायची आणि ठरलेल्या दिवशी नवऱ्याच्या पत्रांची वाट पहायची हा एलेनीचा जीवनक्रम होता. एलेनी मुलाना त्यांच्या वडिलाची पत्रं वाचून दाखवायची. '... ... बरं का रे मुलांनो ... ... तिकडं अमेरिकेत ना ... ... सगळे लोक खूप श्रीमंत आहेत. एकेक काम करायला यंत्र आहे. जमिनीवरचा केर काढायला सुद्धा यंत्र आहे. ... ...' मुलाचे डोळे आश्चर्याने विस्फारत. आईचा एकेक शब्द ती कर्णसंपुटात साठवून ठेवीत.

१९४५ च्या मे महिन्यात एलेनीला नवऱ्याच्या पत्रांचा एक गठ्ठाच मिळाला. लढाईमुळे टपाल नीट येत नसे. ते आता एकदम यायला लागल ... ... ख्रिस्तोसनं लिहिल होतं, '... ... लाडके, तू खुशाल आहेस ना? आणि आपली मुल ... ... प्रत्येक क्षण न् क्षण मी तुझा आणि मुलांचा विचार करतोय् ... ... आपला 'राजपुत्र' निकोला कसा आहे? तो माझी आठवण काढतो का? विचारतो का की डॅडी कुठं आहेत असं ... ...? त्याला खूपखूप पापे ... ... आणि प्रियतम तुलाही ... ...' दुसऱ्या पत्रात होतं, '... ... मी आता न्यूयॉर्कमध्ये राहतोय् ... ... एका लहानशा रेस्टॉरंटमध्ये सैपाक्याची नोकरी करतोय् ... ... मला आठवड्याला नव्वद डॉलर मिळतात. तुला माझी पत्रं नीटपणें मिळताहेत ते कळलं की मग मी तुला पैसे पाठवीन ... ...

...आणखी एक चित्राचं पोस्टकार्ड. त्यावर एम्पायर स्टेट बिल्डिंगचं मनोहारी दृश्य होतं... मागं मजकूर होता... 'ही जगातली सर्वांत उंच इमारत बरं का... स्वातंत्र्य देवतेचा पुतळाही इथंच आहे...'

**जनसामान्यांना हा तह म्हणजे युद्धसमाप्ती आणि नव्या आशापर्वाचा प्रारंभच वाटला!**

एलेनी प्रत्येक पत्रातला प्रत्येक शब्द न् शब्द काळजीपूर्वक वाचे...

...कागद–पेन्सिल घेऊन ती नवऱ्याला पत्र लिहायला बसली. 'प्राणप्रिया... तू खुशाल आहेस हे कळून अत्यानंद झाला. देवाचे त्याबद्दल शतशः आभार... मधे खूप दिवस तुझं पत्र नव्हतं... काळजीनं आणि हुरहुरीच्या विचारानं माझं डोकं फुटून जायची वेळ आली होती.. हृदयाची शकलं शकलं होत होती–' नंतर तिनं घरातली परिस्थिती लिहिली... पैसे, कपडे... सगळ्यावाचून कशी हलाखी उत्पन्न झालीय ते लिहिलं. इकडच्या देण्यावरचेच फार सविस्तर वर्णन न करता तिनं आपली निकड स्पष्ट शब्दात लिहिली. पत्राचा शेवट करताना तिनं लिहिलं, 'या लढाईनं मला एक गोष्ट मात्र निश्चितच शिकवलीय... ती म्हणजे आता तू तिकडे आणि आम्ही इकडे हा प्रकार मुळीच नको. फार दुःसह आहे हे जिणं... कसंही कर अन् तू आम्हाला ताबडतोब तिकडं नेण्याची व्यवस्था कर... माझी ही अगदी हात जोडून, पाया पडून विनंती आहे...'

तिच्या या पत्रावर ख्रिस्तोसचं ताबडतोब उत्तर आलं. त्यानं चार ट्रंका भरून कपडालत्ता, खेळणी आणि इतर वस्तू पाठवल्या होत्या. दुर्दैवानं त्याचं अपेंडिसायटिसचं ऑपरेशन झालं होतं. हॉस्पिटलचा खर्च आणि या चार ट्रंका पाठवण्याचा खर्च यामुळं हाताशी आणखी पैसा उरला नव्हता. ग्रीसमधून आपल्या कुटुंबाला स्थलांतरित म्हणून कायमचं अमेरिकेला आणण्यासाठी काही कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता करणं आवश्यक होतं. त्यासाठीही पैशाची आवश्यकता होती. ते सगळं झालं म्हणजे मी तुला स्थलांतराचे कागदपत्र पाठवतो असं प्रेमळ आश्वासन देऊन त्यानं पत्राचा शेवट केला होता.

सबंध उन्हाळाभर एलेनी आणि तिची मुलं त्या ट्रंकांची वाट पहात होती. शेतात गव्हाची कापणी, मळणी करताना, बटाटे उकरताना त्यांच्या तोंडी एकच विषय असायचा. केवढ्या असतील त्या ट्रंका? त्यात काय काय असेल? कोणती वस्तू कुणासाठी असेल? कुणाला प्रथम निवडीची संधी द्यायची? काम संपलं, दिवस सरला तरी हा विषय संपत नव्हता.

अखेर यानिनाहून निरोप आला की, तुमच्या ट्रंका येऊन थडकल्या आहेत. घेऊन जा. एलेनीनं तिकडं जाऊन ट्रंका ताब्यात घेतल्या. खेचरांच्या पाठीवर लादून ती त्या घेऊन आली. ती घरी पोचायच्या आधीच घरात गर्दी जमली होती. सर्वांची उत्सुकता शिगेला पोचली. ट्रंकांना बांधलेली दोरीसुद्धा किती सुंदर होती. सुबक, मजबूत हाताच्या मनगटाएवढे जाड दोर होते ते. त्या सर्व लोकांनी हळूवार हातांनी गाठी सोडवल्या. नंतर त्या दोरांचे योग्य लांबीचे तुकडे करून शेजाऱ्या–पाजाऱ्यांना भेट देण्याचा एलेनीचा विचार होता.

ट्रंकांत सर्वांसाठी कपडे होते. बूट, सपाता, खेळणी, सिल्कचे पायमोजे, सपन्न... समृद्ध अमेरिकेचं विश्वरूपदर्शनच होतं ते! काही काही वस्तू तर अशा अपरिचित होत्या की, त्यांचा काय उपयोग करायचा हेही कळत नव्हतं. एलेनीच्या वडिलांसाठी पाठवलेले नेकटाय मुलींनी आपल्या गळ्याभोवती गुंडाळले. सिल्कचं कापड कमरेभोवती गुंडाळून पाहिलं. त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता.

दूरदूरच्या खेड्यातले लोक एलेनीचा खजिना पाहायला येऊ लागले. प्रत्येकाला ती काही ना काही वस्तू भेट म्हणून द्यायची. ती अप्पलपोटी नव्हती. लहानशी वस्तू का होईना एकेकाला ती देऊन एलेनी सर्वांना आपल्या आनंदात सहभागी करून घेत होती. किती दिवस झाले तरी लोकांचं तिच्याकडं येणं चालू होतं.. किती सुंदर आहे हे... 'एलेनी... तू किती भाग्यवान...'

लढाईनंतर एलास संघटनेचे हजारो कार्यकर्ते ग्रीसमधून पळून उत्तरेत कम्युनिस्ट देशात आश्रयार्थ गेले होते. १९४५ साली यादवी युद्ध सुरू झाल्यावर या लोकांनी पुन: ग्रीसमध्ये येण्याची संधी सोडली नाही. आपलं शौर्य आणि उत्साह दाखवण्याचा चांगलाच मोका त्यांना मिळाला. परत येऊन ते पहाडी मुलखातल्या बंडाळीत सहभागी झाले. लिया गावातले लोक एलास संघटनेच्या बाजूचे होते. गावातले सुरक्षा अधिकारी दोघा क्रांतिकारकांच्या पाठलागावर होते. त्यांना खुद्द एलेनीनं स्वतःच्या घरात आश्रय दिला होता त्या माणसासाठी तिच्या पोटात तुटे; पण एकंदरीत तिच्याप्रमाणेच सर्व गावकरी युद्धाला कंटाळले होते.

ख्रिस्तोसनं परवाच्या पत्रात लिहिलं होतं की, तुम्ही सर्वांनी इकडं अमेरिकेला येण्यापूर्वी ओल्गाचं लग्न उरकून टाक. तिच्याजोगता मुलगा इकडं मिळणार नाही. मी लग्नासाठी पैसे पाठवतो.

ओल्गावर भाळलेले पुष्कळ तरुण लियात होते; पण ती कुणालाच उत्तेजन द्यायची नाही. काही सभ्य प्रतिष्ठित कुटुंबातून तिला मागण्याही आल्या होत्या; पण ती सर्वांनाच नाक मुरडी. शेवटी कंटाळून एलेनी म्हणाली, 'असं प्रत्येकाला धुडकावून लावशील तर शेवटी जोगीण बनावं लागेल तुला! बघ हं, जास्त नखरे करशील तर धाकटीचं लग्न आधी होईल. मग पस्तावशील–'

दरम्यान राजकीय वातावरण ढवळून निघत होतं. ग्रीसमध्ये उलथापालथ होत होती. ग्रीसमधलं कम्युनिस्टांचं आक्रमण थोपवण्यासाठी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी ३० कोटी डॉलरची मदत जाहीर केली. यामुळं लिया गावातलं वातावरण बिघडलं आणि तिथं अमेरिकाविरोधी वारे वाहायला लागले. अमेरिका म्हणजे एलेनी असं समीकरण आपोआपच झालं आणि सगळे गावकरी तिला पाण्यात पाहू लागले. इतकं झालं तरी ओल्गासाठी मागण्या येतच राहिल्या आणि ती एकेकाला नाकारीत बसली. एलेनीनं तिच्यापुढं हात टेकले. ती अगदी वैतागून गेली. कुणा ज्योतिषाला तरी विचारावं...

कॉफीच्या कपात डोकावून पाहून समोर बसलेल्या माणसाचं भविष्य सांगणारी एक जख्ख म्हातारीबाई लियामध्ये होती. एलेनी तिच्याकडे गेली. आपल्या कृश हाडाळ हातानं कप उलटापालटा करीत गंभीर आवाजात ती म्हणाली, 'बाई ग, मला तरी काही बरं चिन्हं दिसत नाही–' एलेनी धसकली. 'म्हणजे काय? आजीबाई नीट सांगा ना– काय होणार आहे माझ्या मुलीचं?..' 'तुला चार मुली... मोठीचं लग्न एवढ्यात नाही व्हायचं... पुढं केव्हा तरी कुणी तरी येईल आणि झडप घालून घेऊन जाईल तिला–'

'एकूण सारं वाईटच आहे का–?'

म्हातारीनं पुनः कपात डोकावून पाहिलं. सुस्कारा सोडून म्हणाली, 'मला काही नीट सांगता येत नाही बाई... असं दिसतंय की एका वर्षात तुझं घर ओकबोक, सुनंसुनं होणार–'

'हो– हो–' एलेनी आनंदून म्हणाली.

'आम्ही सगळे अमेरिकेला जाणार म्हणजे घरं रिकामच होणार की...'

'नाही– नाही– तसं नाही.' म्हातारी उद्गारली.

'मला इथं इडापीडा दिसतय. कुटुंबप्रमुखाचा मृत्यू दिसतोय. सुनं घर. मृत्यूचा थंडगार हात...'

एलेनीच्या अंगावर सरसरून काटा उभा राहिला. '... कुटुंबप्रमुख... ख्रिस्तोस...'

जाणार... ? चिरविरह... आम्ही उघड्यावर पडणार... ' ती भेलकांडत, हेलपाटत घेरी आली.

... दुसरेच दिवशी पोस्टमनने एलेनीच्या हाती एक लिफाफा दिला. त्यात अमेरिकेला जाण्यासंबंधीचे सर्व कागदपत्र होते. ते घेऊन ती सरकारी कचेरीत गेली तेव्हा तिला आढळून आलं की, स्थलांतरासाठी ख्रिस्तोसनं पाठवलेल्या पैशापेक्षा आणखी रकमेची आवश्यकता आहे. आता तिच्याजवळ ख्रिस्तोसनं ओल्गाच्या लग्नासाठी म्हणून पाठवलेले फक्त तीनशे डॉलर होते. तिनं मनाशी विचार केला. अग्रक्रम कशाला द्यायचा त्याचा ? आधी ओल्गाचं लग्न–हो... ख्रिस्तोस नंतर आणखी पैसे पाठवील कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी...

सरकारी कचेरीतून बाहेर पडताना तिला लियामधला एक जुना शिक्षक भेटला. तिनं त्याच्यापाशी आपलं मन उघडं केलं. आपल्या अडचणी, आपल्या पुढच्या अडचणी सर्व काही सांगितलं. तो म्हणाला, 'बाई ग शहाणी असशील तर तू या लिया गावातून निघून जा. मुलांना घे आणि बाहेर पड इथून. कम्युनिस्ट क्रांतिकारक अगदी आपल्या पाठीपोटाशी येऊन थडकताहेत. ते लियात येऊन पोचले म्हणजे तुझी काही धडगत राहणार नाही. सबंध उत्तर ग्रीसमध्ये त्यांनी कसला धुमाकूळ घातलाय माहीत आहे ना ? उजव्या विचारसरणीच्या एकेकाला वेचून काढून यमसदनाला पाठवताहेत. विचार कर हं.'

'पण मी काय घोडं मारलंय त्यांचं ?... आमच्या घरात आम्ही बायकाबायका आणि मुलंच तर आहोत. ते कशाला आमच्या वाटेला जातील ? आम्ही कुणाच्याच विरुद्ध काहीच केलेलं नाही... '

हे बोलणं एवढ्यावरच थांबलं; परंतु त्या सज्जन शिक्षकाचा अनाहूत सल्ला तिच्या मनात घर धरून राहिला. त्याचे शब्द तिच्याभोवती फेर करून नाचायला लागले. कुणाचा सल्ला घ्यावा तिला समजेना. तिनं ख्रिस्तोसला पत्र लिहिलं–आणखी पैसे हवेत...आणि तो शिक्षक असं असं म्हणत होता...काय करू सांग–तू सांगशील तसं करीन.

महिनाभरातच ख्रिस्तोसचं उत्तर आलं. '...लिया सोडून काही कुठं जायची गरज नाही. लढाई अगदी दारात येऊन ठेपली तरी तुला पळून जायचं कारणच काय ? अखेर ते क्रांतिकारक म्हणजे कुणी राक्षस, सैतान नव्हेत. आपले ग्रीक बांधवच आहेत



ना ? ते त्यांच्या हक्कांसाठी भांडताहेत... तुझ्या केसालाही ते धक्का लावणार नाहीत. निःशंक रहा...'

...उन्हाळा संपत आला. ओल्गाच्या लग्नाची तयारी पूर्ण होत आली. तिच्या ट्रंका कापडचोपडानं ओसंडून जायला लागल्या. तरीसुद्धा आणखी कपडे आणायला त्या मायलेकी यानिनाला गेल्या. दोन दिवस सतत दोघीजणी बाजार करीत होत्या. आता सामानासाठी एक गाडी करून घरी जायचं...जायच्या आधी जरा कॉफी तरी पिऊ या...

एका कॅफेमध्ये दोघी फराळासाठी बसल्या त्यांचं खाणं अर्धंमुर्धं झालं नाही तोच त्यांना बाहेर कसला तरी गलका ऐकू आला. बसल्या बसल्या त्यांना दिसलं की, बाहेर काही तरी येणार येणार–आलं आलं असं ओरडत लोक उभे होते. तेवढ्यात दोन लष्करी मालमोटारी आल्या आणि लोकांचा आरडाओरडा जास्तच वाढला. ट्रकमध्ये ओल्गाच्या वयाच्या मुली ठुसाठुस भरल्या होत्या. रडणाऱ्या–भेकणाऱ्या त्या तरुण मुलींचे केस विस्कटले होते...तोंडावर ओरखडे...

एलेनीनं ते दृश्य पाहिलं अन् तिचा चेहरा खरकन् उतरला.

ती ओल्गाला म्हणाली, 'काही विशेष नाही ग...पॉजोनी भागातल्या मुली आहेत त्या. दोन महिन्यापूर्वी क्रांतिकारकांनी त्यांना जबरदस्तीनं सैन्यात भरती व्हायला नेलं होतं. त्यातल्या काहीजणी पळून गेल्या. ...त्यांना परत नेताहेत...'

तिनं ओल्गाची कशीबशी समजूत घातली; पण स्वतःची कशी घालणार ? त्या मुलींसारखं एखादं दिवशी ओल्गालाही पकडून नेलं तर...

...नको–तो विचारच नको...

...खरंच त्या दिवशी भेटलेल्या त्या शिक्षकाचं बोलणं ऐकावं आणि गाव सोडून पळून जावं...पण ख्रिस्तोसनं तर बजावलंय की काही जरुरी नाही गाव सोडून जायची. इकडे आड अन् तिकडे विहीर...

( क्रमशः )

## पुस्तके

# प्रखर वास्तवाचं चित्र

भास्कर चंदनशिव यांच्या 'मरणकळा' या कथासंग्रहाच्या शीर्षकावरूनच ध्यानात येतं की या कथा, व्यथा–वेदनांच्या कथा आहेत. समाजाने प्रचलित राजकारण–अर्थकारणाने आणि दैवानेसुद्धा ज्यांचं चिपाड केलंय, त्यांच्या मन पिळवटून टाकणाऱ्या या कथा! लेखक अतिशय पोटतिडकीने सांगतोय, त्यांच्या मनातले कढ शब्दाशब्दाने जाणवताहेत, तरीही तो दूर उभा आहे. तो फक्त वेदना पोचवतो. कथेवर आपल्या अस्तित्वाचे ओझं टाकीत नाहीत. मोठमोठ्या कसलेल्या लेखकांनाही कित्येकदा न पेलवलेली ही अलिप्तता भास्कर चंदनशिव यांनी सहजतेने पेलली आहे. ही गोष्ट त्यांना साधली कारण दलित वर्गात मोडणारी ही माणसं, त्यांची जीवन जगण्याची रीत, त्यांच्यातले ताण–तणाव आणि उरी फुटेस्तोवर सोसावी लागणारी दुःखं हे सगळं लेखकाच्या व्यक्ति–मनात मुरलेलं आहे. म्हणूनच जाणवतं या कथा म्हणजे 'अंतरीचा उमाळा' आहे. लेखकाच्या भाषाशैलीतून याची साक्ष मिळते. निसर्गवर्णन, व्यक्तिवर्णन, माणसामाणसातले संवाद, मनातल्या मनात केलेलं चिंतन या सगळ्यात विलक्षण घुसमट आहे. गदगदलेपण आहे. 'कळस'मधलं जळत्या दुपारचं वर्णन, 'मरणकळा'मधलं अंधाराचं वर्णन यातून कथेच्या मूलस्त्रोताकडे आपल्याला खेचून नेलं जातं. जळणारी मनं आणि अंधारलेली जीवनं दाखवली जातात.

शाळकरी वयातल्या बापूला मांगाची आणि चांभाराची भाकर वाटून न देता एकदम नेण्यासाठी कावड करण्याची कल्पना सुचते; पण ही युवती सफल होत नाही. संतापलेला चांभार भाकरी कुत्र्यापुढे फेकतो आणि भुकेने कळवळलेला मांग रणरणत्या उन्हाकडे पहात गपगार होतो. जातीयतेच्या विषवेलीचा हा क्रूर विळखा, निरागस वयात गरिबीची दुःखं भोगणाऱ्या बापूच्या घालमेलीच्या पार्श्वभूमीवर अंतःकरणाचा अधिकच दाह करतो. 'गुन्हेगार'मधल्या धुरपाचं, 'शाजी'च्या मृत्यूचं दुःखही अस्वस्थ करून टाकणारं आहे. महाराच्या पोराचे धिंडवडे आणि शेवटी मृत्यू याला समाजच जबाबदार आहे हे धीटपणे सांगणारी धुरपा ही वेदनेला वाचा फोडणाऱ्या, जागृतीचं भान आलेल्या अस्पृश्यांची प्रतिनिधी आहे. 'सरपंच' ही सुद्धा वास्तवाचं भेदक चित्रण करणारी, राजकारणाचा जीवघेणा खेळ उकलून दाखवणारी एक कथा. दलिताला सरपंच करून त्याच्या हार–तुऱ्याचा सुगंध वाऱ्यावर दरवळला नाही तोच दलित वस्तीतून आगीचे लोळ दिसतात. भविष्याची स्वप्नं पहाणारी ही माणसं बेचिराख होतात. खरं तर भारतीय समाजाची आणि गलिच्छ राजकारणाची ही शोकांतिका आहे. आजही खेडोपाडी जमीनदार लोक नाही नाही ती आमिषं दाखवून. माणसांना शेतावर फुकट कशी राबवून घेतात आणि अडाणी, असहाय्य त्यांच्या फासात कशी अलगद अडकतात याचं दर्शन होतं 'वाळवी' या कथेत! दारिद्र्यामुळे आपल्या कोवळ्या पोरीला धंद्याला लावणारा बाप 'पोटचं पोटाला' या कथेत दिसतो. ही अगतिकता खिन्न करणारी आहे. भीमा महाराला सागुतीऐवजी घोड्याची लीद मिळते. बाकीची माणसं तृप्त होऊन, ताव मारून घरी परततात. भूक माणसाला किती लाचार, असहाय्य बनवते हे या कथेतून दिसतं. 'इलाज'मधला गोपीनाथ कळवळून प्रश्न करतो, 'माझ्यासारख्याच्या मरणावर' इलाज कोण करील? डॉक्टर होण्याचं स्वप्न अपुरं राहिलेला हा तरुण उपकारकर्त्याचा अपराध केल्याच्या भावनेने आणि परीक्षेतल्या अपयशाने खचून मित्राला शुभेच्छा देऊन मृत्यूला कवटाळतो. 'तडा', 'घात', 'कळस', 'आधार' या इतर कथाही दारिद्र्य, जुलूम, तंटेबखेडे यांच्या कथा आहेत. त्यातून मनुष्यस्वभावाचे अनेक पैलू प्रकट होतात. सुस्थिती आल्यावर मुलगा गरीब आई-बापांना विसरला, शहरात रमला, आपल्याला पुरता परका झाला हे प्रखरपणे जाणवल्यावर भग्न हृदय झालेला बाप 'तडा'मध्ये भेटतो, तर लाडक्या लेकीला चोळी–लुगडं घेण्याची ऐपत नसल्याने सैरभैर मन झालेला बाप 'आधार'-मध्ये दिसतो.

## प्रभावी मांडणी

दलित वाङ्मय म्हणून या कथांचं मूल्यमापन करताना स्पष्टपणे जाणवतं या कथा तथाकथित दलित साहित्यात आपल्या वेगळेपणाने उठून दिसणाऱ्या कथा आहेत. यात आक्रोश नाही. मुखवटा नाही. लाट आली आहे तर लिहून घ्यावं अशा वृत्तीचा मागमूसही नाही. कसलाही बेगडीपणा, नाटकी सूर, प्रचारकी झालर नसलेल्या या कथा म्हणजे जिवंत, अस्सल अनुभूतीची कसदार शब्दचित्रं आहेत. इथला भीषण अंधार, उजाड रखरखतं माळरान, विझलेल्या डोळ्यांची माणसं, दारिद्र्याचं थैमान या सगळ्यातली वेदना आपल्याला सुन्न करते ती प्रखर वास्तव, कलात्मकतेने सामोरं आल्यामुळेच! या कथांमधली भाषा ही बोलीभाषा आहे आणि ती अशा ताकदीने वापरली आहे की, इथे शब्दांचं जडत्व नाहीसं होऊन ते जणू आतडं पिळवटल्यावर सहजतेने बाहेर येणारे खोल उसासेच ठरतात. ग्रामीण बोलीतली लयकारी, थेट मनाला भिडणारी निर्व्याजता ही या लिखाणातली श्रीमंती एक वेगळाच आनंद देते.

या सगळ्या कथा वाचल्यानंतर मनात एक विचार आला तो असा की, पिढ्यान् पिढ्या दलित, शोषित पीडित असलेल्या या समाजाच्या परिस्थितीत या घटकेपर्यंत काहीच बदल झाले नाहीत का? त्यांना आशेचा किरण अगदीच दिसत नाही अशी आजची परिस्थिती आहे का? मग या अल्प प्रमाणात का होईना पण निश्चित झालेल्या बदलाचं चित्रण या कथासंग्रहात कुठेच का नसावं? लेखकाला जे भावेल ते लिहिण्याचं त्याचं स्वातंत्र्य मान्य करूनही असं वाटतं की, या मरणकळांवर केले जात असलेले इलाज त्याच्यापर्यंत पोचायला हवे होते. कटु सत्याचं चित्रण असलेल्या या कथांमध्ये आजच्या वास्तवाचं थोडं तरी भान दिसायला हवं होतं. त्या अभावी एकच एक काळी बाजू दाखवण्यात ही

प्रतिभाशक्ती रमली आहे असं दृश्य दिसतं आणि ती या कथासंग्रहाची मर्यादा वाटते. अर्थात असं असलं तरी जे मांडलं आहे ते फारच प्रभावी आहे, संवेदनशील मनाला मुळापासून हलवणारं आहे.

श्री. सुभाष अवचट यांनी काढलेलं मुखपृष्ठावरील सुरेख चित्र आणि मलपृष्ठावरील डॉ. भालचंद्र फडके यांचे या कथासंग्रहाचे मार्मिक, उत्कृष्ट मूल्यमापन, या संग्रहाच्या सौंदर्यात मोठीच भर घालतात.

—मेधा सिधये

' मरणकळा '—भास्कर चंदनशिव
प्रकाशक—गुलाबराव मारुतीराव कारले
सुरेश एजन्सी
२०५ शुक्रवार पेठ, पुणे २
प्रथमावृत्ती ऑगस्ट १९८३
पृष्ठे १४९. किमत ३० रुपये

# शिवाण्णा

महंमद नैसर्गी या उदयोन्मुख लेखकाची ही कादंबरी नुकतीच अनंत प्रकाशनतर्फे प्रसिद्ध झाली आहे.


'शिवाण्णा ' या व्यक्तिरेखेभोवतीच सारी कादंबरी फिरते. हा एका बँकेतील शिपाई समाजाचे कोणतेच नीतीनियम वगैरे न पाळणारा; पण वच्छी या आपल्या प्रेयसीबरोबर राहू लागल्यापासून काहीसा स्थिर झालेला; पण सगळे ठीकठाक चालले असताना वच्छीवर अत्याचार होऊन तिचा खून होतो आणि शिवाण्णा वेडापिसा होतो. खुनी माणसाचा पत्ता लागत नाही. इतकेच नव्हे तर एक संशयित म्हणून त्याचीही चौकशी होते. यामुळे तो पार भरकटतो आणि विचित्र मनःस्थितीत घर सोडतो. अनेक गावे हिंडून शेवटी एका निर्मनुष्य टेकडीवर वस्ती करतो. शेजारच्याच गावातील एका म्हाताऱ्या दुकानदाराची व त्याची ओळख होते. त्याच्या मृत मुलासारखाच हा दिसत असतो. त्यामुळे त्याला आपला मुलगाच मानून तो दुकानदार शिवाण्णाला त्याच्या विधवा सुनेशी लग्न करायला भाग पाडतो. अशा रीतीने बंधने नको असलेला शिवाण्णा परत एकदा बंधनात अडकतो. एव्हाना त्याच्या टेकडीवर वस्ती झालेली असते. तिचा हाच नेता बनतो; पण नंतर काही गुंड त्याला मारहाण करून वस्तीचं नेतेपद त्याच्याकडून बळकावतात. संतापाने, अपमानाने धुमसत असतानाच या गुंडांपैकीच एक वच्छीचा मारेकरी हे शिवाण्णाला कळते आणि तो सगळ्यांचा खून करतो. वस्तीला तावडीतून सोडवून, स्वतःचा संसार सोडून दूर कुठे तरी निघून जातो.

आजच्या समाजरचनेशी आणि न्यायपद्धतीशी जुळवून घेता न आल्याने समाजापासूनच दुरावलेल्या शिवाण्णाची ही शोकांतिका कथाकल्पनेच्या दृष्टीने प्रभावी वाटली तरी लेखकाला ती नीट फुलवता आलेली नाही. सुरुवातीलाच खून—प्रकरणाच्या रहस्यमयतेमुळे कादंबरी रंगत जाणार असे वाटतानाच ही पकड सुटते. पुढे बराच काळ शिवाण्णाबरोबर कथासूत्रही भरकटलंय. — शिवाण्णा वस्तीसाठी बरंच काही करतो. अशा परिस्थितीत त्याला मारहाण होत असताना वस्तीवरचे एवढे लोक ५—६ गुंडांना प्रतिकार करू शकत नाहीत हे जरा विचित्रच वाटते. मधूनच सुभाषितासारखी वाक्ये व परिच्छेद आल्यानेही कथानकाचा ओघ थांबतो. हा लेखकाचा सुरुवातीचाच प्रयत्न त्यामुळे नवखेपणा क्षम्य मानायला हवा; पण कादंबरीच्या पूर्वार्धात शिवाण्णा अशुद्ध बोलतो; पण उत्तरार्धात मात्र तो सफाईने शुद्ध भाषा बोलायला लागतो. यासारख्या ढोबळ चुका चांगल्याच खटकतात.

—सीमा कुलकर्णी

' शिवाण्णा '
महंमद नैसर्गी
अनंत प्रकाशन
पृष्ठे १७६ — किमत तीस रुपये □

# कुंपण आणि आकाश



**मंगला गोडबोले**

दुपारच्या लिहिण्या—वाचण्याच्या निवांत वेळेत बेल वाजली तेव्हा किंचित नाराजीनेच दार उघडलं. या वेळेत आमच्या परिसरामध्ये फिरत्या विक्रेत्या, पाहणी करणाऱ्या प्रतिनिधी, मोठमोठ्या कंपन्यांच्या किरकोळ सवलत योजना राबवणाऱ्या अशा अनेकींचा फार जाचक सुळसुळाट असतो. दारात त्यातलीच एक कोणी तरी उभी दिसली. चेहेऱ्यावर कमावलेलं हसू, हातात मोठा तक्ता, पेन आणि तोंडावर न संपणारी तीच ती प्रश्नावली ! कुठला साबण वापरता, तोच का वापरता... आवाज ओळखीचा वाटला म्हणून पुन्हा पुन्हा निरखून पाहत्ये तर तीच ओरडली,

' अय्या तू ? किती वर्षांनी दिसत्येस ? मला ओळखलंस ? मी लोकूर. एम. ए. ला संस्कृत घेतलं नव्हतं का ? तुझ्या पुढची बेंच माझी. ' नंतरही ती कुठल्या कुठल्या खाणाखुणा सांगत राहिली. मला मात्र ओळख पटलीही आणि नाहीही. व्यक्ती तीच होती; पण व्यवसाय मात्र अगदीच अनपेक्षित. हे कशामुळं झालं असावं ? तशी प्रथमदर्शनी तर ती सुस्थितीत दिसत होती. परिस्थितीच्या रेटयामुळे अशा व्यवसायात पडली असावी असं वाटत नव्हतं. तिच्या शिक्षणामुळे, तिच्या सांस्कृतिक, सामाजिक पार्श्वभूमीमुळे यापेक्षा वरच्या दर्जाचं काम करण्याची तिची कुवतही नक्कीच होती. मग ती अशी, माझ्या दारात ? न मागताच उत्तर मिळालं, ' अग, हे वर्षातले आठ-नऊ महिने शीपवर असतात. मुलं आता जाणती झाली आहेत. मी काय करायचं ? सहजच हिंदुस्थान लिव्हरच्या या सर्व्हेची जाहिरात आली, ओळखीनं काम मिळूनही गेलं. नुसतं

रोज पाच–सहा तास फिरलं तरी महिन्याला आठशे, हजाराला मरण नाही. काय वाईट आहे ?

तिनं मलाच प्रतिप्रश्न केला म्हणून मी गप्प राहिले; पण माझ्या मते हे सगळंच वाईट होतं. ही बाई संस्कृतची एम. ए. हिनं असं काम स्वेच्छेनं करावं आणि मुख्य म्हणजे त्याचं समर्थन करावं असं का ? या देशात बेकारीच्या समस्येमुळे चपराशाच्या जागेसाठी सुद्धा पदवीधरांचे अर्ज येतात हे मलाही माहीत आहे; पण त्यापैकी बहुसंख्यांना पर्याय नसतो, मिळेल त्या पहिल्या संधीला आपल्या कुवतीनुसार काम मिळवण्याची बहुसंख्यांची इच्छा असते. या बाईच्या बाबतीत मात्र निकडही नाही, महत्त्वाकांक्षाही नाही, वैफल्यही नाही. सगळाच चालढकलीचा मामला आणि सगळ्यावरती त्या आठदहा नोटांचं उबदार पांघरूण. तसा तर काय, भायखळा मार्केटमध्ये बटाट्याची वखार काढणारा माणूससुद्धा हजारोंची उलाढाल करतो. मग त्याच्यात आणि आपल्यात फरक काय ? असा प्रश्न शिक्षणानं, संस्कारानी, वयानं या बाईच्या मनात येत नसेल का ?

### लोकांचं भय

यात खरी गुन्हेगार आपली शिक्षणपद्धती आहे हे नव्यानं सांगायला नकोच. निरर्थक, निरुपयोगी पदवी शिक्षणाचा रतीब व त्याला जोडलेली खोटी प्रतिष्ठा यांविषयी पुष्कळच लिहिलं, बोललं गेलंय. स्त्रियांच्या बाबतीत मात्र स्वत.विषयीचा न्यूनगंड, आत्मविश्वासाचा अभाव, आत्मसंतुष्टता, एकूण आयुष्यातलं दुय्यमपण, निरुद्देश जगणं अशा अनेक गोष्टी एकत्र येतात आणि या प्रश्नाला अनेक गुंतागुंतीचे पदर जोडले जातात. याहून अधिक काम करण्याची माझी कुवत आहे, अधिक यश, नाव वगैरे मिळवण्याची माझी पात्रता आहे असं उघड बोलणं तर सोडाच; पण मनोमन असा विश्वास बाळगणंही बहुतेकींना जमत नाही. हा विनय आहे असं काहींना वाटतं पण तो अविश्वास असतो. आपण काय, काही तरी करायचं म्हणून अमुक काम करतोय असा धोपटमार्गच जास्त ! एकदा आपणच आपल्याविषयी इतकी उदासीन वृत्ती बाळगली, की जग पावलोपावली ठेचणारच ! कालांतराने जगही आपल्याविषयी फारशा काही अपेक्षा बाळगेनासं होतं आणि आपणही आपल्याविषयी मुर्दाड, निर्ढावलेले होऊन दुय्यमतिय्यम कामावर खूष राहू लागतो. या दुष्टचक्रामुळे आपल्यापैकी कित्येक स्त्रिया स्वतःच्या निम्म्याशिम्म्या कुवतीवरच गुजराण करत असतील आणि बरीचशी सुप्त स्त्री शक्ती पूर्णपणे वाया जात असेल असा माझा कयास आहे.

पण ही झाली स्त्रियांच्या कामाविषयीची एक बाजू. दुसरी याहून महत्त्वाची बाजू म्हणजे आपल्याला स्त्रीसुलभ सगळी कामं जमतातच असं दाखवण्याचा स्त्रियांचा अट्टाहास. मुळामध्ये 'स्त्रीसुलभ' कामं ही एक भ्रामक कल्पनाच आहे. कामांचे, कलांचे, व्यासंगांचे, स्त्री व पुरुष या लेबलांचे गठ्ठे निसर्गाने केलेले नाहीत. परंपरेतून, संस्कारांमधून बसलेले हे कृत्रिम, वरवरचे शिक्के आहेत; पण जातीबाहेर टाकलं जाऊ नये म्हणून की काय, स्त्रिया त्यांच्या त्या पारंपारिक कामांना, भूमिकांना नको इतक्या चिकटून राहतात आणि त्यातून स्वतःचं अवमूल्यन किंवा ओढताण करून घेतात. याचं नेहमीचं उदाहरण द्यायचं तर नोकरी करणाऱ्या स्त्रियांची गृहकृत्यदक्ष म्हणवून घेण्याची धडपड आठवावी ! दिवसाचे आठदहा तास बाहेर घालवणारी स्त्री पूर्ण वेळ घरी राहणाऱ्या स्त्रीशी गृहकृत्यदक्षतेबाबत स्पर्धा करेल तर तिच्या पदरात दुसरं काय येईल ? पण याबाबतीत माघार घेणं हा जणू काही आपला पराभव आहे, आपल्या कर्तव्यात कसूर आहे, गृहिणीपणावर बट्टा आहे असंच कित्येक नोकरी करणाऱ्या स्त्रिया कळतनकळत मानत असतात. कामाला जास्त नोकर ठेवणं, बाहेरची मदत घेणं, आयते पदार्थ आणणं, आतिथ्याच्या कल्पना बदलणं असे अनेक पर्याय उपलब्ध असूनही त्या वाटेला जाण्याचं त्या कटाक्षानं टाळतात. उलट आपण नोकरी करत असलो तरी घरात कस काऽऽऽही कमी पडू देत नाही. हे दाखवण्यासाठी त्या रात्रंदिवस देहानं आणि मनानं झिजत राहातात. परिणामी अकाली म्हाताऱ्या होतात, चिडचिड्या होतात, निदान आयुष्याचा उपभोग घेण्याची त्यांची कुवत नक्कीच कमी होत जाते. याबाबतीतही आपण घराबाहेर करत असलेल्या कामाच्या बदल्यात घरातल्या अमुक कामांपासून आपल्याला सुटका मिळाली पाहिजे अशी न्याय्य मागणी स्त्रियांना करता येईल; पण त्यासाठीही पुन्हा किमान आत्मसन्मान, आत्मविश्वास हवाच. स्त्रियानीच तो दाखवला नाही तर घरं, कुटुंब, समाज त्यांना दाव्याला बांधायला टपलेला आहेच.

या सर्वांमुळे आज नजर टाकावी तिथे दुय्यमतिय्यम दर्जाची अनेक कामं अष्टौप्रहर करणाऱ्या स्त्रिया आपल्याला दिसतात; पण एखादंच निवडक काम खूप उंचीवर नेऊन करणाऱ्या स्त्रिया फारशा दिसत नाहीत. कधी त्यामागे भावनिक दडपण असतं, कधी आर्थिक रेटा असतो, कधी सामाजिक संमतीची धडपड असते; पण या सर्वांइतकीच स्त्रियांची मनोवृत्तीही याला कळत नकळत जबाबदार असते. वास्तविक दोन साधी सूत्रं मनी बाळगली तर या प्रश्नातून मार्ग दिसेल. एक तर कुणाही मनुष्याच्या शक्ती या मर्यादित असतात आणि दुसरं म्हणजे कोणाही माणसाला काही विशिष्ट कामांमध्ये कल असतो, गती असते तर काहीत ती तितकी नसते. याला स्त्रिया किंवा पुरुष कोणीही अपवाद नाही. आपण सर्व कामं सारख्याच क्षमतेनं करू असं म्हणणं हे स्वतःला फसवण्यासारखं आहे. त्याचप्रमाणे आपण एका आयुष्यात दोन तीन भूमिका किंवा दोन तीन व्यक्तींची कामं सफाईनं करून दाखवू असं म्हणणं हेही भ्रामक आहे. भूमिकेची किंवा कामाची निवड ही व्यक्तीला आयुष्यात केव्हा ना केव्हा करावीच लागते. मग अगदीच नाइलाज झाल्यावर, देहान असहकार पुकारल्यावर ही निवड करायची की, अगोदरच सुज्ञपणे आपल्या इच्छाआकांक्षांची, कुवतीची बूज राखायची ? अशी निवड करून पत्करलेली कामं स्त्रिया करू लागल्या की, साहजिकच त्या कामातलं त्यांचं स्वारस्य वाढेल, महत्त्वाकांक्षा जागी होईल, आजूबाजूच्या किरकोळ कामांमध्ये आपला वेळ व शक्ती वाया जाणार नाही याची त्या खबरदारी घेतील, स्वतःला सिद्ध करण्याची जबाबदारी त्यांच्यावर पडेल आणि ती पार पाडण्यासाठी आपल्या सर्व शक्ती त्या एकाच कामात एकवटून त्या कामाचं आणि स्वतःचंही त्या सोनं करतील. त्याचं महत्त्व पटलं की, 'लोक काय म्हणतील ?'चं भय त्यांना राहाणार नाही आणि कदाचित त्यांच्या कामाचं महत्त्व पटून लोकही त्या वेळी त्यांच्याबद्दल चांगलच काहीबाही म्हणतील ! □

## गारांचा पाऊस

शोभा भागवत

# पैशांची भाषा

एक सात वर्षाची मुलगी सुजाता. चुणचुणीत. बोलायला चतुर, बोलकी, उत्साही. काही काळ तिच्याशी बोललं की जाणवतं ही सारखी पैशांच्या भाषेत विचार करते, बोलते.

तुम्ही तिला तिचा फ्रॉक किती छान आहे म्हणा. ती म्हणेल, 'हो मग माईंनी दीडशे रुपयाला आणलाय.' तुम्ही तिला एखादं खेळणं भेट द्या. ती लगेच विचारेल 'केवढ्याचं आहे हे ?' त्यादिवशी तिच्या मावशीला एका लग्नात मिळालेल्या साडीची चर्चा चालली होती. त्यावर सुजातानी लगेच विचारलं, 'साडी किती रुपयांची आहे ? महाग आहे का स्वस्त आहे ?'

पैशांच्या भाषेत विचार करणं एवढ्यावर थांबत नाही. दीडशे रुपयांचा फ्रॉक घाल-णाऱ्या मुलीच तिला तिच्या योग्यतेच्या वाटतात. वाढदिवसाला आलेल्या खेळण्या-पैकी सर्वात महाग खेळणं तिला जास्त आवडतं. कमी किमतीची छान पुस्तकं केवळ कमी किमत म्हणून तिला आवडेनाशी होतात.

ह्या महागबरोबरच 'तिकडून' आणलेल्या गोष्टींचंही सुजाताला कौतुक आहे. मग तिकडून आणलेला साधा फ्रॉकही इथल्या खणाच्या परकर पोलक्यापेक्षा तिला जास्त चांगला वाटतो.

सुजाताच्या ह्या अशा बोलण्याची सुर-वातीला मला गंमत वाटायची; पण नंतर जास्त बारकाईनं निरीक्षण केल्यावर मला हा प्रश्न गंभीर वाटायला लागला. हे पैशात विचार करणं तिच्या मनात फार खोलवर रुततंय असं जाणवायला लागलं, जेव्हा ती बाबांच्या पगाराची तुलना मैत्रिणींच्या वडलांच्या पगाराशी करू लागली तेव्हा.

एरवी आपण सुजाताएवढ्या मुलांशी पैशांच्या गोष्टी अशा क्वचितच बोलतो; पण एकदा ती पद्धत पडून गेल्यावर सुजाताचे कान असे तपशील बरोबर पकडायला लागले. तिला प्रत्यक्ष कुणी न सांगता ही माहिती मिळवायची, अंदाज करायची तज्ज्ञता आली.

हे कसं घडत गेलं ? सुजाताचे आई-वडील दोघंही नोकरी करतात. दोघांनाही बऱ्यापैकी पगार. संसार होसेनं करण्याची आवड. काही फुकट जाऊ नये याची दक्षता. यात काय वाईट आहे ? सगळं छान आहे; पण त्यापायी सुजातानं नवा फ्रॉक मळवला तर आई म्हणायची– 'आणल्या आणल्या कर चुराडा. वाया घालव दीडशे रुपये.' वाढदिवसाला खेळणं आणलं की बाबा म्हणायचे, 'शोने, कसं आणलंय खेळणं ? दोन नोटा मोजून दिल्यात.'

घरात फळं आणायची झाली तरी ४० रु. डझनाचे नकोत. ६० रु. डझनाचेच आंबे आणू या. कुणी दिलेली भेट कमी प्रतीची वाटली की, 'घेतलं असेल फुटपाथवरून' अशी संभावना व्हायची.

त्यामुळें सुजाताच्या बालपणावर हाच संस्कार झाला. ज्याला जास्त पैसे लागतात ते चांगलं. वस्तू घ्यायच्या त्या मोठ्या दुकानातून. जेवायला जायचं ते मोठ्या हॉटेलात. कपडे घ्यायचे ते महागातले. प्रेझेंटस् द्यायचो तो पैशाच्या भाषेतलो.

कमी किमतीच्या वस्तूही सुंदर असतात. कधी कधी प्रेमानं दिलेल्या मूठभर पोह्यांच्या पुरचुंडीचं मोल सोन्यानाण्याच्या संपत्तीपेक्षा जास्त असतं. बागेतली भेळ किंवा पाणीपुरी कधीकधी मोठ्या हॉटेलमधल्या खाण्यापेक्षा चवदार लागते. भेटवस्तू स्वीकारताना देणाऱ्याचं मन, त्याची निवड, त्याचं प्रेम बघायचं असतं. फक्त किमतीचं लेबल बघा-यचं नसतं हे सुजाताला कुणी सांगितलंच नाही.

कुणी सांगावं, पुढे कदाचित सुजाताला हे कळेलही पण तोवर पैशांच्या भाषेत आईनं मला १५० रु. चाच फ्रॉक घेतला ३०० रु. घेतला नाही हा केवढा अन्याय केला असंही तिच्या मनात येत असेल. काही माणसे साधे कपडे घालतात. त्यामागे केवळ चिक्कूपणा नसतो. दुसरं मोठं तत्त्व असतं, हे तिला कळ-णारच नाही आणि कपडे निवडताना केवळ किमतीचा विचार करायचा नसतो. ते कापड, त्याचा स्पर्श यांचा विचार केला तर कधी-कधी साधे सुती कपडेच सरस ठरतात.

पण सुजाता आहे सात वर्षाची. तिला एवढं सगळं सुचणं शक्य नाही. प्रश्न आहे आपला. पालकांचा. आपण या बाबतीत काय विचार करतो ? काय बोलतो ? कशाला चांगलं म्हणतो ? कशाला नावं ठेवतो ?

आपली मुलं यातूनच संदेश घेत असतात. पैशाला प्रतिष्ठा मिळत आहे. रोज आणखी आणखी महाग-महाग वस्तू बाजारात येता-यत. आणखी-आणखी महाग-महाग हॉटेलं उघडतायंत. जीवनमान उंचावतं आहे (!) पण या सगळ्यातून आपल्या मुलांची मनं तर नासून जात नाहीत ना ? पैसा हेच मूल्य बनतंय का ?

आपण पालक कधीकधी तक्रार करतो. हल्लीच्या मुलांना सगळं आयतं मिळतं. त्यामुळं त्यांना कष्टाची किमत कळत नाही. वस्तूंच्या वापराची पर्वा वाटत नाही आणि ६० रु. ची खेळणी घेऊन दिल्यानंतर १० रु.चं खेळणं घेतलं नाही म्हणून मूल पालकां-वर रागावतं, हातपाय आपटतं, तघेतलेली खेळणी फेकून देतं.

पैशाची किमत मुलांना जरूर कळावी; पण सगळ्याची किमत त्यांनी पैशात करू नये यासाठी सुजाताच्या बोलण्यातून आपण काही तरी शिकायला हवं आहे.

थोर माणसांच्या जीवनात चैन, ऐषआराम, पैसा, खर्च, याला स्थान नसतं. म्हणूनच प्यायला घेतलेल्या पाण्यापैकी अर्धा ग्लास पाणी फेकून दिलं तर गांधीजींना दुःख व्हायचं. ते पाणी फेकणं म्हणजे पाणी आण-णाऱ्या माणसाचे श्रम वाया घालवणं आहे. बेजबाबदारपणे निसर्ग वापरणं आहे. डॉ. कार्व्हरनी कॉलेजमध्ये असताना शिवलेला एकच सूट जन्मभर शिवून शिवून वापरला. गाडगेबाबा तर रस्त्यात सापडलेली कुठलीही चिंधी लुंगीला शिवून टाकायचे आणि लुंगी घड करायचे. ह्या माणसांनी कपडे, उधळ-माधळ याचा खूप विचार केला असणार.

आपल्या रोजच्या धकाधकीत शांतपणे असा विचार करायला आपण वेळच देत नाही आणि काही वर्षांनंतर जाणवतं की त्या त्या काळात वर्तमानातल्या 'जगण्या'ला आपण काही वेळच दिला नाही. आपण नुसते धावत होतो. कधीकधी नुसतेच पैशा-साठी धावत असतो. कुठे तरी वाचलेलं आठवतंय–

पैसे मिळवण्यासाठी माणसं खूप वेळ खर्चं करतात आणि उरलेला वेळ घालवण्यासाठी पुनः खूप पैसे खर्चं करतात. □

सहजीवन कसे व कुठे : पृष्ठ ११ वरून

आले नाही. तेव्हा त्यानी एक युक्ती केली. एका गरीब ब्राह्मणाला मुलाचे लग्न करण्यासाठी पैशांची गरज होती. तेव्हा या विरोधकानी त्याला सांगितले की, तुला हवेत ते पैसे आम्ही तुला देऊ; पण त्याकरता त्याने एकच गोष्ट करावी. काही करून एकनाथांना राग येईल असे करावे. या ब्राह्मणाला वाटले की, त्यात काय कठीण आहे ? आपण एकनाथाच्या ग्रंथाची निंदानालस्ती केली तरी त्यांना राग येईल. तेव्हा तो ब्राह्मण एकनाथांच्या घरी गेला. एकनाथांच्या घरचा प्रघात होता की, कोणी असा माणूस आला की, त्याला जेवायला ठेवून घ्यायचे. या ब्राह्मणाने गेल्यागेल्याच एकनाथावर टीकास्त्र सोडले; पण एकनाथ काही रागावेनात. मग जेवणाची वेळ झाली. या ब्राह्मणालाही सन्मानाने पाटावर बसवले गेले. एकनाथांच्या गिरिजेने छान रुचकर पदार्थ केले होते. ते ती स्वत: वाढत होती. ब्राह्मणाला वाटले की, या स्वयंपकाची निंदा केली की या बाईला राग येईल व मग तिला राग आला की एकनाथानाही येईल. मग त्याने हे पदार्थ कसे बेचव आहेत, गाढवानेच खाण्याच्या लायकीचे आहेत, वगैरे सांगायला सुरुवात केली. तरी ही पतिपत्नी शांतच ! तेव्हा मग त्या ब्राह्मणाने एक अघोरी उपाय करायचा ठरवला.

गिरिजाबाई वाकून वाढत होती. तिच्या पाठीवरच या ब्राह्मणाने उडी मारली. एकनाथ पटकन बायकोला म्हणाले, 'सांभाळ हो, तो ब्राह्मण पडेल !' तर गिरिजामाउली म्हणाली, 'तुम्ही निश्चित रहा. मला माझ्या हरिपंताला (मुलाला) पाठीवर घेऊन वाढायची चागली सवय आहे !'

त्या मुद्दाम त्रास देण्यासाठी आलेल्या ब्राह्मणालाही मुलाच्या स्वरूपात पाहाणारी ती साध्वी आणि ते साधू एकनाथ हे जोडपे-हे मोक्षाच्या प्रवासातही एकत्र वाटचाल करते...

अलीकडच्या काळातले उदाहरण घ्यायचे तर गांधीजी व कस्तुरबांचे घेता येईल. या 'बा'ने बापूजीबरोबर भंग्याचे काम केले. लढयाच्या वेळी मार खाल्ला, कैद पत्करली, एवढंच नव्हे तर बापूना चरखा कसा चालवायचा ते तिने शिकवले. वयाच्या अवघ्या चाळिसाव्या वर्षी दोघांनीही एका अर्थाने ब्रह्मचर्याश्रम स्वीकारला होता. तरीही मीराबेनना-मेरी स्लेड या ब्रिटिश युवतीला-बापूनी मुलगी मानले तर तेच नाते कस्तुरबानीही पाळले. त्यात कुठेच संशय नव्हता, हेवा नव्हता, आसक्ती नव्हती, सक्तीही नव्हती.

सर्वसाधारण जोडप्याना हा मोक्षाचा प्रवास जमला नाही तरी किमान लग्नाच्या प्रसंगी दिलेले वचन 'धर्मे च, अर्थे च कामे च नातिचरामि' त्यांनी पाळावे अशी भारतीय संस्कृतीची अपेक्षा आहे.

पतीने मिळवलेला पैसा किंवा त्याचा जमीन-जुमल्यावरचा हक्क हा केवळ त्याचा नाही. तो पत्नीचाही आहे. केवळ ५० टक्के किंवा तत्सम टक्केवारी कायदा ठरवील त्याप्रमाणे नव्हे तर सहजीवनाच्या तत्त्वाने, सहधर्मचारिणी या नात्याने, जे जे पतीचे ते ते सारे पत्नीचे व जे जे पत्नीचे ते ते सारे पतीचे, ही भावना हा सहजीवनाचा आधार आहे. अर्थ व काम साधणे, भोगणे या पूर्णतेच्या प्रवासातले पहिले काही टप्पे आहेत. स्त्री-पुरुषांचे शारीरिक संलग्नतेचे नाते-कामचारिणीचे वा अर्थउत्पादनातल्या साथीदाराचे नाते हे रात्रीचे व दिवसाच्या काही क्षणांपुरते मर्यादित असते. अमर्याद असते, ते धर्माचे नाते. ते नाते की ज्यामुळे नवीन कुटुंब निर्माण होते. ते वाढते. पशुपक्ष्यांप्रमाणे नव्हे तर मानवी धर्माप्रमाणे, ज्यात मनाचा विकास आहे, विज्ञानाचा विकास आहे, आनंदमय बनणे आहे.

आपल्या संस्कृतीत पूर्णपुरुषाची कल्पना आहे. अलीकडील मानसशास्त्रज्ञ व भविष्यवेत्ते ( Futurist) Whole person ही सकल्पना माडत आहेत. आपण ज्या वेळी पुरुष म्हणतो त्या वेळी त्याचा अर्थ शरीरात राहणारा (पुरि शते इति पुरुष.) male आणि female ही दोन्ही या अर्थाने पुरुषच. या पूर्णपुरुषाच्या संकल्पनेबाबत मी श्रीकृष्णाच्या पत्रात सविस्तर लिहिलेच आहे. यात पुरुषांच्या व स्त्रियाच्या, पतीपत्नीच्या, आईबापाच्या सकल्पनेतले सारे चांगले गुण एकत्र आणून त्याचा जो एक संयोग ( Synthesis ) होतो त्याला आपण पूर्णपुरुषाची कल्पना म्हटले आहे. याच संदर्भात अर्धनारीनटेश्वराची कल्पना आपल्या संस्कृतीत केली आहे.

पतीपत्नीचे सहजीवन यशस्वी झाले असे कधी म्हणायचे ? ज्या वेळी पती, पत्नीची, घर सांभाळण्याची, घरातील माणसे जोडण्याची, त्याचे संवर्धन करण्याची भूमिका नीट पार पाडू लागला व पत्नी, पतीचे रक्षण करण्याचे, वेळ पडली तर अर्थार्जन करण्याचे, भोवतालच्या निसर्गाला मित्र बनवण्याचे काम करू शकली, दोघे एकमेक सहधर्मचारी झाले, एकमेकांना पूरक बनली.

पण हे शक्य आहे का ? की केवळ कविकल्पना आहे ? मला वाटते की, 'post Indutrial civilization' मध्ये नवीन तंत्र-विज्ञानावर आधारलेल्या युगात हे शक्य आहे. आजही अनेक सुशिक्षित तरुण बालसंगोपानचे काम आनदाने करू लागले आहेत व अनेक सुशिक्षित तरुणी शास्त्रज्ञाचे, संशोधकाचे, उत्तम कार्यक्षम अधिकाऱ्याची कामे करू लागली आहेत.

पण मग आजची, पुरुष हाच एकमेव अर्थार्जन करणारा ( bread winner ) म्हणून त्याच्या सत्तेखाली चालणारी कुटुंबव्यवस्था, पितृसत्ताक पद्धती टिकेल का ? बहुधा नाही व टिकूही नये; पण मग कोणत्या पद्धतीची कुटुंबव्यवस्था येईल ? निश्चित उत्तर देणे कठीण आहे. पूर्वीही या भारतात अनेक तऱ्हेच्या कुटुंबपद्धतीचे प्रयोग झाले आहे. महाभारतातच अनेक कुटुंबपद्धतीचे प्रकार आढळतात. त्यात एकपत्नीत्व आहे, तसेच बहुपत्नित्व. एवढेच नव्हे तर एकपतित्व व बहुपतित्व ही (द्रौपदीचे पाच नवरे) आहे. लग्नापूर्वी मुलं झालेली कुंती आहे तर आजन्म ब्रह्मचारी राहिलेला भीष्मही आहे आणि गंमत अशी की, महाभारत ज्यांनी लिहिले असे मानतात त्या व्यासमहर्षींचा जन्म एका ऋषीला, एक मत्स्यगंधा पाहिल्यानंतर झालेल्या एका मोहाच्या क्षणात आहे.

बर्ट्रांड रसेलचे ट्रायल मॅरेज, कॉंट्रक्ट

मॅरेजही आम्हाला नवीन नाही. आमच्या अनेक ऋषिमुनींनी अप्सरांशी अशी लग्ने लावली आहेत. इन्टलेक्च्युअल कम्पॅनिअन किंवा प्लेटोनिक लव्ह हे तर आमच्या राधा-कृष्णाच्या प्रेमसंकल्पनेतले महत्त्वाचे धागे आहेत. आम्ही कृष्ण–रुक्मिणीच्या संकल्पनेचे जेवढे ध्यान करतो तेवढीच राधाकृष्णाची आराधना करतो. भारतात हे सारे प्रयोग झाले आहेत. नवीनही होण्याची आवश्यकता आहे; पण हे सारे प्रयोग करताना, व्यवस्था बांधताना मूळ ध्येय विसरून चालणार नाही. ते ध्येय आहे, प्रत्येक मानवाला-स्त्रीला व पुरुषाला–आनंदमय होण्याची, विश्वमानव होण्याची संधी देणे.

त्याकरता हमखास उपयोगी पडेल अशी कुटुंबव्यवस्था अजुनी सापडलेली नाही. अशी मूस (mould) घडवता आलेली नाही की, ज्यातून हमखास (with zero defect) पूर्ण पुरुष, पूर्ण स्त्री–पूर्ण व्यक्तीच बाहेर पडेल !

शेवटी हे लक्षात ठेवावे लागेल की, कुटुंबरचना किंवा कुटुंबव्यवस्था ही एक माणसाला त्याच्या माणुसकीचे संवर्धन करण्यासाठी केलेली व्यवस्था आहे. तो माणूस ज्या पातळीवर जगत असेल त्या पातळीवरून त्याच्या वरच्या पातळीवर जाण्यासाठी जी व्यवस्था मदत करील ती त्याला, त्या वेळी चांगली. जर एकपत्नी-व्रतामुळे किंवा एकपतिव्रतामुळे एखाद्या व्यक्तीची वाढ खुंटत असेल तर ते व्रत फेकावे लागेल. एखादा तत्त्वज्ञानी बर्टान्ड् रसेल साठी उलटल्यानंतरही तिसरे लग्न करील सहजीवनासाठी आणि हाच अधिकार एखाद्या स्त्रीलाही द्यावा लागेल.


पण याचा अर्थ कोणाला कसेही वागायचे स्वातंत्र्य आहे का ? स्वातंत्र्याच्या संकल्पनेत विविधता गुंफलेलीच आहे; पण स्वातंत्र्य म्हणजे कोत्या स्वार्थाची उपासना नव्हे. स्वातंत्र्यात स्वतःचे तंत्र हवे, स्वतःची शिस्त हवी, स्वतःची वरच्या पातळीवर जाण्याची धडपड हवी. या अर्थाने प्रत्येकाला स्वातंत्र्य हवेच– प्रत्येक माणसाचा तो जन्मसिद्ध हक्क आहेच; पण माझ्या स्वातंत्र्याने मी दुसऱ्याचे स्वातंत्र्य तर हिरावून घेत नाही ना, दुसऱ्याला मी माझ्या स्वार्थाचे साधन तर नाहीना बनवीत, सखा म्हणत म्हणत दास तर नाही ना करीत हा विवेक सारखा जागृत असायला हवा.

हा विवेक असेल तर सहजीवन परिणामी (effective) ठरते. पूर्णत्वाच्या दिशेने करायचा प्रवास अशा विवेकी सहजीवनाने सुरुवातीपासूनच आनंदमय होतो.

माझ्या पिल्लांनो, तुम्हालाही तुमच्या जीवनात असे जोडीदार मिळोत की ज्यामुळे तुमचा पूर्णत्वाचा प्रवास आनंदमय व्हावा हाच आशीर्वाद.

तुमचा

–आजोबा

# आपली मुलं

मुलं व्हायची आणि ती आपोआप वाढायचीच अशा समजुतीचा काळ आता मागे गेला.

पालकांचे काम दिवसेंदिवस अधिकाधिक कौशल्याची मागणी करणार असं दिसतं आहे.

माझं मूल म्हणजे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. ते सगळं मी सांगेन तसं कसं वागेल ?

मुलांना चांगल्या–वाइटाचा विवेक शिकवणं, आत्मविश्वास देणं, निर्णयक्षमता देणं हे आपलं काम आहे. आणि 'देणं' असं तरी कसं म्हणावं ? ते त्यांना घेता यावं असं वातावरण निर्माण करणं हे आपलं खरं काम आहे.

मुलांचं निरीक्षण करणं, त्यांच्याशी संवाद साधणं, आपल्या मनातलं मोकळेपणानं सांगणं, त्यांच्या मनातलं समजून घेणं, काही विसरणं, काही आठवणीनं उल्लेख करणं, बरंचसं देणं आणि ग्रेसफुली घेणं अशी किती तरी कौशल्यं आपल्याला यायला हवीत.

मुलं वाढवण्याच्या निमित्तानं आपल्याला ही जाग यायला हवी. हे पुस्तक हसत–खेळत वाचताना सहजपणे अशी जाग यावी.

**राजहंसचे नवे प्रकाशन**

**आपली मुलं**

**शोभा भागवत । किंमत २० रुपये**

# सखी, प्रिय सखी

वि. भा. देशपांडे

मुंबईच्या चौरंग या नाटयसंस्थेने 'सखी, प्रिय सखी' हे नाटक नुकतेच रंगभूमीवर पेश केले. नाटकाचे लेखक आहेत मंगेश कुलकर्णी.

राजस्थानच्या प्रदेशातील एका लोककथेचा आधार नाटकासाठी घेतलेला आहे. एक व्यापारी. तिकडच्या पद्धतीने पैसा हेच सर्वस्व मानणारा. त्याच्या मुलाचे लग्न एका रुपवान मुलीशी होते; पण या मुलाला लग्नानंतर चार दिवसातच व्यापारासाठी देशांतराला जावे लागते. त्याच्या पत्नीची शृंगाराची, प्रेमाची सारी स्वप्ने विरून जातात; पण ज्या वेळी लग्नाच्या वरातीच्या निमित्ताने हे पती-पत्नी एका झाडाच्याखाली बसलेले असतात तिथ त्यांना भूतबाधा होते. ते भूत या पतीच्या अनुपस्थित अवस्थेत रूपमतीशी येऊन संबंध ठेवते. त्यापासून तिला दिवस जातात, मूल होते. भूतरूप आणि खरा पती यांच्या चेहरा साम्यामुळे अनेक गोंधळ होतात. नाटयमय असे प्रसंग उभे राहून क्षणाक्षणाला आपली उत्सुकता वाढवतात. त्या उत्सुकतेमुळेच कथेचा अंतापर्यंतचा भाग सांगण उचित नाही; पण साधारण कथेचा आराखडा या पद्धतीचा आहे.

कोणत्याही लोककथेत वास्तवाला छेद देणारी अद्भुतता, असंभाव्यता असते. त्यामुळे ती कधी कधी दंतकथेच्या स्तरावर जाऊ शकते. त्यातल्या घटना, प्रसंगांचे खरेपण नित्याच्या वास्तवावर निरखायचे नसतात, तर त्यातला तत्त्वार्थ महत्त्वाचा असतो. त्या तत्त्वाचा, आशयाचा अन्वय आपण जसा लावू तसा त्या कथाभागातला बीजरूपाचा अर्थ आपल्या ध्यानी येतो. या नाटकाच्या कथेतील भूत त्यामुळेच वास्तवाच्या अर्थाने न पाहता लोककथेच्या संदर्भातच पाहावे लागते. माणसाच्या जीवनातले व्यवहारी वास्तव आणि त्याच्या मनातले कल्पित, वास्तव अथवा त्याचे मानसविश्व यांचे खेळ दोन स्तरांवर चालू राहतात. या खेळातून निर्माण होणारे नाटय चकवा देणारे असते, तसे ते येथे आहे. मंगेश कुलकर्णीने केलेली कथेची निवड, कथेला दिलेला नाटयाकार पुरेसा परिणामकारी आहे. त्यासाठी त्याने सूत्रधाराचा उपयोग करून कथन-निवेदनाचा वापर केलेला आहे. गावकरी गोष्ट ऐकत आहेत असा घाट पकडून त्यांना तो कथाभाग दाखवण्याचे निमित्त करून प्रेक्षकांसाठी नाटक घडवले आहे. जिथे रूढार्थाने कथा संपते तिथे नाटक न संपवता मंगेशने ते रूपमतीच्या काव्यमय स्वगताने विस्तारीत केले आहे. तसे करीत असताना त्याने कथेला व्यक्तिमनापासून जनसामान्य स्तरावरचे व्यापक रूप दिले आहे. कोणतेही लोकसाहित्य हा केवळ एका व्यक्तीच्या मनाचा-भावनांचा आविष्कार नसतोच. तो जनसमूहाचा आविष्कार असतो. म्हणून तर या साहित्याला कोणी विशिष्ट नावाचा कर्ता, लेखक नसतो, तर ती कथा साऱ्यांची असते. रूपमतीच्या वाटयाला आलेले दुःख सकृतदर्शनी एका व्यक्तीचे वाटले तरी ते अनेक अर्थांनी स्त्री-जातीच्या दुःखाचे दर्शन घडवीत असते. ती त्याच अर्थाने आपल्या मुलीला उद्देशून बोलत असते. ही व्यापक आशयघनतेची डूब लेखकाने नाटकाला दिलेली आहे. ती यथार्थपणाने पोहोचते. त्यासाठी केलेले लेखन तीन प्रकारातले आहे. काही ठिकाणी राजस्थानी शब्दांचा वापर आहे. नाटयमय काव्याच्या हिशेबात गद्य मराठी संवादभाषेचा वापर आहे, तर काही वेळा संगीतमय, काव्यमय शैलीचा वापर आहे. एक वेगळे आणि चांगल्या गुणवत्तेचे नाटक मंगेशने दिले आहे.



भक्ती बर्वे – सहज अभिनय

अशा प्रकारचे चाकोरीबाह्य नाटक व्यावसायिक रंगमंचावर आणणे हे अनेक दृष्टींनी आव्हान असते. ते आव्हान चौरंग या संस्थेने आणि पर्यायाने संस्थेचा सूत्रधार पुरुषोत्तम बेर्डे याने स्वीकारले. केवळ स्वीकारले असे नव्हे तर एक उत्तम अभिरुचीची नाटयनिर्मिती पेश केली. सूत्रधाराबरोबरीनेच त्याने दिग्दर्शनाची जबाबदारी स्वीकारली. अशी वेगळया वाटेची नाटके लिहिणे, दिग्दर्शित करणे आणि आता व्यवसायाच्या पातळीवर पेश करणे हे त्याच्या बाबतीत नवीन नाही. 'या मंडळी सादर करू या.' या संस्थेतली त्याची नाटयकामगिरी ज्यांना माहीत आहे त्यांना नव्याने सांगण्याची गरज नाही. उदाहरणादाखल 'अल्वारा डाकू' हे नाटक सांगता येईल. असेच वेगळेपण घेऊन त्याने 'टुरटूर' नाटक लोकप्रिय करून दाखवले. एकाच यशात गुंतून न राहता त्याने पुन्हा नव्या, वेगळया नाटकाची वाट पकडली. 'सखी, प्रिय सखी' साठी त्याने राजस्थानमध्ये जाऊन तिथल्या लोककलांचे प्रयोग स्वतः पाहिले. त्यांचा सविस्तर परिचय करून घेतला, छायाचित्रे काढली. इतक्या साऱ्या परिश्रमानंतर ही नाटयनिर्मिती झाली. हे करताना त्याने व्यक्ती, कुटुंब आणि समूह ह्या तिघांच्या स्तरांवर हे नाटक सतत खेळते ठेवले. या लोकांच्या हालचालीतील, बोलण्या-

तील, वागण्यातील वेगळेपणाचे अनेक तपशील भरले. एक राजस्थानी वातावरण त्यातून निर्माण झाले. प्रयोग पाहताना मात्र असे जाणवले की, गावातील समूहाचा वापर 'कोरस'च्या पद्धतीने केला आहे त्यापेक्षा आणखी अधिक प्रमाणात करून घ्यायला पाहिजे होता. तो श्रवणाचा, गद्यसंवादी प्रक्रियेच्या स्तरांवर जेवढा आहे, त्यापेक्षा अधिक सांघिक – समूहगानाच्या स्तरावर झाला असता तर प्रयोगपरिणामाचे परिमाण अधिकतेने वाढले असते !

या नाटकाच्या लेखन–दिग्दर्शकाइतकेच महत्त्व यातल्या संगीताला, नेपथ्य, वेषभूषेला आहे. कारण संपूर्ण निर्मितीतला तो प्राणभूत भाग होता, याची जाण ठेवून अनंत अमेंबल यांनी संगीत दिले. चंदर होनावरांनी प्रकाशयोजना केली. प्रदीप मुळेने नेपथ्य–वेशभूषा केली. प्रदीप मुळेनेही राजस्थानमध्ये जाऊन तिथल्या वेशभूषेचा आणि संबंधित गोष्टींचा अभ्यास केला. त्याच्या अभ्यासाचा आणि परिश्रमाचा प्रत्यय प्रयोगात पदोपदी जाणवत होता. अमेंबल, होनावर आणि मुळे या तिघांच्याही निर्माणक्षमतेमुळे प्रयोगाची गुणवत्ता भरीव झाली.

या नाटकाच्या वेगळेपणामुळे तालमीत असतानाच उत्सुकता होती. वेगवेगळ्या मोठ्या कलाकारांची नावे कानी येत होती. त्यामुळे उत्सुकता अधिकच वाढली; पण ते कलाकार जरी उपलब्ध झाले नाहीत तरी जे आज प्रयोगात आहेत तेही तितकेच चांगले वाटले. उदय म्हैसकर आणि भक्ती बर्वे यांनी प्रमुख भूमिका केल्या. उदयला आपण अलिकडे विजयाबाईंनी केलेल्या 'हयवदन' मध्ये पाहिलेले आहे. तिथे जितका चांगला अभिनय त्याने केला होता, तितकाच याही नाटकात केला. त्याला शरीरउंचीबरोबरच आवाज आणि मुद्राभिनयाची कला उत्तमपणाने अवगत आहे. त्याने शेटजीच्या मुलाच्या भूमिकेत अनेक चांगले रंग तपशिलात भरले. उदयला ज्या गोष्टी अनुकूल आहेत त्यातल्या दोन गोष्टी भक्तीच्या बाबतीत प्रतिकूल किंवा विरोधात आहेत. तिचा आवाज आणि शरीरउंची रंगमंचाला नेहमी अनुकूल असतेच असे नाही; पण ही सारी उणीव भक्तीने आपल्या मुद्राभिनयाने सार्थपणाने भरून काढलेली आहे. विविध प्रसंगांतील तिचे मुद्राभाव आणि डोळे यांचा वापर ती इतक्या ताकदीने करते की, तिच्या उंचीकडे लक्षच जात नाही. याहीपेक्षा तिच्या अभिनयात जी सहजता आणि अभिजातता आहे, ती सतत मोहवणारी आहे. त्यामुळेच ती प्रत्येक भूमिकेत वेगळे वाटते, तशी इथे वाटली. तिच्या एकूण अभिनय-वाटचालीतील रूपमतीची ही भूमिका स्मरणात राहील इतकी जमून गेलेली आहे. उदय आणि भक्ती यांच्या साथीला विजय कदम, प्रदीप पटवर्धन, रवींद्र बेर्डे, दीपक शिर्के, दुर्गा शिंदे आदी कलाकार होते. विजय कदमचा सूत्रधार छान वाटला. त्याचे नेहमीचे अभिनयविशेष याही ठिकाणी होतेच. रवींद्र बेर्डे आणि दीपक शिर्के यांच्या भूमिका ठसठशीत वाटल्या.

लोककलांच्या अभ्यासकांनी तर अवश्य आणि ज्यांना नवीनतेचा ध्यास आहे अशा प्रेक्षकांनी ही 'प्रिय सखी' एकदा पाहून घ्यावी.

□

चित्रपट

# शराबी

## नशा–फक्त अमिताभच्या लोकप्रियतेची



**मी** अमिताभ 'अॅडिक्ट' नाही; पण बरेचजण आहेत. नित्यनेमाने ते अमिताभचा येणारा प्रत्येक न प्रत्येक सिनेमा बघतात. 'शराबी'ही त्याला अपवाद नाही. अॅडव्हान्स बुकिंगलाच हा 'हाउसफुल्ल' जात असावा; पण अमिताभच्या नावाची नशा चित्रपट सुरू होईपर्यंतच टिकते. नाही तर अमिताभचं गाणं सुरू झाल्यावर पट्टीचे अमिताभप्रेक्षकही उठून बाहेर कशाला गेले असते ?

अमिताभच्या क्रमांक एकच्या स्थानाला धक्का बसत असल्याचं हल्ली बोललं जातं. त्याची अँग्री यंग मॅनची प्रतिमा लोकांना आवडते; पण शराबीत तो 'शराबी यंग मॅन' आहे. लहानपणापासूनच 'शराबी' बनलेला हा नायक दुःखी, उदार, विनोदी वगैरे सर्व सर्व आहे. ( नेहमीचा फॉर्म्युला ) जोडीला जयाप्रदा, प्राण, 'बरखुरदार'– ओमप्रकाश, रणजीत आहेतच.

कथा नाहीच; पण तरीही सांगायची झाली तर अशी–बिनमाँका बच्चा अमिताभ –विकी, पैशाचा लोभी प्राण – रायसाब त्याचे वडील. वडिलांना मुलाकडे लक्ष द्यायला वेळ नाही. आईची आठवण आली की, ते त्याला लहानपणी ब्रँडी देत. पर्यायानं विकीला ब्रँडीची सवय लागते. इथंच तो शराबी बनतो. रायसाबचा एके काळचा मित्र ओमप्रकाश–मुन्शी याचा एकनिष्ठपणानं सांभाळ करतो. (इतका सांभाळ की, त्याला दारू मिळावी म्हणून स्वतःचा जीवही धोक्यात घालतो.)

पैशाचं विकीला अप्रूप नाही. तो उदारपणे

सर्वांना पैसे देत सुटतो. हे आश्रयदाते साहजिकच पदोपदी त्याच्या उपयोगी पडतात. जयाप्रदा–मीना ही त्याची प्रेयसी,' रणजीत–अर्थातच खलनायक. विकीचं मुख्य दुःख हेच की, वडिलानी कधी आपल्याकडे लक्ष पुरवलं नाही. वेळोवेळी तो हे दुःख बोलून दाखवत असतो. शेवटी रायसाबचा हृदयपालट. शेवट गोड गोड !

सिनेमाचा मुख्य भाग म्हणजे त्याचा 'शराबीपणा'. एखादा माणूस डॉक्टर असतो, एखादा कारकून तसा हा शराबी. याच्या शराबीपणाबद्दल कुणालाच काही वावगं वाटत नाही. त्याच्या पैशाचा प्रभाव असेल; पण त्याच्या दारूच्या व्यसनाला सगळे उत्तेजनच देतात. प्रेयसीन प्रियकराला योग्य मार्गावर आणावं अशी एक आपली सर्वसाधारण अपेक्षा असते. (अर्थात दारूच व्यसन वाईट हे गृहीत धरलं किंवा मान्य असलं तरच) पण इथं तर मीनाला त्याच्या दारू पिण्याचं काहीच सोयरसुतक असलेलं दिसत नाही. विकीच्या बालपणी एकदा रायसायबाना त्याच्या व्यसनाविषयी चिंता वाटते; पण मुन्शी दोषाचं माप रायसायबाच्या पदरात टाकून त्याच्या सवयीचं समर्थन करतो.

त्यामुळे नायकाला 'शराबी' दाखवण्याच विशेष प्रयोजन काय ते कुठेच कळत नाही. कारण दारूमुळे त्याच्या, जीवनावर काही बरे–वाईट परिणाम झाले का याचं प्रामुख्यान चित्रण असतं तर 'शराबी' नाव सार्थ झालं असत; पण केवळ अमिताभची एक वेगळी प्रतिमा उभी करायच्या अट्टाहासातनं कथालेखक–दिग्दर्शक प्रकाश मेहरांनी अमिताभला दारुडा बनवला आहे.

दुसरी बाब त्याच्या उदारपणाची. दारू चढल्यावरच माणूस उदार बनतो असं काही नाही. बऱ्याचजणाना बापाच्या श्रीमंतीची, तो करत असलेल्या पिळवणुकीची लाज वाटते आणि आपल्यापरीने ते निस्तरायचा प्रयत्न त्याच्याकडून केला जातो. तसंच बापाची पैशाची हाव बघून विकीच्या मनातही पैशाबद्दल घृणा निर्माण होण शक्य आहे. म्हणजे तिथही विकीच्या दारू पिण्याचा विकीच्या या वागण्याशी काहीच संबंध नाही. इथं 'सिटी लाइटस्'-सारखीही केस नाही. तिथ त्याची दारू कधी तरी उतरते, इथं हा प्रश्नच उदभवत नाही. 'तुम रोटीके बगैर जी सकोगे मगर शराबके बगैर नही' हे मुन्शीचच वक्तव्य. त्यामुळे दारू न चढलेला विकी बघायलाच मिळत नाही. शेवटी शेवटी (म्हणजे २२ रिळांच्या शेवटी) तर हा साधा बोलतोय की पिऊन हेच कळेनासं होत.

तिसरं म्हणजे त्याच्या आयुष्यातल प्रेम. मीना एक नर्तिका. नायिका नर्तिका असली की बर असतं– भरपूर गाणी तिच्या निमित्तानं घालता येतात. अर्थात आपल्याला निमित्तच लागतं असं काही नाही. आपलं संगीताचं प्रेम वारवार उफाळून येत असत. असो तर ही मीना सुरुवातीला नटवरशाह–रणजितकडे कामाला असते; पण शेवटी प्रेमाखातर रणतजिला सोडून ती टीव्हीवर नोकरीला लागते. आपण इतका आधुनिक नाच (पॉपपरेड वगैरे असे आयात कार्यक्रम सोडून) अजून तरी दूरदर्शनवर पाहिलेला नाही. अखेर हिंदी सिनेमाच.

तर असे हे विकीच्या आयुष्याचे तीन पदर. आलटून–पालटून हे पदर आपल्यासमोर येत असतात. अधूनमधून मारामारीचा मसाला अर्थात आहेच. एक मारामारी– दारूच्या गुत्त्यातली चार गुंडाशी जरा वेगळी आणि विनोदी वाटते. यापलीकडे मारामारीत सुद्धा हेलिकॉप्टरमधली, बोटीतली आणखी कुठली असं आकर्षण शराबीत नाही.

सिनेमाची एक आवर्जून सागावी अशी जमेची बाजू म्हणजे कादरखानचे खटकेबाज संवाद. त्यात परत अमिताभ कायम दारूच्या नशेत असल्यान त्याच्या तोंडी असे सवाद अधिकच खुलून दिसतात. ओमप्रकाशच्या तोंडी नेहमीचे 'बरखुरदार' छाप सवाद आहेतच; पण त्याचा आता कंटाळा आला.

अभिनयाच्या बाबतीत बोलायचं तर अमिताभ वाईट अभिनय कधीच करत नाही. 'शराबी' चा अभिनय त्यानं चांगला केला आहे; पण नाविन्य अर्थातच काही नाही. जयाप्रदाला काही वावच नाही. खरं तर ही नृत्यकुशल अभिनेत्री; पण इथली नृत्यच इतकी सुमार आहेत की तिला नृत्यकौशल्य दाखवायचीही संधी मिळालेली नाही. ती दिसते मात्र चांगली.

प्राणनं वडिलांची भूमिकाही ठीक केली आहे. इतर भूमिकातून दीपक पराशर, सुरेश ओबेरॉय, ए. के. हगल, सत्येन कप्पू अशी अनेक मंडळी चमकली आहेत; पण नाव घ्याव अस कुणीच नाही.

छायाचित्रणाला वाव नाही. कारण विकीच घर, मीनाच घर, रायसायबाच ऑफिस यापलीकडे फारशा ठिकाणाची दृश्यं दिसत नाहीत. अद्ययावत कॅमेरा योग्य तऱ्हेनं वापरला तर जसं चित्रण होईल तितपतच इथं दिसतं. खास कलात्मकता जाणवत नाही.

गाणी भरपूर आहेत; पण लक्षात राहण्याजोगं गाणं एकही नाही !

निष्कर्ष काय तर अमिताभ–प्रकाश मेहरा जोडीचा प्रेक्षकाना अमिताभच्या नावामुळे खेचू शकणारा आणखी एक नवीन चित्रपट.

चित्रपटाच्या सुरुवातीलाच एक फार मोठा धक्का बसतो तो रिळांची संख्या पाहून. २२ रिळाचा लाबलचक सिनेमा पहायला मिळणार म्हणून अमिताभची नशा चढलेल्या प्रेक्षकाना हा सुखदच धक्का असावा.

–उज्ज्वला लेले


विनोदी साहित्य निर्माण करणाऱ्या लेखकाची बुद्धिमत्ता असामान्य असावी लागते व वृत्ती चौकस. कल्पकतेचं नैसर्गिक वरदान त्याला असावं लागतं. श्यामच्या या कथा वाचताना या साऱ्या गुणांचा प्रत्यय आपल्याला येत रहातो. –अभिप्राय 'महाराष्ट्र टाइम्स

**काही दिवस श्यामचे, काही राधाचे**

लेखक : फिरोझ रानडे

मूल्य : २५ रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# जस्टिस मार्च

## बाबा आमटे

आंतरभारतीद्वारा आयोजित श्रमसंस्कार छावणीस सोमनाथच्या निसर्गरम्य परिसरात तीनशे युवा-युवतींनी तळपत्या सूर्याला साक्षी ठेवून आपल्यातील विधायकतेचे यथार्थ दर्शन घडविले. १० मे ते १८ मे १९८४ ह्या काळात युवाशक्तीचा स्नेहमेळा श्रमकार्य, बौद्धिके–चर्चा, मनोरंजन, जंगलभ्रमण इ. कार्यात स्वत:ला विसरून गेला होता. भुवराईने एक नवे स्वप्न आपल्या खांद्यावर घेऊन ते फुलविण्याचा निर्धार व्यक्त केल्याचे प्रत्ययाला येत होते. एरव्ही फारसे क्रियाशील नसणारे हे युवकाचे हात नवनिर्मितीसाठी भिडलेले पाहून या देशाचे भवितव्य कोणी हिरावून घेऊ शकणार नाही ह्या विचाराने मन प्रसन्न झाले. बाबा आमटे आणि साधनाताई शिबिराचे खास आकर्षण ! बाबाच्या सान्निध्यात युवामनाला साहसाचे स्वप्न नाही पडले तर नवलच ! आंतरभारतीचे सचीव श्री. यदुनाथ थत्ते, श्री. चंद्रकांतभाई शहा यांची उपस्थिती प्रेरणादायी वाटते.

सोमनाथच्या परिसरात श्रमिक कार्यकर्ता विद्यापीठाचे कुलगुरु श्री. शंकरदादा व त्याच्या अन्य सहकाऱ्यांना प्रतिवर्षी होणारा ह्या युवा–स्नेहमीलनसोहळा एक पर्वणीच वाटते. ध्येयधुंदवृत्तीनं सोमनाथच्या मातीशी इमान बांधू लागल्यानंतर इथल्या कार्यकर्त्यांना सार्थ जीवन जगण्याची प्रचीती वाटते. सोमनाथच्या निबिड जंगलात १९६७ पासून आतापर्यंत युवासामर्थ्याने साहसाशी स्पर्धा करून निर्मितीची बेटं निर्माण केली आहेत. आजपर्यंत सुमारे पंधरा हजार युवा–युवतींनी या श्रमतीर्थाशी आपलं अतूट नातं जोडलं आहे.

उठि–उठि गोपाळाच्या मधुर गीताबरोबर छावणी जागी होत असे. सकाळी ठीक ५–३० वा. शिबिरार्थी श्रमगीताच्या तालासुरात कामावर भिडत असत. सोमनाथच्या पावनभूमीला नवा संदर्भ देण्यासाठी बांधबंदिस्तीचे काम युवकांनी आव्हान म्हणून स्वीकारलेले असते. घामाने डबडबलेले युवकांचे चेहरे एका अर्थाने येणाऱ्या क्रांतीची चाहूल देऊन जातात. श्रमकार्यानंतर बौद्धिके, चर्चा इ. मध्ये सर्वांचा सक्रिय सहभाग जाणवतो. आपल्यातील नादान, लाचार, बेजबाबदार वृत्ती झुगारून देण्याची बेचैनी सर्वांमध्येच प्रकर्षाने जाणवते. शिबिरातील प्रत्येक दिवस एक नवं स्वप्न युवकांच्या अंत:करणात जागवून जातो.

युवकांशी संवाद साधताना डॉ. बाबा आमटे म्हणाले की, 'आजच्या जगात निर्माण झालेल्या अनिश्चित, युद्धखोर, संघर्षमय परिस्थितीचा निषेध करण्यासाठी व पुन्हा मानवी जीवनात हिरोशिमा–नागासाकीचा विस्फोट टाळण्यासाठी तरुणानी ९ ऑगस्ट १९८५ रोजी विराट 'जस्टिस मार्च' (Justice March) काढून प्रचलित व्यवस्थेला भान आणण्यास भाग पाडले पाहिजे हा 'जस्टिस मार्च' पक्षविरहित, धर्मविरहित असावा असा मनोदय बाबा व्यक्त करतात. 'जस्टिस मार्च'द्वारे शांततेचे, मानवी सौहार्दाचे महत्त्व जगाला पटवून दिले पाहिजे. 'जस्टिस मार्च'च्या माध्यमातून युवकानी मानवी जीवनाला उध्वस्त करणाऱ्या समस्यांचा अभ्यास करावा, नवे पर्याय शोधून काढावेत, मूल्यांची प्रतिष्ठापना करण्यावर लक्ष केंद्रित करावे. या मोहिमेद्वारे समग्र राष्ट्राचे जागरण व्हावे. पंजाब, आसाम, नागालँड यासारख्या प्रश्नातून राष्ट्राचे राष्ट्रीयत्व कसे कलंकित होत चालले आहे ह्याची जाणीव करून द्यावी. ह्या आंदोलनाच्या माध्यमातून 'कोयलिशन ऑफ नॅशनल कॉन्शियसनेस' होण्याच्या आवश्यकतेवर भर देण्यात आला. राष्ट्रीय सदसद्विवेकबुद्धी जागृत करणारे विशाल आंदोलन म्हणून 'जस्टिस मार्च'चे आव्हान तरुणांनी स्वीकारावे असे आवाहन केले.

बाबा आमटे पुढे म्हणाले की, फीवाद, जातीयदंगल, प्रांतीयदंगल यासारख्या सामान्य व राष्ट्रहानी करणाऱ्या. संकुचित चळवळीत युवकांनी शक्तिव्यय न करता सहभाग, विकास आणि शांतता या कार्यात योगदान देण्याचे व्रत स्वीकारले पाहिजे. 'जस्टिस मार्च' सारखे व्यापक आंदोलन गतिशील करण्यासाठी युवकांनी जीवनावरील मनस्विनी निष्ठा जोपासण्याचे तंत्र अवगत केले पाहिजे. 'जस्टिस मार्च' ची परिणामकारकता निर्माण करण्यासाठी सर्व रचनात्मक चळवळींचा, स्वयंसेवी कार्यकर्त्यांचा व त्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या योग्य माध्यमांचा उपयोग करता येईल. युवा आंदोलनाचे प्रतीक म्हणून वृक्षासारखा वादातीत विषय स्वीकारता येईल. सर्व विचारांच्या, पक्षांच्या युवकानी समान कार्यक्रमासाठी या व्यासपीठावर संघटित व्हावे, असा आशावाद बाबा आमटे यानी व्यक्त केला. 'ट्री इज ए सिम्बॉल ऑफ कम्पॅशन' या धारणेतून हा समन्वय घडवून यावा.

राष्ट्रीय जाणिवेचा पक्षी सद्य:परिस्थितीत कोंडलेला असून तो गुदमरून मरण्याची शक्यता वाटते. म्हणूनच ध्येयाच्या आचेने जीवन उबवण्याची ताकद असणाऱ्या तरुणांनी पुढे आले पाहिजे. भगवान कृष्णाने ज्याप्रमाणे कंसासारख्या दुष्ट प्रवृत्तीचा छेद घेतला त्याप्रमाणे जातीयतेचे, अंधश्रद्धेचे, अहंकाराचे कंस गाडून टाकण्याचे कार्य युवापिढीने आपल्या खांद्यावर टाकावे, अशी तळमळ बाबा आमटे यानी व्यक्त केली. सोमनाथ–आनंदवनाची भूमी ही संकल्पपात्राची भूमी आहे, म्हणूनच श्रमसंस्कारछावणी सोडण्यापूर्वी प्रत्येकाने इथं संकल्प सोडायचा आहे.

येशू ख्रिस्ताच्या समर्पित जीवनाचा आधार घेऊन बाबा आमटे म्हणाले की, येशू ख्रिस्ताने आपल्या जीवनसाधनेतून 'सिम्बॉल ऑफ क्रुवेल्टीचे रूपांतर सिम्बॉल ऑफ कमपॅशन' मध्ये केलेले दिसून येते. 'लॉयल्टी टू लाइफ इज मच मोअर डिफिकल्ट दॅन दि लॉयल्टी ऑफ दि नेशन' हे सूत्र सांगून त्यांनी हे स्पष्ट केले की, जीवन झोकून दिल्याशिवाय त्यास नवे धुमारे फुटत नाहीत. तरुणांच्या मनाला फुटणाऱ्या नव्या अंकुरानी जर मातीशी संपर्क ठेवला नाही, तर ह्या नव्या अंकुरांना भवितव्य राहणार नाही. मधमाशाच्या पोळ्यातील क्वीन बीप्रमाणे एखादे कार्यक्षेत्र निवडून ते बुलंद करण्याची धारणा बाळगली पाहिजे!

देशाचे आणि जगाचे भवितव्य दारिद्र्याच्या आणि युद्धाच्या खोल दरीत लोटण्याचे भेसूर, अमानवी कृत्य आम्ही सहज करणार नाही, हे ठणकावून बजावण्याचे ऐतिहासिक कार्य 'जस्टिस मार्च' द्वारे पूर्ण-

त्वाला जावे. भरती-ओहोटीप्रमाणे जीवनात सुखदु:खे असतात. त्यामुळे फारसे विचलित होऊ नये. स्वप्नाचं बोट धरून दऱ्या-खोऱ्यांत उतरून ते स्वप्न आपल्यासोबत घेऊन जाण्याची जिद्द तरुणांनी बाळगली पाहिजे. सोमनाथला उमटलेल्या तुमच्या पावलांच्या प्रत्येक ठशातून निर्मितीचे, समृद्धीचे, परिवर्तनाचे नवे पाझर फुटतील, या उमेदीनेच प्रतिवर्षी या भूमीत तुमच्या सळसळणाऱ्या प्रवृत्तीचे स्वागत करण्यास आम्ही उत्सुक असतो, असे भावपूर्ण उद्गार बाबानी काढले. पुढील वर्षी आंतरराष्ट्रीय युवकवर्षाचा संदर्भ लक्षात घेऊन राष्ट्रव्यापी श्रमसंस्कार-छावणीचा संकल्प जाहीर झाला व त्याच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून ऑक्टोबरमध्ये निवडक कार्यकर्त्यांचे शिबिर आनंदवनात घेण्याचे निश्चित झाले.

मा. यदुनाथ थत्ते यांनी आन्तरराष्ट्रीय युवावर्षानिमित्त युवकाना इशारा देऊन त्यांनी १९८५ हे वर्ष विविध साहसी, कल्पक उपक्रमांनी साजरे करावे, असे आवाहन केले. शिबिरकाळात प्राचार्य राम शेवाळकर, प्रा. डॉ. भास्कर भोळे, प्रा. खदिवले, श्री. डॉ. अमोल देसाई, प्रा. सुरेश द्वादशीवार यांची व्याख्याने खूपच परिणामकारक झाली,

श्री. शाम मानव व श्री. अरुण देशपांडे यांच्या शिबिरातील उपस्थितीनं हुंडाबंदी, स्त्री-मुक्ती, अंधश्रद्धानिर्मूलन, लोकविज्ञान चळवळीसारख्या उपक्रमाबद्दल एक चैतन्यमय वातावरण निर्माण केल. त्यातूनच शिबिरार्थींनी व्यक्तिगत व सामूहिक पातळीवर काही संकल्प पूर्णत्वाला नेण्याची लेखी प्रतिज्ञा दिली. त्यात वरील विषयाबरोबर साक्षरता-कार्य, ग्रामोद्योग–वस्तूंचा वापर, भ्रष्टाचार-निर्मूलन, वृक्षारोपण, इत्यादींचा समावेश होता.

प्रखर उन्हाळ्यामध्ये तीनशे शिबिरार्थींचे शिबिरसंचलन एक आव्हानच ! परंतु श्री. चंद्रकांतभाई शहा, प्रा. विनायक तराळे, कु. कल्पना भांबूरकर, श्री. शाम मानव, श्री. अरुण देशपांडे, डॉ. रवींद्र भारती यांच्या प्रयत्नातून व्यवस्थापनाची लय सांभाळली गेली. पुढील वर्षी होणाऱ्या श्रमसंस्कार-छावणीचे स्वप्न उराशी बाळगून तरुणाईनं सोमनाथ - प्रकल्पाचा निरोप घेतला. प्रत्येकाच्या मनात एक नवा आत्मविश्वास जागृत झाल्याची प्रकर्षाने जाणीव होत होती. श्री. यदुनाथ थत्ते यांनी सादर केलेल्या

'सत्यसुंदर मंगलाची नित्य हो आराधना,
देहमंदिर, चित्तमंदिर, एक तेथे प्रार्थना–'

या गीताचे सूर प्रत्येकाच्या अंत:करणाचा ठाव घेत होते.

–प्रा. सोमनाथ रोडे

# अनवट

## दांडेकर मराठवाडा

वि. म. दांडेकर हे एक अचाट गृहस्थ आहेत. लोकांच्या अपेक्षापेक्षा वेगळे काही करणे, प्रचलित मतांपेक्षा वेगळी मते व्यक्त करणे हे त्यांचे वैशिष्ट्य. बऱ्याच वर्षांपूर्वी एके ठिकाणी 'प्राध्यापकांना चाबकाने फोडायला पाहिजे' असे विधान त्यांनी केले होते. त्यावर वर्तमानपत्रांतून बरीच वादावादी झाली. नंतर शेतकरी आंदोलन ! सांगायला गेले एक, टोमणे बसले वेगळेच असे त्यांचे झाले. आता यावर्षी त्यांना मराठवाड्यातल्या जनतेचा व नेत्यांचा राग ओढवून घ्यावा लागत आहे.

विभागीय असमतोलाच्या अभ्यासासाठी राज्यसरकारने दांडेकर समिती नेमली. दांडेकरांनी प्रामाणिकपणे कष्ट व अभ्यास करून अहवाल तयार केला. तो प्रसिद्ध झाला नसला तरी 'म. टा.' (पत्र नव्हे मित्र !) मध्ये त्याविषयी काही झिरपलेच !

समितीने मागासभागांच्या विकासप्रक्रियेत ३२०० कोटी रुपयांचा बॅकलॉग अनुशेष राहिल्याचे सांगितले. हा बॅकलॉग भरून काढल्याशिवाय इतर विकास-कामे चालू करू नयेत अशी त्यांची सूचना. त्याहूनही, दांडेकरांच्या म्हणण्याप्रमाणे जिल्हा, तालुका असे घटक विकासाच्याबाबत गृहीत धरले आहेत. संपूर्ण महाराष्ट्रच मागासलेला आहे असे त्यांचे म्हणणे.

अशा तऱ्हेच्या शिफारशीना परवा मराठवाडा जनता विकास परिषदेतर्फे विरोध व्यक्त करण्यात आला. परिषदेचे अध्यक्ष गोविंदभाई श्रॉफ यांनी याबाबत सविस्तर व सकारण निवेदनच केले आहे. ('मराठवाडा' २४ मे ) या समितीने आपली कार्यकक्षा ओलांडली असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

उत्पादकशक्तीच्या विकासाबाबत सरकार काही करू शकत नाही हा डॉ. दांडेकरांचा दावा श्रॉफ यानी फेटाळून लावला. वस्तुत: उत्पादनशक्ती व विकास यांच्याबाबतची दांडेकरांची मते प्रातिनिधिक आहेत. 'मार्केट इकॉनॉमी' लक्षात घेऊन नियोजन व्हायला पाहिजे अशी साधारणत: त्यांची धारणा आहे.

परिषदेचे म्हणणे आहे की, मुळात ही समिती स्थापतानाच विभागीय असमतोल आहे हे गृहीतच धरले आहे.

आपल्या विभागातल्या मागास तालुक्यांची जबाबदारी प. महाराष्ट्रावर आहे. विभाग घटक म्हणून न धरल्याने बाराशे कोटी रुपयाचा प. महाराष्ट्राच्या बॅकलॉगचा भार मागास भागावर पडतो. म्हणजेच समितीने प्रगत प. महाराष्ट्रीय हितसंबंधांची जपणूक केली– असा आरोप श्रॉफ यांनी केला.

आता याबाबत जुलैमध्ये विभागीय परिषद भरविण्याचे ठरत आहे. १९७२–७४ या काळात मराठवाडा विकास आंदोलन झाले, गल्या वर्षी बजटच्या काळात रेल्वे-आंदोलन झाल. मराठवाडा सारखा मागे आहे आणि याच वेळी निश्चित कृतीची गरज असतानाच बौद्धिक वाद निर्माण होतात.

## जंग की तैयारिया !

निवडणुकांसाठी सत्ताधारी पक्षाने १ व २ जून रोजी २५०० पक्ष कार्यकर्त्यांची दिल्लीत बैठक बोलविली आहे. 'एशियाड खेल ग्राम' मध्ये हा मेळावा होणार आहे. कॉंग्रेस (आय) चा हुकुमी एक्का श्रीमती गांधीच असल्या तरी या वेळी 'ग्रासरूट' कार्यकर्त्यांचा जास्तीत जास्त वापर केला जाईल. तसेच आंध्र व कर्नाटकवर अधिक लक्ष केंद्रित केले जाईल. राष्ट्रीय संजय मंचच्या धोक्यासंबंधीही चर्चा होईल.

आगामी मेळाव्यात प्रत्येक प्रांतातील

कार्यकर्त्यांने स्पष्टपणे बोलावे अशी अपेक्षा आहे म्हणे. महिला काँग्रेस. एन. एस. यू. आय. सेवादल इत्यादी धूळ खात गंजत बसलेल्या संघटनानाही उजाळा देण्यात येईल!

## दहा टक्केवाले !

भिंद्ररांवाले !

परवा त्यानी एका मुलाखतीत स्पष्ट सांगितले, पंजाबप्रश्नी आपण केन्द्रसरकारशी बोलणी करणार नाही. कारण एखाद्या पुरुषाने स्त्रीकडे स्वत: जाणे योग्य नाही !

सरकारने अकालीदलाशी बोलणी सुरू केली त्याचा न् माझा काही संबंध नसल्याचे सांगून त्यांनी एक मस्त गणित माडले.

'भारताच्या स्वातंत्र्यासाठी ९० टक्के बलिदान शिखांचे होते. ज्यांनी फक्त १० टक्के बलिदान केले त्यानी हुकुमत गाजविणे अन्याय्य आहे.' झालं, आता मतदानाऐवजी बलिदानावर लोकशाही चालायची !

तिकडे ते टिळक, बंगाल–महाराष्ट्रातले फासावर गेलेले लोक, वांछू अय्यर, गांधी, नेहरू आणि कंपनी बघा कशी तोंड लपवतायत (बिचारे दहा टक्केवाले !)

एका प्रश्नाला उत्तर देताना 'संत' म्हणाले, मुस्लिम व शीख एकत्र झाले तर हिंदूंना कुठल्या कुठे उडवून टाकू !

ही मुलाखत 'फार–ईस्टर्न इकॉनॉमिक रिव्ह्यू'च्या सलामत अली यांनी घेतली होती.

## एस्कॉर्टस् ! जबरदस्त जंग !

नवी दिल्लीच्या आशियाई क्रीडाग्रामाच्या सिरसीफोर्ट सभागृहात ९ जूनला साडेदहा वाजता एक सभा होणार आहे. एस्कॉर्टस् कंपनीच्या या सर्वसाधारण सभेत कंपनीचे अध्यक्ष हरप्रशाद नंदा याच्यादेखत त्यांच्या बाजूच्या नऊ संचालकांची उचलबांगडी होणार. (पर्यायाने त्यांचीही !) आयुर्विमा महामंडळाने या संचालकांच्या जागी सार्वजनिक वित्तीय संस्थांचे नऊ संचालक नेमण्याचा विडा उचलला आहे. तो डाव यशस्वीही होणार आहे.

एस्कॉर्टस्‌समोर आता प्रश्न एवढाच आहे की, या सभेत एल आय् सी. च्या विरुद्ध आपल्या बाजूचे (स्वतंत्र) सभासद एकमुखाने उभे करावे व निदान नैतिक विजय तरी मिळवावा !

एस्कॉर्टस्‌मध्ये एल. आय्. सी. व इतर वित्तीय संस्थांचे ५२ टक्के भागभांडवल आहे. (एकूण ४० लाख १३ हजार ११३ इक्विटी शेअर्स) स्वत. एल. आय्. सी. ने ९० लाख रुपयांची गुतवणूक केली आहे.

एस्कॉर्टस्‌च्या मागचे शुक्लकाष्ठ गेल्या वर्षापासूनच लागले होते. 'एस्कॉर्टस्'च्या शेअर्सची घाऊक खरेदी करून कंपनी ताब्यात घेण्याचा ब्रिटनमधील भारतीय उद्योगपती स्वराज पॉल याचा डाव लक्षात येताच इथल्या उद्योगविश्वात खळबळ माजली. स्वराज पॉल यांच्या कॅपरो कंपनीचे शेअर्स नोंदवून घ्यायचे नाही असे नंदानी ठरविले.

आपण स्वराज पॉलच्या बाजूचे नाही असे सरकार म्हणत असले तरी एल. आय्. सी. मार्फत एस्कॉर्टस्‌च्या संचालक मंडळावर वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी आणणे ही योजना काय दर्शवते ? त्यातही सर्वोच्च न्यायालयाचा एक वेगळाच आदेश आला ! ही सर्वसाधारण सभा भरविण्याला नंदांनी आव्हान दिले होते. न्यायालयाने सभा भरविण्यास अनुमती दिली. मात्र त्यातील निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी अट घातली –न्यायालयाचा आदेश येईपर्यंत अंमल होऊ नये ! (कुठे आहेत अंतुले ? बघा, न्यायालये आपल्या हातात सत्ता कशी एकवटत आहेत !) –नुकतेच एस्कॉर्टस कंपनीच्या सर्व कार्यालयावर अबकारी खात्याने धाडी टाकल्या. आम्ही करातली पै न् पै चुकती केली म्हणणाऱ्या कंपनीच्या नोंदवह्या ताब्यात घेतल्या गेल्या. शिवाय स्वराज पॉल प्रणित शेअर्स खरेदीसंबंधीची महत्त्वाची कागदपत्रे ताब्यात घेतली असेही वृत्त आहे!

नऊ तारखेच्या बैठकीत भागधारकांच्या प्रतिनिधींना वचक बसावा म्हणून ही कृती आहे, का स्वराज पॉलसबधी नंदाना पुढे काही करता येऊ नये म्हणून ही धाड आहे ?

एल. आय् सी. व एस्कॉर्टस्‌चा संघर्ष म्हणजे खाजगी व्यवस्थापनावर सरकारी अंमलाचे आक्रमण असा आक्रोश केला जात आहे.

दोन्ही बाजू आपापल्या फळ्या मजबूत करीत आहेत. एल्. आय्. सी. ला काळजी नाही ! –पण

– आता नंदांनी नवाच बूट काढलाय् ! कंपनीच्या विस्तारासाठी ३५ लाख रुपयाचे नवे भाग व कर्जरोखे जारी करण्याची गरज असल्याचा मुद्दा उपस्थित केला जाणार आहे ! हे भागधारक खाजगी असतील. जर हे ३५ लाखांचे भाग मंजूर झाले तर एल्. आय्. सी. सकट वित्तीय संस्थांचे शेअर्सची टक्केवारी ५२ वरून ३० वर येईल.

अर्थात या शहाला प्रतिशह देण्याचा वित्तीय संस्थाचा निर्धार आहेच.

आता नंदांनी शेअरहोल्डर्संना पाठविलेल्या पत्रात सरकारच्या 'दुष्ट हेतूची' जाणीव दिली आहे. त्याचबरोबर एल्. आय्. सी ने उच्च न्यायालयात सादर केलेल्या रिट अर्जात ही असाधारण बैठक का बोलाविली, नऊ संचालकाना का काढून टाकायचे याची कोणतीही कारणे दिली नाहीत हे निदर्शनाला आणून दिले.

जाता जाता एस्कॉर्टस्‌च्या या जाऊ पाहणाऱ्या नऊ (अर्ध वेळ) संचालकांच्या यादीत फील्ड मार्शल माणेकशा, के. बी. लाल, श्रीमती एस. भूतलिंगम्, रंगनाथन, जे. एम. श्रीनागेश, एस. एन. बिलग्रामी (सर्व निवृत्त प्रशासकीय अधिकारी) यांच्या बरोबर डी सी. एम. चे अध्यक्ष भरत राम, रेल्वेबोर्डाचे माजी सदस्य पी. सहाय याचा समावेश आहे.

बँक राष्ट्रीयीकरण एक तडकाफडकी पाऊल होते. एस्कॉर्टस् प्रकरण हे अनेकरंगी आहे आणि त्यात बुद्धिबळातल्याप्रमाणे डावप्रतिडाव, शह–प्रतिशहाची रंगत आहे ! आपण आपले पाहत रहावे !

## प्रेमकलहाचे बळी (तिसरेच !)

२६ मे शनिवार. उत्तरप्रदेशातील इटावा जिल्ह्यात आस्ता गाव. ठाकुरांच्या टोळीने मल्हाह जातीच्या २१ जणांना गोळ्या घातल्या. १९८१ मध्ये बेहमाई (कानपूर) गावात फूलनदेवी व विक्रम मल्लाहच्या

टोळीने अठरा राजपुतांना 'मौत के घाट' उतरवून दिल्याचा हा सूड !

यातही आता फूलनदेवीचा दुसरा अवतार आहे; पण सुधारित आवृत्ती ! लाला रामसिंग व श्रीरामसिंग या दोन राजपूत जुळ्या भावांची ही लीडर ! कुसुमा नैन. वय वर्षे तेवीस !

वस्तुत: फूलन, कुसुमा, विक्रम मल्लाह, सिंगबंधू हे एकाच गँगमधले. कुसुमा ही फूलन 'पेक्षा' देखणी ! (ती फूलन म्हणे सुदर... बाप रे !) फूलननेच कुसुमाला तसे सर्टिफिकेट दिले. गँगलीडर विक्रम मल्लाह यानी फूलनला आपल्यासाठी खास राखून ठेवले होतेच. मधूनमधून लालाराम व श्रीराम यांच्या सेवेचे ठायी असलेल्या कुसुमावरही कृपादृष्टी व्हायची !

याचा परिणाम नेहमीप्रमाणेच ! सिंगबधू १९८० च्या ऑगस्टमध्ये टोळीतून फुटून निघाले. विक्रमला त्यानी ठार केलं. कुसुमाने विक्रमला क्लोरोफॉर्म दिला व हत्येत मदत केली असा फूलनचा दावा ! त्यानतर फूलनवर बेहमाईला पळवून नेऊन ११ दिवस अत्याचार... ! मग इसका बदला !

सिंगबंधू राजपूत. आपल्या प्रियकराला मारणाऱ्याच्या सूडासाठी फूलनने बेहमाईला अठरा राजपुताना मारले. फूलनला अटक झाली. आता या तिघां प्रेमाळूनी संधी साधली. आरताच्या १५ मल्लाहांना मारले ! तत्पूर्वी त्यांनी एका वर्षापूर्वी जलौन जिल्ह्यातील फूलनच्या गावावर धाड घालून लूटमार केली होती.

गंमत म्हणजे कुसुमा नैना अगतिकतेने वगैरे दरोडेखोर झाली नाही. अगदी ख्यालीखुशालीनं, ठरवून ती 'डाकीन' झाली. लहानपणापासनंच ती हाताबाहेर गेलेली उनाडपोर म्हणून माहीत होती. वयात आल्यावर माधोसिंह नामे इसमाबरोबर पळाली. 'त्वया सह वनमपि स्वर्गम्' या न्यायाने तुरुंगात गेली. सुटल्यावर विक्रम–फूलन टोळीत आली. तिथेच लालाराम व कपनी भेटली.

हे सर्व प्रकार ठीक... पण त्या अठरा+पंधरा+आणखी किती तरी–त्यांचे काय ? यांचा होतो प्रेमाचा खेळ... ! पण

## मुञ्चतो नास्ति मे व्यथा

बस्, बस्, बस् ! म्हणजे आता आमच्या सरकारची न्यायप्रियता, सत्यनिष्ठा, कर्तव्यपरायणता. यापुढे प्रतिवादच करायचा नाही. नुकत्याच एका प्रकरणावरून तर आमची खात्रीच पटली आहे.

तिकडे भाडवलशाही राज्यात त्या कोण्या साखारॉव या शास्त्रज्ञाला सोडण्यासंबंधी काय अनाठायी गहजब मांडलाय ! आंद्रे साखारॉव हा सोविएत रशियातला एक शास्त्रज्ञ. सरकारभक्ती हीच देशभक्ती हे न उमगता तो स्वातंत्र्याच्या बाता करीत होता. राष्ट्रीय–सुरक्षा, पब्लिक ऑर्डर, डिसेन्सी इ. इ. (आठवा: भा. द. वि. कलम १२४ अ ५०३, घटना कलम १९ (२) ) यासारख्या कारणासाठी त्याला स्थानबद्ध केले.

आता साखारॉव यांची स्ट्रॅटेजी पहा. त्यानी रशियन सरकारवर दडपण आणण्यासाठी उपोषण सुरू केले. आता प्रकृती खालावणारच ! हा सगळा देशातर्गत मामला आहे.

पण पाश्चात्य देशात रिकामटेकडी मडळी भरपूर. (कारण, 'सरप्लस प्रॉडक्शन' जास्त ना ! मग 'लीझर टाइम' अधिक, त्यामुळे... इ. इ.) पर्शिग–२, क्रूझ मिसाइल्स, प्रकरणी मोर्चे काढून झाले. आता साखारॉव प्रकरण मिळाले. वर्तमानपत्रेही बहकली ! झाले. आज काय फ्रेंच अध्यक्ष फ्रान्स्वा मितराँ यांच्यावर रशिया-भेट रद्द करण्याचे दडपण, उद्या काय अलिप्त राष्ट्राकडून (बघा. स्ट्रॅटेजी म्हणतात ती ही ! ) रशियाला साखारॉव प्रकरणी समजूतदार भूमिका घेण्याची अपेक्षा.

पण भारत सरकार म्हणतंय्...'नथिंग डूइंग' हा रशियाचा अतर्गत मामला आहे. बरं अलिप्त राष्ट्रांच्या गटातर्फे काही करावं का ? भारत सरकारचे तेच उत्तर. (जणू इतर अलिप्त राष्ट्रांनी काय करावं हे भारतानं ठरवावं ! )

दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान यासंबंधी आम्ही बोलणार; पण साखारॉव (अफगणिस्तान, कांपुचिया ) यावर मात्र अंतर्गत मामला म्हणून अलिप्त राहणार. तुम्हाला ते कळायचं नाही.

आपली जगातली पत कितीही ढळो ! आपलं 'आराधनाय...' तत्त्व कायम ! त्यासाठी प्रतिष्ठा, मूल्ये याबाबत 'मुञ्चतो नास्ति मे व्यथा !'

शेवटी 'यदि का जानकीमपि' म्हणणाऱ्या थोर प्रभु रामचद्रांचे आपण वंशजच !

## वैर भाव तोडने

शांती के सिपाही चले
क्राति के सिपाही चले
लेके खैरख्वाही चले
रोकने तबाही चले

या ओळी म्हणत साठ शातिसैनिक एक जून रोजी पंजाबातल्या शभू या गावात आले. याचा वेश, भाषा थेट विनोबांच्या वळणाची. निर्मलाबाई देशपांडे यांच्या रचनात्मक कार्यकर्ता समाजातर्फे १५ मे रोजी राजघाटाकडून ही तुकडी निघाली. हरयाणामध्ये १५ दिवस फिरल्यावर तीन जूनला अमृतसरच्या जलियाँवाला बागेत यात्रा संपविणार आहेत.

वाटेत नेहमीप्रमाणे छोटया सभा, गुरुद्वारा–मदिरे यांना भेटी देत आहेत. यात्रेत बहुतेकजण साठीच्या वरचीच मंडळी. त्यात एक अमेरिकेत जन्माला आलेली पुष्पाबेन सुद्धा आहे.

कत्तली, चकमकी चालूच आहेत. ज्ञानप्रबोधिनीसारख्या शांतियात्रा चालूच असतात. काँग्रेस (आय) ने सुद्धा असाच प्रयत्न केला. आता ही आणखी एक यात्रा एवढेच!


वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ. वीणा गवाणकर
दुसरी आवृत्ती
मूल्य : तीस रुपये
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पुणे ३०

# नाटयपंढरी



## ☐ नटाची कदर !

नटवर्य नानासाहेब फाटकांच्या अमदानीत त्यांच्या इतका देखणा गद्य नट, मराठी रंगभूमीवर झाला नाही, असे म्हणायला हरकत नाही. नटाला जे जे म्हणून हवे, ते ते सारे परमेश्वराने त्यांना मुक्त हस्ताने बहाल केले होते. गायक नटात जसे नारायणराव बालगंधर्व, तसे गद्य ( Prose ) नटात नानासाहेब फाटक. त्यांची रुबाबदार देहयष्टी—रूप—रंग नि जराही न चिरकता हवा तसा फिरणारा टिपेचा बुलंद आवाज. हे हे सारे लक्षात घेऊन, 'महाराष्ट्र नाटक मंडळी 'तले नटवर्य परशुरामपंत शाळिग्राम ( संभाजी—बेबंदशाही, कमालखान—शिवसंभव ) म्हणाले होते की, 'देव गद्य नटांना रूप वाटायला निघाला. तेव्हा त्याला आधी नानासाहेब फाटक भेटले. रूपगुणांची पुंजी त्यांना देऊन देव मोकळा झाला. आम्ही इतर गद्य नट ओबडधोबड राहिलो.' मला वाटते याच आठवणीच्या आधारावर तात्यासाहेब शिरवाडकरांनी, 'नटसम्राट' च्या सुरुवातीच्याच स्वगतात म्हाताऱ्याच्या तोंडी ( गणपतराव बेलवलकर) एक वाक्य घातले आहे; 'पण आमच्यासारखे नट म्हणजे खडकासारखे ओबडधोबड आणि पावसाळी ढगांप्रमाणे गडगडणारे.' यात खोटे काय आहे ? केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर यांना देवाने काय दिले होते ? पण कौतुक नि अपूर्वाई हीच आहे की ही माणसे प्रवाहाविरुद्ध पोहून पैलतीरी पोचली. आपल्या कर्तृत्वाने अभिनयश्रेष्ठ म्हणून गाजली नि गौरवली गेली.

नानासाहेब फाटकांचे सुमारे एक तप बापूसाहेब पेंढारकरांबरोबर 'ललितकलादर्श 'त गेले. केरोपंत ( सत्तेचे गुलाम ) विश्रांत ( राक्षसी महत्त्वाकांक्षा ) वसंत ( हाच मुलाचा बाप ) कुसुमाकर (श्री) बाबा शिगवण ( सोन्याचा कळस ) अशा अनेक प्रमुख भूमिका गाजविल्या; पण बाहेर पडले ते बरोबर एकमेव 'वृंदावन' ( पुण्यप्रभाव ) घेऊन. वृंदावन अनेकांनी केला; पण वृंदावन म्हटले की नानांचीच आठवण येते. मग संयुक्त नट संचात त्यांनी हॅम्लेट, सुधाकर, घनःश्याम, झुंजारराव उभे केले. काही काळ 'शाहू नगरवासी 'त राहिल्याने नटसम्राट गणपतराव जोश्यांचा परीस स्पर्श त्यांना झाला होता. त्यांची पुण्याई म्हणजेच त्यांचा हॅम्लेट !

नाना सुशिक्षित होते, रसिक होते, दिलदार होते; पण म्हणतात की कुणाला न जुमानणारे होते. नाही म्हणायला केशवराव दात्यांना मात्र मानीत. पंढरीच्या पांडुरंगासमोर सगळेच जसे हात जोडले जाऊन नतमस्तक होतात, तसेच डॉ. भालेरावांना सारेच कलावंत मानीत. आज मराठी नाटक पुन्हा ताठ उभे आहे, ते केवळ त्या माणसाच्या भगीरथ प्रयत्नावर. मुंबई मराठी साहित्य संघाच्या अनेक नव्या जुन्या नाटकांतून नानासाहेबांनी कामे केली; पण लोक त्यांना वचकून असत. संघासाठी केशवरावांनी 'भाऊबंदकी' बसवायला घेतले नानांची 'राघोबा 'साठी निवड झाली नि नाना एखाद्या विद्यार्थ्यासारखे तालमीला उभे राहिले. इतर कुणालाही नाही; पण केशवरावांना ते मनोमनी मानीत.

१९५४ च्या राष्ट्रीय नाट्यमहोत्सवात दिल्लीला 'भाऊबंदकी 'चा प्रयोग सादर केला सगळ्या बहुभाषी नाटकात, सर्वोत्कृष्ट नाटक म्हणून 'भाऊबंदकी 'ला पहिले पारितोषिक मिळाले. पुन्हा एकदा अटकेवर झेंडे फडकले.

कलावंतांना एकत्र सांभाळणे महाकठीण. पण ते अवघड काम डॉ. भालेरावांनी अखेरपर्यंत केले. नानासाहेबांना मद्य घेण्याची चटक होती डॉक्टरांनी त्यांना बजावले होते, 'नाना, दिल्लीच्या प्रयोगात काही वेडेवाकडे होता कामा नये.' नानांनी ते वचन, तो शब्द पाळला. प्रयोग दृष्ट लागण्यासारखा सुरेख झाला. दुर्गा खोटे ( आनंदीबाई ) मा. दत्ताराम ( रामशास्त्री ) नि नानासाहेब ( राघोबा ) अशी मातब्बर माणसं होती प्रयोगात.

नानासाहेबांना आपण त्यांच्या स्वभावाविरुद्ध डांबून ठेवले आहे, त्यांची मोठी अवघड अवस्था केली आहे हे डॉक्टरसाहेबांना सतत जाणवत होते. खेळ संपताच नानांसाठी थिएटरच्या बाहेर एक टॅक्सी बोलावून घेतली. नानासाहेबांना हाक मारली. पाठीवर शाबासकीची थाप दिली. त्यांच्या खिशात नोटा कोंबल्या नि म्हणाले. 'शाबास नाना! आज जिंकलीत. आजवरच्या आपल्या कीर्तीवर कळस चढविलात. जा, टॅक्सीत बसा नि आता जरा मजा करून या!' नानांनाही तेच हवे होते. त्यांनी डॉक्टरांकडे खुशीत लुक (Look) दिला नि ते टॅक्सीकडे वळले.

कलावंताला खुलवावा लागतो, फुलवावा लागतो, त्याची कदर करावी लागते ती अशी ! याचा अर्थ त्याच्या व्यसनाला उत्तेजन द्यावे असा नाही. व्यसन ते व्यसनच; पण नानासाहेबांना त्या व्यसनापासून परावृत्त करायची का ती वेळ होती ? त्यांचे ते वय का होते ?

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. PNCW-28

# राजहंस विद्यार्थी दैनंदिनी

## मुलांना विज्ञानयुगातील बिरबल बनविणारी

**काय असेल या दैनंदिनीत ?**

☐ **हिमगौरी आणि राजकुमार**

**चमचमणाऱ्या रविकिरणांनी लखलखणारा हार दिला**
**शुभ्रहिमानी इंद्रधनुनी, दिला मखमली शालू हिला**
**निळ्या निळ्या या डोळ्यांमधूनी, खट्याळ भोळे भाव असे**
**लजवंतीने हिमगौरीने, भल्याभल्यांना दिले पिसे**

या हिमगौरी अंटार्क्टिकावर तीन वेळा भारतीय शास्त्रज्ञ जाऊन आले. काय सांगितले या हिमगौरीने त्या राजपुत्रांना ? ते या मोहिमांचे सूत्रधार डॉ. कासीम यांच्याच शब्दात. खास मुलांसाठी. भरपूर छायाचित्रांसह.

☐ **नवे नवनीत**

कविवर्य मंगेश पाडगावकरांनी खास तुम्हा मुलांसाठी निवडलेल्या उत्कृष्ट दहा कविता. 'कवितेच्या प्रेमात कसे पडावे ?' या त्यांच्या खास लेखासह.

☐ **एक अभ्यास पुरवणी**

अभ्यास न करता जी तुम्ही सहज वाचाल व परीक्षेत हमखास गुण मिळवाल अशी. भरपूर आकृत्या–प्रयोगांसह.

**शिवाय**

☐ स्मरणशक्ती कशी वाढवावी ? अभ्यास कसा करावा ? पेपर्स कसे लिहावेत ? दिनचर्या कशी असावी ? इ. विषयांवरचे तुमच्या गुरूजनांनी केलेले हितगूज.

☐ पानापानांवर विखुरलेले सुविचार – कथा – सुभाषिते, तुम्हाला निबंधाला–वक्तृत्वाला उपयोगी येतील अशी.

☐ सुट्टीत किंवा रविवारी तुम्हाला गुंगवून – गुंतवून टाकतील अशी अनेक वैज्ञानिक–गणिती–कोडी व स्पर्धा.

☐ प्रत्येक पान वाचनीय व प्रेक्षणीय. उत्कृष्ट दोन रंगी छपाई.

☐ महत्त्वाच्या नोंदी व अभ्यास लिहिण्यासाठी तारखांची स्वतंत्र पाने.

---

**आजच खरेदी करा**

# राजहंस विद्यार्थी दैनंदिनी

संपादक : डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर
किमत – रुपये पंधरा.
नजिकच्या पुस्तक दुकानात मागणी करा.

**राजहंस प्रकाशन,** १०२५ सदाशिव
नागनाथपाराजवळ, पुणे ४११ ०३०